CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १६ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ४० । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


चंद्रकांत पाटील


राधाकृष्ण विखे-पाटील


धनंजय मुंडे


पंकजा मुंडे


शिवेंद्रराजे भोसले


शंभूराज देसाई


दत्तामामा भरणे

# ३३ कॅबिनेट, ६ राज्यमंत्र्यांनी घेतली शपथ

## नागपुरात झाला ऐतिहासिक मंत्रिमंडळ विस्तार; विदर्भातून ७ मंत्री

### शपथ घेणारे मंत्री

**भाजपा**

१. चंद्रशेखर बावनकुळे (कामठी)
२. राधाकृष्ण विखे पाटील (शिर्डी)
३. चंद्रकांत पाटील (विधान परिषद)
४. गिरीश महाजन (जामनेर)
५. गणेश नाईक (ऐरोली)
६. मंगलप्रभात लोढा (मलबार हिल)
७. जयकुमार रावल (सिंदखेड)
८. पंकजा मुंडे (विधान परिषद)
९. अतुल सावे (छ. संभाजीनगर पूर्व)
१०. अशोक उईके (राळेगाव)
११. आशिष शेलार (वांद्रे पश्चिम)
१२. शिवेंद्रराजे भोसले (सातारा)
१३. जयकुमार गोरे
१४. संजय सावकारे (भुसावळ)
१५. नितेश राणे (कणकवली)
१६. आकाश फुंडकर (खामगाव)
१७. माधुरी मिसाळ (पर्वती) राज्यमंत्री
१८. पंकज भोयर (वर्धा) राज्यमंत्री
१९. मेघना बोर्डीकर (जिंतूर) राज्यमंत्री

**शिवसेना**

१. गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण)
२. दादा भुसे (मालेगाव बाह्य)
३. संजय राठोड (दिग्रस)
४. उदय सामंत (रत्नागिरी)
५. शंभूराज देसाई
६. संजय शिरसाट (संभाजीनगर पश्चिम)
७. प्रताप सरनाईक (ओवळा-माजीवडा)
८. भरत गोगावले (महाड)
९. प्रकाश आबिटकर (राधानगरी)
१०. आशिष जयस्वाल (राज्यमंत्री)
११. योगश कदम (दापोली) राज्यमंत्री

**राष्ट्रवादी काँग्रेस**

१. हसन मुश्रीफ (कागल)
२. धनंजय मुंडे (परळी)
३. दत्तात्रय भरणे (इंदापूर)
४. आदिती तटकरे (श्रीवर्धन)
५. माणिकराव कोकाटे (सिन्नर)
६. नरहरी झिरवाळ (दिंडोरी)
७. मकरंद पाटील
८. बाबासाहेब पाटील (अहमदपूर)
९. इंद्रनील नाईक (पुसद) राज्यमंत्री

◆ **नागपूर, १५ डिसेंबर**

राज्य मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक शपथविधी सोहळा रविवारी सायंकाळी नागपुरातील राजभवनात पार पडला. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्याच्या उपराजधानीत झालेला हा पहिलाच भव्यदिव्य सोहळा आहे. यात एकूण ३९ मंत्र्यांचा शपथविधी झाला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या ३९ मंत्र्यांमध्ये ३३ कॅबिनेट आणि सहा राज्यमंत्री आहेत.

याआधी ५ डिसेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा शपथविधी मुंबईत झाला होता. आज मंत्री म्हणून शपथ घेणाऱ्यांमध्ये भाजपाचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ आमदारांचा समावेश आहे. भाजपाच्या ३, शिवसेनेच्या २ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकाला राज्यमंत्रिपदाची शपथ देण्यात आली.

**मुख्यमंत्र्यांसह एकूण ४२ मंत्री**

आजच्या शपथविधीमुळे महाराष्ट्र मंत्रिमंडळ आता मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांसह ४२ सदस्य झाले आहे. राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या ४३ आहे. अद्याप एक जागा रिक्त आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

या ऐतिहासिक शपथविधी सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसेच महायुतीतील अनेक वरिष्ठ नेते, आमदार आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*


मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचे रविवारी प्रथमच नागपुरात आगमन झाले. त्यांच्या स्वागतासाठी नागपूरकर रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. वर्धा मार्गावरील हॉटेल रॅडिसन ब्लू चौकात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांना आशीर्वाद दिले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हेही यावेळी उपस्थित होते

## भाजपा १९, शिवसेना ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ मंत्र्यांचा समावेश

## आजपासून हिवाळी अधिवेशन

◆ **नागपूर, १५ डिसेंबर**

या वर्षीचे नियमित पाचवे हिवाळी अधिवेशन नागपुरात सोमवारपासून सुरू होत आहे. महायुती सरकारच्या स्थापनेनंतर १५ व्या विधानसभेचे नियमित होणारे हे पहिलेच अधिवेशन असून, भरभरून मतरूपी आशिर्वाद दिलेल्या विदर्भासह राज्यातील जनतेला सरकारकडून या अधिवेशनात मोठ्या अपेक्षा आहेत.

राज्यात मिळालेल्या अभूतपूर्व यशामुळे नव्या सरकारकडून असलेल्या अपेक्षांचे ओझे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर केंद्रीत राहणार आहे. विशेष म्हणजे, विदर्भाचे मुख्यमंत्री आणि अधिवेशनही विदर्भात असल्याने विदर्भातील जनतेच्या अपेक्षादेखील वाढल्या आहेत. त्यामुळे हे अधिवेशन अल्प कालावधीचे असले तरी, या अधिवेशनाकडे विशेष नजरा लागल्या आहेत.

**लाडकी बहीणसह अनेक निर्णयाची अपेक्षा**

लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी, कृषी उत्पादनांसाठी हमीभाव, रोजगार व इतर अनेक बाबींबर सरकारकडून तातडीच्या निर्णयाची अपेक्षा आहे. विशेष अधिवेशनात राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणातील गोषवाऱ्यावर सरकारची भूमिका आणि पुढील काळात विभागनिहाय पुरवणी मागण्यांवरील नियोजन कसे असेल, यावरच विकासाचे प्रतिबिंब दिसणार आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

हिवाळी अधिवेशनाच्या पृष्ठभूमीवर सरकारने चहापानाचे आयोजन केले होते. मात्र, विरोधकांनी या चहापानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे निघाले आहेत. राज्य कर्जबाजारी झाले आहे. उद्योग गुजरातला चालले आहेत. बीडमध्ये सरपंचाचा खून होतो, असे आरोप करीत विरोधकांनी या चहापानावर बहिष्कार टाकला.

## शिवसेना-राकाँचे अडीच वर्षांच्या मंत्रिपदाचे सूत्र

◆ **नागपूर, १५ डिसेंबर**





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार करण्यात आला. मंत्रिमंडळात संधी न मिळालेले नेते नाराज होतील, हे जाणून त्यांची नाराजी दूर करण्यासाठी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने अडीच वर्षांच्या मंत्रिपदाचे सूत्र आणले आहे.

पात्र माहितीनुसार, शिवसेनेच्या मंत्र्यांकडून एक प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाणार आहे. ज्या नेत्यांना मंत्रिपदाची संधी देण्यात आली आहे, त्यांना अडीच वर्षे मंत्रिपद दिले जाईल. त्यानंतर हे मंत्रिपद सोडून द्यावे लागणार आहे. मंत्रिपदाच्या शपथविधीआधी शिवसेनेची एक बैठक झाली. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नेत्यांना याबाबत पूर्वकल्पना दिली.

दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मंत्रिपद मिळालेल्या नेत्यांना फक्त अडीच वर्षांसाठीच या पदावर राहता येईल, असे संकेत दिले आहेत.

त्यांनी पक्षाच्या एका कार्यक्रमात यावर भाष्य केले. भाजपात मात्र हे सूत्र राबवले जाणार की नाही, हे स्पष्ट झाले नाही. *(तभा वृत्तसेवा)*

## मुंडे बहीण-भाऊ प्रथमच मंत्रिमंडळात एकत्र

◆ **नागपूर, १५ डिसेंबर**

राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूर येथील राजभवनावर पार पडला. या शपथविधी सोहळ्यात महायुतीच्या ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी भाजपा आमदार पंकजा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. कधीकाळी एकमेकांचे कट्टर राजकीय विरोधक अशी ओळख असलेल्या या मुंडे बहीण-भावाने महायुती सरकारमध्ये एकाच दिवशी घेतलेली मंत्रिपदाची शपथ राज्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे.

धनंजय मुंडे यांनी त्यांचे काका आणि माजी उपमुख्यमंत्री दिवगंत गोपीनाथ मुंडे यांच्याशी झालेल्या मतभेदानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर धनंजय यांनी परळीतून २०१४ साली पंकजा मुंडे यांच्याविरोधात विधानसभा निवडणूक लढवली. या निवडणुकीत पंकजा मुंडे यांनी त्यांचा पराभव केला. मात्र, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी ४० हजारांहून अधिक मतांनी पंकजा मुंडेंचा पराभव केला. या राजकीय संघर्षामुळे भावा-बहिणीच्या नात्यातील दरीही वाढली. मात्र, २०२३ मध्ये राजकीय समीकरणे बदलली आणि अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपासोबत सत्तेत सहभागी झाली. धनंजय मुंडे यांनीही अजित पवारांची साथ दिल्याने त्यांना तेव्हाच मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले होते. २०१९ च्या पराभवामुळे सभागृहाबाहेर असलेल्या पंकजा मुंडे यांच्या नशिबी राजकीय वनवास होता. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने बीड मतदारसंघातून पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत मुंडे बहीण-भाऊ पूर्ण ताकदीने एकत्र आले होते. *(तभा वृत्तसेवा)*

## प्रसिद्ध तबलावादक झाकिर हुसैन यांचे निधन

### सॅन फ्रॅन्सिस्कोत घेतला शेवटचा श्वास

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

प्रसिद्ध तबलावादक आणि संगीतकार झाकिर हुसैन यांचे अमेरिकेत निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते.



त्यांच्यावर सॅन फ्रॅन्सिस्को येथील रुग्णालयातील उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. झाकिर हुसैन यांची प्रकृती अचानक खालावल्यानंतर त्यांना मागील आठवड्यात रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. त्यांना हृदयविकाराचा त्रास होता.

तीन ग्रॅमी पुरस्कार मिळवणाऱ्या झाकिर हुसैन यांनी अभिनयही केला होता. त्यांनी १२ चित्रपटांत काम केले होते. झाकिर हुसैन यांनी शशी कपूर यांच्यासोबत १९८३ मध्ये आलेला 'हीट ॲण्ड डस्ट' या चित्रपटात काम केले होते. हा त्यांचा पहिला चित्रपट होता. या व्यतिरिक्त १९९८ मध्ये आलेल्या 'साज' चित्रपटातही त्यांनी अभिनयाची छाप सोडली.

**वडीलही होते तबलावादक**

९ मार्च १९५१ मध्ये जन्मलेल्या झाकिर हुसैन यांना पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यांचे वडील उस्ताद अल्लाह रखा कुरैशीही तबलावादक होते. *(वृत्तसंस्था)*






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# बुमराहचे ५ बळी, हेड, स्मिथची शतके

## ऑस्ट्रेलिया ७ बाद ४०५



जसप्रीत बुमराह



फटकेबाजी करताना ट्रॅव्हिस हेड



चेंडूचा वेध घेताना स्टीव्ह स्मिथ

**ब्रिस्बेन, १५ डिसेंबर**

भारत व ऑस्ट्रेलियादरम्यानच्या तिसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याचा पहिला दिवस पावसामुळे वाया गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याने ५ बळी टिपण्याची किमया केली असली, तरीही ट्रॅव्हिस हेड आणि स्टीव्ह स्मिथच्या दमदार शतकांच्या बळावर यजमान ऑस्ट्रेलियाने दिवस अखेर पहिल्या डावांत १०१ षटकांत ७ बाद ४०५ धावा उभारल्या.

गॅबा मैदानावर ऑस्ट्रेलियाने बिनबाद २८ धावांवरून दुसऱ्या दिवसाच्या खेळास सुरुवात केली. दिवसभरात ऑस्ट्रेलियाने काढलेल्या ३७७ धावांत हेड (१५२) व स्मिथने (१०१) शतकी योगदान दिले, तर भारताने टिपलेल्या सात बळींपैकी पाच बळी एकट्या बुमराहने टिपल्या. त्याने एकाकी झुंज देत भारताला सामन्यात कायम राखले. याबरोबरच बुमराहची ऑस्ट्रेलियातील कसोटी बळींची संख्या ४९ वर पोहोचली आहे. याबाबतीत कपिल देव (५१) हा आता त्याच्यापुढे एकमेव भारतीय गोलंदाज आहे. मोहम्मद सिराज व नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले, मात्र आकाश दीप व रवींद्र जडेजाने एकही बळी न टिपता अनुक्रमे ७८ व ७६ धावा वाटल्या. पहिल्याच सत्रात बुमराहने उस्मान ख्वाजा (२१), नॅथन मॅकस्वीनी (९) व मार्नस लॅबुशेन (१२) या महत्त्वपूर्ण फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला व ऑस्ट्रेलियावर दबाव टाकला. त्यावेळी ऑस्ट्रेलियाची स्थिती ३३.२ षटकांत ३ बाद ७५ धावा अशी होती, परंतु त्यानंतर ट्रॅव्हिस हेड व स्टीव्ह स्मिथने भारतीय गोलंदाजीचा खरपूस सम ाचार घेत आपहालले शतक साजरे केले व ऑस्ट्रेलियाच्या धावसंख्येला आकार दिला. त्यातुलनेत भारताच्या आक्रमणात तीव्रतेचा अभाव दिसू लागला. हेड व स्मिथने चौथ्या गड्यासाठी ३०२ चेंडूंत २४१ धावांची भागीदारी केली, परंतु त्यानंतर ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली. दुसऱ्या नवीन चेंडूने भारताला थोडा दिलासा दिला. बुमराहने स्मिथ, मिचेल मार्श आणि हेडला १२ चेंडूंत बाद केले, पण तोपर्यंत ऑस्ट्रेलियाची स्थिती ८६.५ षटकांत ६ बाद ३२७ धावा अशी होती. स्मिथने १९० चेंडूंत १२ चौकारांसह १०१ धावांची, तर हेडने १६० चेंडूंत १८ चौकारांसह १५२ धावांची आकर्षक खेळी केली.

मिचेल मार्श ५ धावांवर बाद झाला. मोहम्मद सिराजने कर्णधार पॅट कमिन्सच्या (२०) रूपाने ऑस्ट्रेलियाचा महत्त्वपूर्ण गडी बाद केला.

खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ७ बाद ४०५ धावा झाल्या होत्या व त्यावेळी ॲलेक्स कॅरी ४५ धावांवर, तर मिचेल स्टार्क ७ धावांवर खेळत होते.

## संक्षिप्त वृत्त



### सूर्या कॉर्पोरेट ट्रॉफी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरवात

**सोलापर, दि. १५ डिसेंबर-**

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सूर्या कॉर्पोरेट ट्रॉफी टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेस सुरवात झाली. यंदाचे हे १३वे वर्ष आहे. या स्पर्धेचे उद्घाटन सा.बा. मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय माळी आणि उपअभियंता श्रीकांत गायकवाड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरुवात पूजनाने याने झाली. सूर्या ग्रुपच्या वतीने आयोजित या क्रिकेट स्पर्धेत २४ संघ सहभागी झाले आहेत. पहिल्या सामन्यात श्रीराम ट्रान्सपोर्ट आणि  बँक यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. मधुमेह तज्ञ डॉ.भास्कर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, सन्मित्र डेवल्पर्सचे प्रायोजक अनिकेत कलशेट्टी, सूर्या ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सुरवसे, सूर्या ग्रुपचे अध्यक्ष संजय सूरवसे व उपाध्यक्ष अप्पा रामदासी यांच्यासह नागरिक, खेळाडू, क्रीडाप्रेमी उपस्थित होते. सूत्रसंचालन मनिष काळे यांनी केले. दत्ता शिंदे यांनी आभार मानले. स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्यासाठी काशिनाथ ऑरसंग, स्वप्नील इंगळे, लक्ष्मण कावळे, सज्जन जिला व सूर्या ग्रुपचे सदस्य परिश्रम घेत आहेत.

### महाराष्ट्र बास्केटबॉल संघात अभिराज टिळके याची निवड

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**



येथील सेलिब्रेशन स्पोर्ट अकॅडमी खेळाडू अभिराज बाळासाहेब टिळके यांची महाराष्ट्राचा बास्केटबॉल संघात निवड झाली. हैदराबाद, तेलंगणा येथे १६ ते २२ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या १३ वर्षांखालील मुले व मुली ४९वी सब -ज्युनियर राष्ट्रीय बास्केटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत तो भाग घेईल. त्यास ताबिश जमाल यांचे मार्गदर्शन लाभले. तो सेंट जोसेफ स्कूलमध्ये आठवी इयत्तेत शिकत आहे. त्याचे सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मा के.डी पाटील, उपाध्यक्ष मनोज यलगुलवार, सचिव साकिब शेख, खजिनदार दिनेश सारंगी, अभिजित टाकळीकर, डॉ बकुल, नावेद मुन्शि, मुकिम खान, डॉ. वलजा आदींनी अभिनंदन केले.



### संगमेश्वर कॉलेजच्या कुडक्याल, चव्हाण यांची कामगिरी

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

राजस्थान येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय डायव्हिंग स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा खेळाडू विपुल कुडक्याल याने रौप्य पदक पटकावले. तसेच श्रुतिका चव्हाण हिने शालेय राज्य तलवारबाजी स्पर्धेमध्ये सेबर या प्रकारात द्वितीय क्रमांक मिळविला. या कामगिरीवर  तिची जम्मू काश्मीर येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये निवड झाली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



### स्वप्निल भोसलेची महाराष्ट्र बेसबॉल संघात निवड

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

येथील स्वप्नील सुनील भोसले याची २६ ते ३० डिसेंबर दरम्यान पंजाब येथे होणाऱ्या सीनियर राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेसाठी याची महाराष्ट्र बेसबॉल संघात निवड झाली. त्याचा बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष नगरसेवक सीए विनोदजी भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वप्निलला प्रा.संतोष खेंडे प्रशांत कदम यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी बेसबॉल संघटनेचे उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी, मारुती घोडके आदी उपस्थित होते.



### सोलापूर शहर व जिल्ह्यात खो-खो दिन उत्साहात

**सोलापूर दि. १४ डिसेंबर-**

खो-खो या खेळाचे प्रमुख आश्रयदाते खासदार शरदचंद्र पवार यांचा वाढदिवस १२ डिसेंबर. हा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने केले होते. त्यानुसार सोलापूर शहर व जिल्ह्यात खो-खो दिन खेळाडूंचा सत्कार, नियमाची माहिती,  मैदानावर रांगोळी काढून, पणत्या लावून व पूजन करून उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद शाळा कणबस, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इंगळगी, जिल्हा परिषद शाळा विंचूर, वसंतराव काळे प्रशाला, कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लब वाडीकुरोली (ता. पंढरपूर), छत्रपती शिवाजी विद्यालय वीट (ता. करमाळा), साकत प्रशाला बार्शी, लोकविकास क्लब वेळापूर, अर्धनारी नटेश्वर क्लब वेळापूर (ता. माळशिरस), छत्रपती खो-खो क्लब मरवडे (ता. मंगळवेढा), उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर येथे हा दिन साजरा करण्यात आला.

## बुद्धिबळ प्रशिक्षक शिबीर २२ डिसेंबरला

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या वतीने ''शाळेत बुद्धिबळ'' या उपक्रमाअंतर्गत बुद्धिबळ प्रशिक्षक होण्याकरिता ''प्रशिक्षकांना प्रशिक्षण'' या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन रविवारी २२ डिसेंबरला हरीभाई देवकरण प्रशालेजवळ एस.पी.एम. शाळेत केले आहे. सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने सोलापूर चेस अकॅडमीने हे शिबिर आयोजित केले आहे. हे शिबिर एक दिवसाचे असून बुद्धिबळ प्रशिक्षक होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाचा अंतर्भाव करण्यात आलेले आहे. १८ वर्षापुढील विद्यार्थी, खेळाडू, प्रशिक्षक, पालक तसेच क्रीडा शिक्षक या प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेऊ शकतात. इच्छुकांनी माहितीसाठी उदय वगरे (मो.८८८८०४५३४४) व प्रशांत पिसे (८६२६०३७७३९) यांच्याशी संपर्क साधावा असे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, अतुल कुलकर्णी यांनी कळविले आहे.

## भैरूरतन दमाणी अंधशाळेची २२ पदकांची कमाई

### दिव्यांग स्पर्धा : समूहगीतमध्ये प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा समाज कल्याण विभागाच्या जिल्हा क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ संचलित भैरूरतन दमाणी अंधशाळेने १० सुवर्ण, ७ रौप्य व ५ कांस्य अशी २२ पदकांची कमाई केली आहे

त्यात ॲथलेटिक्स १०, बुद्धिबळ, पासिंग द बॉल १, गोळा फेक ३ पोहणे लांब उडी २ अशा विविध मैदानी क्रीडा प्रकारात अशा २२ बक्षिसांचा समावेश आहेत. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत या स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला.



या विद्यार्थ्यांना शिक्षक रंजन पंचवाडकर, राजकुमार पाटील, सौ केतकी रानडे (धामणकर), गीतांजली यादव, व्यंकट कदम तसेच संतोष गवांडकर, भास्कर शिखरे, अर्चना करकमकर, स्वाती कामाने यांचे म ार्गदर्शन लाभले. या विजयी चमूचे संस्थेच्या अध्यक्षा जानवी माखीजा, सचिव संतोष भंडारी, मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे यांनी अभिनंदन केले.

## तलहा शेख यांची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पंच म्हणून निवड

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**



तेलंगणा हैद्राबाद येथे १६ ते २२ डिसेंबर २०२४ दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेकरिता भारतीय बास्केटबॉल संघटनेकडून सोलापूर शहर व जिल्हा अमॅचयुर बास्केटबॉल संघटना व ग्रीन स्टार स्पोर्टस् क्लबचे तलहा शेख यांची पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांचे जिल्हा व शहर ॲम्युचर बास्केटबॉल संघटनेचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते-पाटील व सचिव एम. शफी शेख अभिनंदन केले.

## ग्लोबल व्हिलेजचे तिघे विद्यापीठ व्हॉलिबॉल संघात निवड

### सौवित राठौड सलग दुसऱ्यांदा विद्यापीठ कर्णधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सुरु झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबाल स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संघात ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बोरामणी येथील सोवित लक्ष्मण राठोड, सागर गोपाल आचलकर व शिवम शंकर राठोड या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

त्यात सोवितची सलग दुसऱ्यांदा कर्णधारपदी निवड झाली.विद्यापीठाच्या वतीने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतील चमकदार कामगिरी व बार्शी येथे सराव शिबिरामध्ये घेतलेल्या परिश्रमाने यांची निवड झाली आहे. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी व सचिवा संगिता शहा, प्रा. प्रदीप राठोड, उपप्राचार्य प्रा. सोमनाथ स्वामी यांनी अभिनंदन केले





## विभागीय डॉजबॉल स्पर्धेत दमाणी प्रशाला विजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ पुणे संचलित बी.एफ. दमाणी प्रशालेने पुणे विभागीय शालेय डॉजबॉल स्पर्धेत १९ वर्षीय मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले. अहमदनगर येथे झालेल्या स्पर्धेत मुलांनी ही कामगिरी केली. हा संघ यवतमाळ येथे होणाऱ्या राज्य डॉजबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला. तसेच १९ वर्षांच्या मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक संपादिला. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक  समर्थ भिमरथी सरांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे संस्थेचे स्थानिय अध्यक्ष कालिदास जाजू, सचिव मंगल काबरा, सहसचिव उज्वल तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती व पर्यवेक्षक राहुल इंगळे यांनी अभिनंदन केले.

**विजेता संघ : मुले :** सार्थक सदाशिव मानकुसकर, अंशुल राम दरगड, मुजीब मोहम्मद शेख, पार्थ ज्ञानेश्वर सोलंकर, ओंकार महेश तोडकर, अथर्व रवींद्र होंडराव, सुमिरन माणिक डिंगणे, प्रद्युम्न जयेश उपासे, अथर्व अमर स्वने, समर्थ संदीप सलगर, संकेत संतोष तगारे, स्वानंद संतोष मुळे.

**मुली :** सूर्या सच्चिदानंद सावंत, खुशी संपतकुमार चंडक, श्रावणी प्रशांत गरड, प्रेरणा राजेंद्र बिराजदार, श्रुती विनायक मैंदर्गीकर, सृष्टी सुनील गवळी, श्रीहर्षा बाळकृष्ण द्यावनपल्ली, गौरी गोविंद हेडे, गिरीजा बलदवा, वैष्णवी द्वारकाधीश परदेशी, वैष्णवी शामसुंदर मुरक्या, वृषाली गिरीराज पारिक.

# एकेरीत भारताची श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती अजिंक्य

## ओॲसिस सोलापूर ओपन २५ हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १४ डिसेंबर-**

ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत ओॲसिस सोलापूर ओपन एमएसएलटीए -एसडीएलटीए २५हजार डॉलर महिला आयटीएफ टेनिस स्पर्धेत एकेरीत भारताची श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने अजिंक्यपद पटकाविले.महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथे झालेल्या या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत भारताच्या पाचव्या मानांकित श्रीवल्ली रश्मिका भामिदीप्ती हिने थायलंडच्या बुन्यावी थामचैवतचा ७-५, ६-३ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. हा सामना १ तास ४५ मिनिटे चालला. सामन्यात सुरुवातीला दोन्ही खेळाडूंनी आपापल्या सर्व्हिस राखल्या. त्यानंतर श्रीवल्लीने बुन्यावीची चौथ्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ७-५ असा जिंकून विजेतेपदाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले. दुसऱ्या सेटमध्ये श्रीवल्लीने बुन्यावीला कमबॅक करण्याची फारशी संधी दिली नाही व हा सेट ६-३ असा जिंकून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

स्पर्धेतील स्पर्धेतील एकेरीतील विजेत्याला करंडक व २ लाख ९९ हजार तर उपविजेत्याला करंडक व १ लाख ७४ हजार तर दुहेरीतील विजेत्या जोडीला करंडक व १ लाख २८ हजार, तर उपविजेत्या जोडीला करंडक व ७४ हजार  अशी पारितोषिके देण्यात आली. एकेरीतील विजेती श्रीवल्ली भामीडीपतीला ओएसिस रेसिडन्सीचे व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ गांधी व उपविजेती बुन्यावी थामचयवतला इलिझियम क्लब सोलापूरचे सी एफ ओ मोहित सिंग यांच्या हस्ते तर दुहेरीची पारितोषिके वितरण बालाजी अमाइन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी, प्रिसिजनच्या संचालिका मयुरा शहा यांच्या हस्ते क्रिस्टल चषक प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी उत्कृष्ट बॉल पीकरची कामगिरी बजावणाऱ्या शंभूराजे पवार व उज्वल दोडमणी, फिसियोथेरपीचे काम पाहणाऱ्या पुण्याच्या निकिता पाटील, भोजन व्यवस्था साभाळणाऱ्या सुनंदा पवार, वाहतुकीची सोय करणाऱ्या गांधी हुंडाईच्या प्रशांत पाटील यांचा विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंच्या हस्ते भेट देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी प्रियदर्शन शहा, केशव रेड्डी, नितीन बिज्जरगी, पराग पाटील, सुजित भट्टड, सौरव गुप्ता, संदीप देसाई, स्वाती देसाई आदि मान्यवर  उपस्थित होते. संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

### दुहेरीत थायलंडची जोडी विजेती

दुहेरीत थायलंडच्या थासापोर्न नाकलो व बुन्यावी थामचैवत यांनी विजेतेपद पटकाविले. अंतिम फेरीत थासापोर्न नाकलो हीने बुन्यावी थामचैवतच्या साथीत भारताच्या आकांक्षा नित्तूरे व सोहा सादिक यांचा ६-४, ६-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दहा वर्षांपासून सोनियांनी दिली नाही भेटण्याची संधी



### मणिशंकर अय्यर यांची नाराजी

### पुस्तकात खळबळजनक दावे

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

काँग्रेसचे वरिष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी एक पुस्तक लिहिले आहे. त्यात आपल्या राजकीय जीवनातील विविध घटना सविस्तर मांडल्या. माझ्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात गांधी परिवारापासून आणि शेवटही तिथूनच झाला, असे अय्यर यांनी 'अ मॅव्हरिक इन पॉलिटिक्स' या पुस्तकात म्हटले. मागील दहा वर्षांपासून सोनिया गांधी यांच्यासोबत भेट झाली नाही. राहुल गांधींनाही भेटण्याची संधी मिळाली नाही. प्रियांका वढेरांसोबत दूरध्वनीवर चर्चा होते, असा दावा अय्यर यांनी पुस्तकात केला आहे.

मणिशंकर अय्यर यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत काँग्रेस पक्ष आणि गांधी कुटुंबासोबतचे वैयक्तिक संबंध आणि राजकीय अनुभवांबाबत चर्चा केली. त्यांचे पुस्तक 'अ मॅव्हरिक इन पॉलिटिक्स' या पुस्तकाचे जगरनॉटद्वारे प्रकाशन केले जाणार आहे. मागील दहा वर्षांत मला एकदाही सोनिया गांधींना भेटण्याची संधी मिळालेली नाही, असे त्यांनी या पुस्तकात म्हटले आहे.

२०१४ मधील सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसच्या सुमार कामगिरीचा उल्लेख केला. १९८४ मध्ये ४०४ जागांवरून २०१४ मध्ये ४४ पर्यंत घसरलेल्या आलेखाबद्दल त्यांनी काँग्रेसची कामगिरी अत्यंत निराशाजनक आणि दुःखद असल्याचे म्हटले. २०१२ मध्ये प्रणव मुखर्जी यांना पंतप्रधानपद दिले असते, तर २०१४ मध्ये लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले नसते. मनमोहनसिंग यांच्या जागी राष्ट्रपतिपद सांभाळणाऱ्या प्रणव मुखर्जी यांची ऊर्जा आणि त्यांचे जादूई नेतृत्व काँग्रेस पक्ष आणि सरकार दोघांसाठी सकारात्मक ठरले असते, असे त्यांनी पुस्तकात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

#### अण्णा हजारेंच्या आंदोलनाचा उल्लेख

२०१३ मध्ये काँग्रसच्या नेत्यांवर कित्येक आरोप झाले, जे कायदेशीरदृष्ट्या सिद्ध झाले नाहीत. सरकार आणि पक्ष या आरोपांना उत्तर देऊ शकले नाहीत. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा घोटाळा आणि अण्णा हजारे यांच्या नेतृत्वातील 'इंडिया अगेन्स्ट करप्शन' आंदोलनाने सरकारच्या निवडणुकीतील शक्यतांवर संकट निर्माण केले. रामलीला मैदानात अण्णा हजारे यांच्या उपोषणाला परवानगी न देण्याची आणि नंतर ती देणे हे एक मोठे चुकीचे पाऊल ठरले, असे त्यांनी पुस्तकात म्हटले आहे.

#### आज कोणताही घोटाळा नाही झाला

**राजकीय कारकीर्दीच्या सुरुवातीच्या दिवसांचा, पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात संपुआ-१ मध्ये मंत्री असतानाच्या आणि त्यानंतर पतनाचा उल्लेख अय्यर यांनी पुस्तकात केला आहे. त्यांनी संपुआ-२ च्या पतनाच्या आठवणी या पुस्तकात लिहिल्या आहेत. आज कोणताही घोटाळा झाला नाही, असे म्हणत त्यांच्या पत्नीने टीव्हीवर निराशा व्यक्त केल्याची आठवणही त्यांनी पुस्तकात लिहिली आहे.**



रायपूर येथील परेड मैदानावर छत्तीसगड पोलिसांना रविवारी प्रेसिडेन्ट कलर सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय उपस्थित होते

# मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद संपवण्यासाठी कटिबद्ध

### अमित शाह यांचे प्रतिपादन

◆ **रायपूर, १५ डिसेंबर**

केंद्र आणि छत्तीसगड सरकार ३१ मार्च २०२६ पूर्वी राज्यातून नक्षलवादाचा धोका संपवण्यासाठी वचनबद्ध आहेत, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी सांगितले.

जेव्हा छत्तीसगड नक्षलवादमुक्त होईल, तेव्हा संपूर्ण देश या संकटातून मुक्त होईल, असे अमित शाह यांनी येथील पोलिस कवायत मैदानावर प्रेसिडेंट्स कलर पुरस्कार सोहळ्याला संबोधित करताना सांगितले. छत्तीसगड पोलिसांनी मागील वर्षभरात नक्षलवादाविरुद्धच्या लढ्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. नक्षलवाद्यांसाठी छत्तीसगड सरकारने तयार केलेल्या धोरणाचे कौतुक केले आणि त्यांना हिंसाचार सोडून मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले.

प्रेसिडेंट्स कलर हा केवळ सोहळा नाही, तो सेवा, समर्पण आणि त्यागाचे प्रतीक आहे आणि पोलिसांना ज्या असंख्य आव्हानांना सामोरे जावे लागते, त्याची आठवण करून देतो, असे अमित शाह म्हणाले.

छत्तीसगड पोलिस आपली जबाबदारी पार पाडतील आणि आपल्या कर्तव्यापासून कधीही मागे हटणार नाहीत, असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला. उद्यापासून छत्तीसगड पोलिसांचे जवान त्यांच्या गणवेशावर राष्ट्रपतींचे प्रतीकचिन्ह घेऊन बाहेर पडतील आणि त्यांचे मनोबल अनेकपटींनी वाढेल, असे शाह म्हणाले.

**छत्तीसगड पोलिसांनी मिळवले यश**

छत्तीसगड पोलिसांनी मागील वर्षात नक्षलवादाविरुद्धच्या लढ्यात एक महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. राज्यात मागील वर्षभरात २८७ नक्षलवाद्यांना निष्प्रभ करण्यात आले, हजार नक्षल्यांना अटक करण्यात आली आणि ८३७ जणांनी आत्मसमर्पण केले, असे अमित शाह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय सीमेवर पाकी ड्रोन, मादकपदार्थ जप्त



◆ **जम्मू, १५ डिसेंबर**

पाकिस्तानातून जवळपास अर्धा किलो उच्चदर्जाचे मादकपदार्थ घेऊन येणारे ड्रोन जम्मूतील आंतरराष्ट्रीय सीमेजवळ सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफने जप्त केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

पाकिस्तानातून या ड्रोनने घुसखोरी केली आणि ते अर्निया सेक्टरमधील चिनाझ चौकीजवळ शनिवारी रात्री जप्त करण्यात आले. शनिवारी रात्री सव्वाआठ वाजताच्या सुमारास पाकिस्तानी ड्रोन रोखून ते आणि ४९५ मादकपदार्थ जप्त करीत तस्करीचा प्रयत्न उधळण्यात आला, असे स्पष्ट करीत बीएसएफच्या प्रवक्त्याने या वृत्ताला दुजोरा दिला. (वृत्तसंस्था)

# छत्तीसगडमध्ये आयईडी स्फोट, बीएसएफ जवान जखमी

◆ **कांकेर, १५ डिसेंबर**

छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यात एक आयईडी उपकरण निष्क्रिय करीत असताना अचानक झालेल्या स्फोटात सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफचा जवान जखमी झाला, असे पोलिसांनी सांगितले.

सुरक्षा दलाचे पथक नक्षलविरोधी अभियान राबवत असताना पानीडोबिर तळाजवळ हातारकेसा गावाजवळ सकाळी साडेनऊ वाजता हा स्फोट झाला, असे कांकेरचे पोलिस अधीक्षक इंदिरा कल्याण एल्सेला यांनी सांगितले.

बीएसएफचे पथक गस्त घालत असताना माओवाद्यांनी पेरलेला आयईडी त्यांना दिसला. तो निष्क्रिय करीत असताना अचानक स्फोट झाला. त्यात बीएसएफचा जवान बी. ईश्वर राव यांच्या हाताला आणि चेहऱ्याला किरकोळ दुखापत झाली, असे एल्सेला यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# आपने जाहीर केली उमेदवारांची अंतिम यादी

### केजरीवाल नवी दिल्लीतून लढणार

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी आम आदमी पक्षाने (आप) ३८ उमेदवारांची चौथी आणि अंतिम यादी रविवारी जाहीर केली. आपचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल नवी दिल्ली मतदारसंघातून, तर मुख्यमंत्री आतिशी पुन्हा एकदा कालकाजी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. आपने कस्तुरबा नगरमधील विद्यमान आमदार मदन लाल यांच्या जागी रमेश पहेलवान यांना उमेदवारी दिली आहे. रमेश पहेलवान आणि त्यांच्या पत्नी नगरसेवक कुसुम लता यांनी आज भाजपाला सोडचिठ्ठी दिल्यानंतर 'आप'मध्ये प्रवेश केला होता. यादीतील इतर काही नावांमध्ये बाबरपूरमधून गोपाल राय, ओखलामधून अमानतुल्ला खान आणि शकूर बस्तीमधून सत्येंद्र जैन यांचा समावेश आहे.

नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसने दिवंगत शीला दीक्षित यांचे पुत्र संदीप दीक्षित यांना उमेदवारी दिल्याने अरविंद केजरीवाल यांच्यासाठी ही लढत मोठीच असेल. २०१३ आणि २०१५ मध्ये अरविंद केजरीवाल यांच्याकडून पराभूत झालेल्या दिल्लीच्या तीन वेळा मुख्यमंत्री असलेल्या शीला दीक्षित यांचा साक्षीदार असलेल्या मतदारसंघात पुन्हा ऐतिहासिक स्पर्धा निर्माण होणार आहे. (वृत्तसंस्था)

# महाकुंभासाठी ड्रोनविरोधी यंत्रणा तैनात

◆ **महाकुंभ नगर, १५ डिसेंबर**

महाकुंभात सहभागी होणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी येथे बळकट ड्रोनविरोधी यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. परिसरात उड्डाण करणाऱ्या सर्व ड्रोनवर मध्यवर्ती ठिकाणावरून तज्ज्ञ नजर ठेवणार आहेत.

ही ड्रोनविरोधी यंत्रणा शुक्रवारी तैनात करण्यात आली असून, या यंत्रणेने यशस्वीरीत्या दोन यूएव्हीला रोखले, अशी माहिती उत्तरप्रदेश सरकारने निवेदनात दिली. ड्रोनविरोधी यंत्रणेच्या व्यवस्थापनासाठी तज्ज्ञांना सामील करण्यात आले आहे. हे तज्ज्ञ मध्यवर्ती ठिकाणी तैनात असतात आणि आसपासच्या परिसरात उडणाऱ्या सर्व ड्रोन्सवर सतत नजर ठेवतात. आवश्यक असल्यास कोणतेही संशयास्पद ड्रोन उड्डाण करीत असताना निष्क्रिय करण्याची त्यांच्याकडे क्षमता आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

कुंभ परिसरात ड्रोनविरोधी यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. शुक्रवारी पहिल्याच दिवशी या अत्याधुनिक यंत्रणेने परवानगीशिवाय उड्डाण करणारी दोन डोन ड्रोन्स यशस्वीपणे पाडून निष्क्रिय केली. या ड्रोन्सच्या ऑपरेटर्सला नोटीस बजवण्यात आल्या, असे वरिष्ठ पोलिस अधीक्षक राजेश द्विवेदी यांनी सांगितले.

महाकुंभ नगर परिसरात पूर्वपरवानगीशिवाय ड्रोन उडवले जाणार नाहीत. कोणत्याही ड्रोन ऑपरेशनसाठी पोलिसांकडून आधीच परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय ड्रोन उड्डाण करीत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

महाकुंभात जगभरातील जवळपास ४५ कोटी भाविक सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. महाकुंभ हा जगातील सर्वांत मोठा मेळावा आहे. (वृत्तसंस्था)

# मंगळवेढ्यात वाहनासह २७ लाखांचा गुटखा पकडला

### तिघांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १५ डिसेंबर-**

कर्नाटक राज्यातून मंगळवेढा शहराकडे बेकायदा गुटखा घेऊन येणारे वाहन अन्न औषध प्रशासन व मंगळवेढा पोलीस यांनी सापळा लावून पकडले असून यामध्ये २७ लाख ०३ हजार ४०० रुपये किंमतीचे वाहनासह मुद्देमाल जप्त करुन या प्रकरणी संदीप रामचंद्र लाड (रा.सांगली),भूषण होमकर (रा.पंढरपूर), संतोष वेदपाठक (रा.पंढरपूर) या तिघाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

१३ रोजी दुपारी १.३० च्या दरम्यान कर्नाटक राज्यातून वाहनाव्दारे मोठ्या प्रमाणात मंगळवेढ्याकडे गुटखा येत असल्याची गोपनीय माहिती पो. नि. महेश ढवाण यांना मिळताच त्यांनी पोलिसांचे पथक ३.३० वाजता मरवडे म ार्गावरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ पाठविले असता अशोक लेलँड दोस्त प्लस कंपनीचे वाहन त्यांचे नंबर एम.एच.१३ डी.क्यू.९५६१, तसेच एम.एच.१३ डी.क्यू.८३९५ समोरुन दोन वाहने येताच पोलीस हवालदार महेश कोळी यांनी इशारा करुन थांबविले. त्यावेळी चालकाला नाव विचारले असता संदीप लाड (रा.चिंतामणी नगर सांगली) असे सांगितले. दुसऱ्या वाहन चालकाने भूषण होमकर व संतोष वेदपाठक (रा.पंढरपूर) असे सांगितले. सदर वाहनात काय माल आहे? असे पोलिसांनी विचारले असता प्रथमतः: उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यांनी पोलिसांत विश्वासात घेऊन विचारल्यावर दोन्ही वाहनात गुटखा व सुगंधी तंबाखू असल्याचे त्यांनी स्पष्टीकरण दिले. दोन्ही वाहने पोलिसांनी जप्त करुन पोलीस स्टेशन आवारात आणून लावली आहेत. एम.एच.१३ डी.क्यू.९५६१ या वाहनात विमल पान मसाला,सुगंधी तंबाखू,आरएमडी पान मसाला,सुपर जेम पान मसाला,एम सुगंधी तंबाखू,एस.पी.९९९सुगंधी असा एकूण १३ लाख ७२ हजार ८०० रुपयाचा असा मुद्देमाल मिळाला. दुसरे वाहन क्रमांक एम.एच.१३ डी. क्यू.८३९५ या वाहनात जाफरानी जर्दा सुगंधी तंबाखू २९० पाकिटे,त्यांची किंमत ३३ हजार ६०० असा माल मिळून आला. याची फिर्याद अन्न व औषध प्रशासनाचे उमेश भुसे यांनी दिल्यावर वरील तिघाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# जगातील सर्वांत श्रीमंत कुटुंबांची यादी जाहीर

जगातील सर्वात श्रीमंत कुटुंबांची यादी जाहीर झाली आहे. या यादीत वॉलमार्ट चालवणाऱ्या वॉल्टन कुटुंबाने पुन्हा पहिले स्थान मिळवले आहे. ब्लूमबर्गच्या यादीनुसार, वॉल्टन कुटुंबाची एकूण संपत्ती ४३२.४ अब्ज डॉलर्स झाली आहे. ही संपत्ती एलन मस्क आणि अनेक मध्य-पूर्व राजघराण्यांच्या वैयक्तिक संपत्तीपेक्षा जास्त आहे. भारतातील अंबानी कुटुंब आठव्या क्रमांकावर आहे.

### जगातील पाच सर्वांत श्रीमंत कुटुंबांची माहिती

**वॉल्टन कुटुंब (अमेरिका) :** ४३२.४ अब्ज डॉलर्स संपत्तीसह पहिले स्थान. कुटुंबाच्या तीन पिढ्या वॉलमार्ट चालवतात, ज्याचे जगभरात १०,६०० पेक्षा जास्त स्टोअर्स आहेत.

**अल नाहयान फॅमिली (ब्रिटन) :** ३२३.९ अब्ज डॉलर्स मालमत्तेसह दुसरे स्थान. हे कुटुंब संयुक्त अरब अमिरातचे राजघराणे आहे. मोहम्मद बिन झायेद अल् नाहयान यांच्या नेतृत्वाखाली हे कुटुंब आहे. कुटुंबाची संपत्ती प्रामुख्याने तेल उद्योगाशी निगडीत आहे आणि अबू धाबीच्या शेअर बाजारात त्यांच्या व्यवसायांचा वाटा ६५ टक्के आहे.

**अल् थानी कुटुंब (कतार) :** १७२.९ अब्ज डॉलर्स संपत्तीसह तिसरे स्थान आहे. हे कुटुंब कतारच्या राजघराण्यातील आहे आणि त्यांची संपत्ती तेल व वायूच्या अफाट साठ्यातून आली आहे. त्याच्या व्यवसायांमध्ये हॉटेल, विमा कंपन्या आणि अनेक आंतरराष्ट्रीय मालमत्तांचा समावेश आहे.

**हर्मेस फॅमिली (फ्रान्स) :** १७०.६ अब्ज डॉलर्स मालमत्तेसह चौथे स्थान. या कुटुंबाकडे फ्रान्सचा प्रसिद्ध लक्झरी ब्रॅण्ड हर्मेस आहे, ज्यात सहा पिढ्या आणि १०० पेक्षा जास्त सदस्य आहेत.

**कोच कुटुंब (अमेरिका) :** १४८.५ अब्ज डॉलर्स संपत्तीसह पाचवे स्थान आहे. हे कुटुंब अमेरिकेतील तेल उद्योगाशी संबंधित आहे.

#### भारतीय कुटुंबांची क्रमवारी



**अंबानी कुटुंब :** ९९.६ अब्ज डॉलर्स संपत्तीसह ८व्या क्रमांकावर आहेत. अंबानी कुटुंबाच्या तीन पिढ्या रिलायन्स इंडस्ट्रीज चालवतात, जी वेगाने विस्तारत आहे.



**मिस्त्री कुटुंब :** ४१.४ अब्ज डॉलर्स संपत्तीसह २३ व्या क्रमांकावर आहे. मिस्त्री कुटुंबीय पाच पिढ्यांपासून शापूरजी पालोनजी ग्रुपचे नेतृत्व करीत आहेत.

#### जागतिक अब्जाधीशांच्या एकूण संपत्तीत वाढ

**ब्लूमबर्गच्या अहवालात असे दिसून आले की, २०२४ मध्ये जगभरातील अब्जाधीशांची एकूण संपत्ती ४०६.५ अब्ज डॉलर्सने वाढली आहे. वॉल्टन कुटुंबाचे हे वाढते वर्चस्व आणि भारतीय कुटुंबांची क्रमवारी हे स्पष्ट करते की, जागतिक स्तरावर आर्थिक शक्तीचे केंद्र सतत बदलत आहे.**

# आता एटीएममधून काढता येणार ५० टक्के पीएफ

पीएफ एम्प्लॉईज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन (ईपीएफओ) ग्राहकांना बँकिंगसारखी सेवा देण्याच्या योजनेवर काम करीत आहे. नवीन तरतुदींनुसार, भविष्य निर्वाह निधी (पीएफ)च्या एकूण ठेव रकमेपैकी ५० टक्के रक्कम एटीएमद्वारे काढता येणार आहे.

पुढील वर्षीपासून ही सेवा सुरू होण्याची शक्यता केंद्रीय कामगार सचिव सुमिता डावरा यांनी व्यक्त केली.डावरा यांनी सांगितले की, नवीन प्रणालीत ईपीएफओ सदस्यांचे निधन झालेल्यांचे वारस देखील क्लेम सेटलमेंटनंतर एटीएममधून पैसे काढू शकणार आहेत.

पीएफ काढण्याच्या नियमांनुसार, जर एखाद्या सदस्याची नोकरी गेली, तर तो १ महिन्यानंतर पीएफ खात्यातून ७५ टक्के पैसे काढू शकतो. याद्वारे तो बेरोजगारीच्या काळात त्याच्या गरजा पूर्ण करू शकतो. पीएफमध्ये जमा केलेली उर्वरित २५ टक्के रक्कम नोकरी सोडल्यानंतर दोन महिन्यांनी काढता येते.



# शिवसैनिकांनी मनपा निवडणुकीच्या तयारीला लागावे : प्रा. दासरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील शिवसैनिकांनी आगामी मनपा निवडणुकीस पूर्ण ताकदीने सामोरे जाण्यास सज्ज रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख प्रा. अजय दासरी यांनी शहर उत्तरच्या बैठकीत केले.

शहर प्रमुख महेश धाराशिवकर यांनी सराफ कट्टा येथील हॉलमध्ये झाली. जिल्हा प्रमुख अजय दासरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीचे शहरप्रमुख महेश धाराशिवकर यांनी प्रास्ताविक केले. बैठकीत उपस्थित पदाधिकार्यांनी मागील विधानसभा निवडणुकीतील सर्व घडामोडींवर चर्चा केली, शिवसेना उमेदवारांच्या पराभवाला आघाडीचे घटक पक्ष जबाबदार असून, आगामी मनपा निवडणूक शिवसेना स्वबळावर लढवावे व सामान्य निष्ठावंत शिवसैनिकाला उमेदवारी द्यावी असा ठरावही केला. तसेच यापुढे नागरि सम स्येवर विविध आंदोलन कार्यक्रम घेऊन सतत लोकांच्या संपर्कात राहून मशाल चिन्ह घरोघरी पोचविण्याचे कार्य करावे असे ठरले. शहरातील अवैध धंदे वाढत आहेत त्यावर पोलीस प्रशासन त्वरित कारवाई करावे असे पोलीस आयुक्ताना निवेदन देण्याचे ठरले.

याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, निवडणूक यंत्रणाप्रमुख शशिकांत बिराजदार, विद्यापीठप्रमुख लहू गायकवाड, उपशहरप्रमुख संताजी भोळे, शिवा ढोकळे, दत्त खलाटे, उज्चल दीक्षित, सुरेश जगताप, ओंकार चव्हाण, जगदीश कलकेरी, शुभम स्वामी, बंटी बेलमकर, विष्णू भिसे, ज्ञानू जगताप आदी उपस्थित होते.

# टोयोटाची पहिली इलेक्ट्रिक कार अर्बन क्रूझर-ईव्ही नावाने येणार

टोयोटाची पहिली इलेक्ट्रिक कार अर्बन क्रूझर ईव्ही नावाने येईल. इलेक्ट्रिक एसयूव्ही एकदा पूर्णपणे चार्ज केल्यानंतर ५५० किलोमीटरची रेंज मिळेल. जागतिक बाजारपेठेत इलेक्ट्रिक एसयूव्हीची उत्पादन आवृत्ती उघड केली आहे. त्याची कन्सेप्ट गेल्या वर्षी सादर करण्यात आली होती.



टोयोटा ही इलेक्ट्रिक एसयूव्ही युनायटेड किंगडममध्ये २०२५ च्या तिसऱ्या तिमाहीत लॉन्च करेल. त्यानंतर २०२५ च्या अखेरीस ती भारतात येऊ शकते. त्याची किंमत २३ लाख रुपये (एक्स-शोरूम) असू शकते. एमजी झेडएस ईव्ही, टाटा कर्व्ह ईव्ही आणि आगामी ह्युंदई क्रेटा ईव्हीशी स्पर्धा करेल.

कारची एकूण बॉडी स्ट्रक्चर ई-विटारासारखीच आहे, परंतु तिचा फ्रंट प्रोफाईल मारुती ई-विटारापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. कंपनीने अद्याप कारची प्रमाणित श्रेणी उघड केलेली नाही, परंतु पूर्ण चार्ज झाल्यावर तिची श्रेणी ५५० किमीपर्यंत असू शकते, जी ई-विटारापेक्षा १५० किमी जास्त आहे. कारला २ व्हील ड्राईव्ह आणि ४ व्हील ड्राईव्हचा पर्याय देखील दिला जाईल.

# डिजिटल प्लॅटफॉर्मवर कर लावणार ऑस्ट्रेलिया

ऑस्ट्रेलिया सरकार आता सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर कर लावणार आहे. प्रमुख डिजिटल प्लॅटफॉर्म आणि बातम्यांसाठी पैसे न देणाऱ्या सर्च इंजिनांवर कर लादणार आहेत. जोपर्यंत ते ऑस्ट्रेलियन वृत्त माध्यम संस्थांसोबत महसूल सामायिक करण्यास सहमती देत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर कर आकारला जाईल.

सहायक अर्थमंत्री स्टीफन जोन्स आणि दळणवळण मिशेल रौलँड यांनी सांगितले की, १ जानेवारीपासून ऑस्ट्रेलियातील वार्षिक महसूल १.६० कोटी



डॉलर्सपेक्षा जास्त कमावणाऱ्या कंपन्यांवर कर लागू केला जाईल. यात मेटा, गुगल, अल्फाबेट आणि बाईटडान्ससारख्या बड्या कंपन्यांचा समावेश आहे.

हा कर ऑस्ट्रेलियन मीडिया संस्थांना दिलेल्या पैशाची भरपाई करेल. मात्र, किती कर आकारला जाणार, हे सांगण्यात आले नाही. या मागचा उद्देश महसूल वाढवणे नाही, असे जोन्स यांनी पत्रकारांना सांगितले. मेटा, फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपच्या मालकीची कंपनी, ऑस्ट्रेलियन वृत्त प्रकाशकांना त्यांच्या सामग्रीसाठी पैसे देण्यासाठी तीन वर्षांच्या कराराचे नूतनीकरण करणार नाही, अशी घोषणा केली. यानंतर सरकारने हे पाऊल उचलले. ऑस्ट्रेलियाने २०२१ मध्ये एक कायदा लागू केला, यामुळे या कंपन्यांसाठी महसूल करार अनिवार्य केले. तसे न केल्यास दंडाचीही तरतूद आहे.

## अग्रलेख...

# जॉर्ज सोरोस संबंधावरून काँग्रेसची अडचण

सध्या संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. सुरुवातीपासूनच हे अधिवेशन सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यात खडाजंगी होण्यावरून गाजत आहे. त्यातच अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमधील कथित संबंधांच्या मुद्यावरून संसदेचे कामकाज अलिकडे पुन्हा एकदा विस्कळीत झाले. या मुद्यावर भाजपा सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहे. या मुद्यावर चर्चेची मागणी करत त्यांनी संसदेत गोंधळ घातला. एका पत्रकार परिषदेत भाजपाने आरोप केला की, काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी या जॉर्ज सोरोस फाऊंडेशनला निधी पुरवत असलेल्या संस्थेशी संबंधित आहेत. त्या फाऊंडेशनने काश्मीरच्या स्वतंत्र राष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. हे संबंध भारताच्या अंतर्गत बाबींवर विदेशी संस्थांचा प्रभाव दर्शवतात. तसेच 'ऑर्गनाइज्ड क्राईम ॲण्ड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट' आणि हंगेरियन-अमेरिकन व्यापारी जॉर्ज सोरोस याने भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी आणि मोदी सरकारला बदनाम करण्यासाठी विरोधकांशी संगनमत केले आहे, असा आरोपही भाजपाने केला. फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक (एफडीएल-एपी) फाऊंडेशनच्या सहअध्यक्ष म्हणून सोनिया गांधी जॉर्ज सोरोस फाऊंडेशनद्वारे अर्थसाहाय्यित संस्थेशी संबंधित असल्याचा दावा भाजपाने केला आहे. पक्षाच्या मते 'एफडीएल-एपी फाऊंडेशन'ने काश्मीर हा वेगळा प्रदेश मानला जावा असे मत व्यक्त केले आहे. सोनिया गांधी आणि काश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्याच्या कल्पनेला पाठिंबा देणारी संघटना यांच्यातील हे संबंध भारताच्या अंतर्गत घडामोडींवर विदेशी संस्थांचा प्रभाव आणि अशा संबंधांचे राजकीय परिणाम दर्शवतात.

भाजपाने दावा केला की, राजीव गांधी फाऊंडेशनच्या अध्यक्षपदामुळे सोनिया गांधींची जॉर्ज सोरोस फाऊंडेशनशी भागीदारी झाली. ती भारतीय संस्थांवर विदेशी निधीचा प्रभाव दर्शवते. या मुद्यावर भाजपाचे सुधांशू त्रिवेदी यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगितले. हा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. परकीय शक्तींशी असलेल्या काँग्रेस पक्षाच्या या भागीदारीमुळे देशाची सुरक्षा धोक्यात आली आहे. काँग्रेसचे माजी नेते नटवर सिंह यांनीही सोनिया गांधी यांना उद्देशून, पक्षात विदेशी शक्ती सक्रिय आहेत, असे लिहिले होते. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी जाहीरपणे जॉर्ज सोरोसचा जुने मित्र असा उल्लेख केला होता. या पृष्ठभूमीवर सोरोस हे सध्या भारतीय राजकारणात वादाचा विषय झाले आहेत. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे किंवा सोनिया गांधी आणि सोरोस यांच्यावर पहिल्यांदाच आरोप होत आहेत असे नाही. भारतीय जनता पक्षाने गांधी कुटुंबासह काँग्रेस पक्ष आणि त्यांचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी सोरोसचे नाव घेतले. भाजपाने राहुल गांधी देशद्रोही असल्याचा आरोप केला आणि काँग्रेस पक्ष कथितपणे भारताविरुद्ध सोरोस याचा अजेंडा पुढे रेटत असल्याचा आक्षेप घेतला. भाजपाचे हे आरोप जॉर्ज सोरोस याच्याशी संबंधित वादांच्या जागतिक गाथेतील एक उदाहरण आहे. 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ) च्या माध्यमातून त्याच्या आर्थिक शोषणापासून परोपकारी उपक्रमांपर्यंत सोरोस प्रशंसा आणि टीका या दोन्हींच्या केंद्रस्थानी आहेत. सोरोस याचा जन्म १२ ऑगस्ट १९३० रोजी हंगेरीच्या बुडापेस्ट येथे झाला. नाझी राजवटीत तो ज्यू कुटुंबात वाढला. तो आपली ओळख लपवून होलोकॉस्ट (नाझी जर्मन केलेले ज्यूंचे राज्य-प्रायोजित हत्याकांड) मधून वाचला आणि नंतर इंग्लंडला गेला. त्याने 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मध्ये शिक्षण घेतले आणि तत्त्वज्ञ कार्ल पॉपर आणि त्यांच्या ओपन सोसायटीच्या विचारांनी खूप प्रभावित झाला. १९७० मध्ये सोरोसने सोरोस फंड मॅनेजमेंट या हेज फंडची स्थापना केली. त्यातून त्याला प्रचंड संपत्ती मिळाली. त्याची सर्वांत वादग्रस्त आर्थिक चाल १९९२ मध्ये आली, जेव्हा त्याने ब्रिटिश पौंडविरुद्ध पैज लावली आणि एका दिवसात एक अब्ज पौंडपेक्षा जास्त कमाई केली. यामुळे त्याला 'द मॅन हू ब्रोक द बँक ऑफ इंग्लंड' असे टोपणनाव मिळाले.

'ओपन सोसायटी फाऊंडेशन'च्या माध्यमातून सोरोसने जगभरातील लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसाठी ३२ अब्ज डॉलरहून अधिक देणगी दिली आहे. त्याच्या फाऊंडेशनने कम्युनिस्टोत्तर युरोपमधील नागरी समाज प्रकल्पांना तसेच अमेरिका आणि इतरत्र प्रगतिशील चळवळींना निधी दिला आहे. सोरोसने हुकूमशाही शासन, उत्पन्न असमानता आणि हवामानबदल या मुद्यांवरही आवाज उठवला आहे. तथापि, विरोधकांचा युक्तिवाद आहे की सोरोस आपली संपत्ती राजकीय कथांना आकार देण्यासाठी आणि परोपकाराच्या नावाखाली सार्वभौमत्व हडपण्यासाठी वापरत आहे. २०२० मध्ये, दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मधील भाषणादरम्यान सोरोसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर उघडपणे टीका केली. तेव्हापासून तो भाजपाच्या रडारवर आहे. सोरोसने नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० निष्प्रभ करण्यावर टीका केली आणि मोदी सरकारवर फूट पाडणारी धोरणे राबवल्याचा आरोप केला. जागतिक स्तरावर लोकशाहीला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी नेत्यांपैकी एक या शब्दांमध्ये त्याने मोदी यांचा उल्लेख केला. त्याच्या वक्तव्यावर भारतीय नेते आणि टीकाकारांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. भारताच्या देशांतर्गत व्यवहारात परकीय हस्तक्षेप असल्याची त्याची टिप्पणी भाजपाने स्पष्टपणे नाकारली. सोरोसच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ)वर भारतातील सरकारी धोरणांचा विरोध करणाऱ्या 'एनजीओ' आणि कार्यकर्त्यांना निधी पुरवल्याचा आरोप आहे. त्याच्या संस्थेने 'सीएए' आणि २०२० च्या कृषी कायद्यांविरोधातील निदर्शनांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याचा आरोप आहे. काही भारतीय समालोचक आणि उजव्या विचारसरणीच्या गटांनी दावा केला आहे की, सोरोसचा निधी अप्रत्यक्षपणे खलिस्तान राज्याचा पुरस्कार करणाऱ्यांसह फुटीरतावादी चळवळींना समर्थन देतो. या दाव्यांचे थेट पुरावे नसले, तरी आरोपांमुळे भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणारा म्हणून सोरोसची प्रतिमा मजबूत झाली आहे. 'ओएसएफ'सारख्या संस्थांच्या कथित विदेशी हस्तक्षेपाला प्रतिसाद म्हणून भारत सरकारने 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट'अंतर्गत नियम कडक केले आहेत. विदेशी निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी अनेक स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भाजपा सातत्याने सोरोसचा संबंध काँग्रेस पक्षाशी जोडते आहे. राहुल गांधी हे भारताला अस्थिर करण्याच्या सोरोसच्या अजेंड्याशी संबंधित असल्याचा आरोप भाजपाने केला आहे.

राहुल गांधी यांना सर्वोच्च देशद्रोही संबोधत भाजपाने देशांतर्गत राजकीय असंतोषाला परकीय हस्तक्षेपाशी जोडण्याचा प्रयत्न केला असून सोरोसला या कथित षडयंत्रातील प्रमुख खेळाडू मानले आहे. सोरोसच्या आर्थिक कारनाम्यांमध्ये १९९२ च्या 'ब्लॅक वेन्सडे क्रायसिस'चाही समावेश आहे. त्यासाठी त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. पैसा कमावण्यासाठी विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था अस्थिर केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. १९९७ च्या आशियाई आर्थिक संकटादरम्यान सोरोसवर चलन व्यापाराद्वारे आर्थिक अस्थिरता वाढवल्याचा आरोप होता. त्याच्यावर इमिग्रेशन, 'एलजीबीटीक्यू' अधिकार आणि इतर देशांमधील सरकारविरोधी निदर्शकांना निधी देऊन राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. हंगेरी आणि रशियासारख्या देशांनी त्याच्यावर त्यांच्या देशांतर्गत राजकारणात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे, तर उजव्या विचारसरणीचे नेते त्याला जागतिक स्तरावर राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी धोका मानतात. सोरोस अनेकदा कट सिद्धांतांच्या केंद्रस्थानी असतो. गौतम अदानीबाबत सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणारी काँग्रेस सोरोसच्या मुद्यावर अलिकडे कोंडीत सापडली. सोरोसच्या निमित्ताने भाजपाने काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाला अडचणीत आणले आहे. असे असताना भविष्यात जॉर्ज सोरोस आणि सोनिया गांधी यांच्या संबंधाचे उत्तर काँग्रेसला द्यावेच लागेल.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बांगलादेशची नवी चाल!



भारत प्रामाणिकपणे बांगलादेशासोबतचे संबंध पूर्ववत् करण्याचा जोरदार प्रयत्न करीत असताना, बांगलादेश मात्र हे संबंध अधिक बिघडविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे आता स्पष्ट होऊ लागले आहे. बांगलादेशातील हिंदूंवर हल्ले केले असताना बांगलादेशने एक मोठा निर्णय घेत भारताला एक प्रतिकूल संदेश दिला आहे. बांगलादेश दूरसंचार नियामक आयोगाने भारताशी झालेला एक करार रद्द करण्याचा निर्णय घोषित केला आहे. पूर्वोत्तर भागाचा उर्वरित भारताशी संपर्क वाढविण्यासाठी बांगलादेशाला लागून असलेल्या भागात काही दूरसंचार मनोरे उभारण्याचा करार दोन्ही देशांत काही महिन्यांपूर्वी करण्यात आला होता. याचा भारताला होणारा मोठा फायदा म्हणजे पूर्वोत्तर भागातील कमकुवत दूरसंचार व्यवस्था बळकट होणार होती. बांगलादेशने हा करारच रद्द करून भारताला मोठा धक्का दिला आहे.

**चीनचा हात?** : बांगलादेश आपल्या अंतर्गत मामल्यांमध्ये गुंतला असताना, त्याने नेमका हा करार रद्द करण्याचा निर्णय करावा यामागे चीन असल्याचे म्हटले जात आहे. भारताच्या पूर्वोत्तर भागावर चीनचा डोळा असल्याचे मानले जाते. बांगलादेशचा ताजा निर्णय केवळ चीनच्या सांगण्यावरून केला गेला असल्याचे भारताला वाटत आहे. भारताने पूर्वोत्तर भागाशी आपला संपर्क वाढवू नये अशी चीनची इच्छा राहात गेली आहे. कारण यातील काही आपला असल्याचा दावा चीन अनेक वर्षांपासून करीत आहे. बांगलादेशने चीनची ही भूमिका विचारात घेऊनच हा निर्णय केला असल्याचे मानले जाते.

**सिंगापूरची कंपनी** : भारत-बांगलादेश यांच्यात अखरुआ भागातून भारताला वेगवान दूरसंचार व्यवस्था करून देण्यासाठी सिंगापूरच्या दोन कंपन्या, भारतीय कंपनी भारती टेलिकॉम व बांगलादेश दूरसंचार आयोग यांच्यात एक करार करण्यात आला होता. या कराराचा भारताला फायदा होणारच आहे; बांगलादेशाला मात्र कोणताही आर्थिक फायदा होणार नाही, असे सांगून बांगलादेशने हा करार रद्द करण्याची घोषणा केली आहे.

**दोन कंपन्या** : सिंगापूरमधील समिट कम्युनिकेशन्स व फायबर एट होम या कंपन्यांच्या माध्यमातून हे काम केले जाणार होते. विशेष म्हणजे या कंपन्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या जवळच्या मानल्या जातात. या दोन्ही कंपन्यांचे प्रमुख मोहम्मद फरीद खान हे असून ते शेख हसीना यांच्या अवामी लीगचे खासदार फारीख खान यांचे लहान बंधू आहेत. म्हणजे एकीकडे शेख हसीना यांना संदेश देणे व दुसरीकडे चीनची मागणी पूर्ण करणे ही दोन उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे मानले जाते. शेख हसीना यांना भारताने आश्रय देणे बांगलादेशला आवडलेले नाही. भारताने शेख हसीना यांना बांगलादेशकडे सोपवावे; जेणेकरून त्यांच्यावर विविध गुन्ह्यांखाली खटला चालविता येईल, अशी बांगलादेश सरकारची भूमिका राहिलेली आहे. भारताने ही मागणी नाकारून योग्य निर्णय घेतला आहे. भारताने शेख हसीना यांना सरकारी आश्रय देत त्यांच्या सुरक्षेची पूर्ण व्यवस्था केली आहे.

**हिंदूंवर हल्ले** : बांगलादेशातील हिंदूंवर पुन्हा जे सुनियोजित हल्ले केले जात आहेत ते भारताची चिंता वाढविणारे आहेत. भारताने याबाबत आपली भूमिका बांगलादेश सरकारकडे नोंदविली असली, तरी हा आमचा अंतर्गत मामला असल्याचे बेदरकार उत्तर बांगलादेशने दिले आहे. भारताच्या परराष्ट्र सचिवांनी नुकतीच बांगला देशला भेट देत तेथील नेत्यांशी झालेल्या चर्चेत हिंदूंवरील अत्याचाराचा, हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला. बांगलादेशातील सत्तांतरानंतर लगेचच काही हिंदू मंदिरांवर हल्ले करण्यात आले होते. त्यावेळी बांगलादेशचे कार्यकारी प्रमुख मोहम्मद युनूस यांनी योग्य भूमिका घेत या हल्ल्यांचा निषेध केला होता. आता त्यांची 'ती' भूमिका राहिलेली नाही असे दिसते. बांगलादेशच्या बोलण्यात-वागण्यात आलेला मुजोरपणा भारताच्या नजरेतून सुटलेला नाही. चीनच्या पाठिंब्याशिवाय बांगलादेश हे करू शकत नाही, याची स्पष्ट कल्पना भारत सरकारला आली आहे. यामुळे बांगलादेशशी संबंध सुधारण्याऐवजी ते अधिक कमजोर होत असल्याचे भारताला वाटत आहे.

**साखर आयात** : एक काळ होता बांगलादेश व पाकिस्तान यांच्यातून विस्तव जात नव्हता. बांगलादेशची निर्मितीच मुळी पाकिस्तान विरोधाच्या मुद्यावर झाली होती. सध्याचा पाकिस्तान म्हणजे पश्चिम पाकिस्तानवर पंजाबींचा पगडा होता तर बांगलादेशवर म्हणजे पूर्व पाकिस्तानवर बंगाल संस्कृतीचा पगडा होता. त्यातूनच दोन्ही देशांतील वैर वाढत गेले आणि त्याचे पर्यवसान पाकिस्तानचे दोन तुकडे होण्यात झाले होते. १९७१ मधील पाकिस्तानच्या विभाजनानंतर दोन्ही देशांतील संबंध कधीच मधुर राहिले नव्हते. शेख हसीना यांचे सरकार उलथवून पाडण्यात आल्यानंतर मात्र या दोन देशांतील संबंधात अचानक गोडवा आला आहे असे दिसते. पाकिस्तानने बांगलादेशातील साखरेचा तुटवडा दूर करण्यासाठी या देशाला साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पाकिस्तानी साखर बांगलादेशात पोहोचू लागली आहे. बांगलादेश व पाकिस्तान यांच्यातील व्यापार वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न बांगलादेशातील हंगामी सरकार करीत असल्याचे दिसून येत आहे.

**चीनचा पाठिंबा** : पाकिस्तानला चीनचा पाठिंबा आहे हे तर आता साऱ्या जगाला माहीत झाले आहे. मात्र, बांगलादेशात झालेल्या सत्तांतरात चीनच्या सहभागाचे ठोस पुरावे अद्याप समोर आलेले नाहीत. चीनच्या सक्रिय सहभागाशिवाय बांगलादेशात एवढी मोठी उलथापालथ होणे शक्य नव्हते, असे मानले जाते.

**आणखी काही करार** : बांगलादेश दूरसंचार नियामक आयोगाने भारतासोबत असणारा करार रद्द करण्याची घोषणा केली आहेच. येणाऱ्या काळात असे आणखी काही करार रद्द करण्याची घोषणा बांगलादेश सरकारकडून केली जाण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे बांगलादेशातील अनेक पायाभूत प्रकल्पांमध्ये भारतीय कंपन्या काम करीत आहेत. त्यांनाही काम करणे अवघड होईल, अशी स्थिती या देशात तयार केली जाण्याची शक्यता आहे. हे सारे ठेके नंतर चिनी कंपन्यांना दिले जातील, असे मानले जाते.

**मोठे आव्हान** : बांगलादेश आजवर भारताचा साथीदार राहिला आहे. पाकिस्तान, नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान, श्रीलंका यांनी अप्रत्यक्षपणे चीनचे मांडलिकत्व पत्करले असतानाही बांगलादेशने भारताची साथ सोडली नव्हती. मात्र, शेख हसीना यांचे सरकार उलथविल्यानंतर तेथे सत्तेवर आलेल्या नव्या सरकारने भारतविरोधी निर्णय घेण्याची एक मालिका जणू सुरू केली आहे. ही मालिका खंडित करून दोन्ही देशातील संबंध पुन्हा सुरळीत करण्याचे मोठे आव्हान भारतासमोर उभे ठाकले आहे.

**एकमेव आशा** : बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्यात भारताने बजावलेली भूमिका बांगलादेशी नागरिक विसरणार नाहीत. सत्तांतराचा धुरळा खाली बसल्यानंतर आपला खरा मित्र कोण आणि शत्रू कोण हे बांगलादेश नागरिकांच्या लक्षात येईल आणि दोन्ही देशांतील संबंधात आलेला दुरावा दूर होईल, अशी आशा भारताला वाटत आहे. बांगलादेश सरकार, पाकिस्तान व चीन यांनी भारतविरोधी भूमिका घेण्याचा सपाटा लावला आहे. अशा स्थितीत बांगलादेशची जनता हाच भारतासाठी आशेचा एकमेव किरण आहे. असेच मालदीवमध्ये झाले होते. स्थानिक जनतेच्या दबावामुळे मालदीव सरकारला भारताशी जुळवून घ्यावे लागले होते. अशीच स्थिती बांगलादेश सरकारसाठी तयार व्हावी, अशी आशा करण्याव्यतिरिक्त आज तरी भारताच्या हाती काहीही नाही.

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# कापूस खरेदीत खाजगी व्यापाऱ्यांची मक्तेदारी!

अतिप्रमाणात गोड पदार्थांचे सेवन केले तर मधुमेहाला आमंत्रण दिल्यासारखी कृती घडते. परिणामी संबंधितांना गोड पदार्थ आहारातून दूर सारावे लागतात. हाच प्रकार मक्तेदारीतही होतो. तसे पाहता मक्तेदारी कुठल्याही क्षेत्रात असो, त्यामुळे सामान्य माणूस मेटाकुटीला येतो आणि त्यातूनच पुढे संघर्ष उभा राहतो. हाच संघर्ष आता कापूस खरेदी विक्रीच्या व्यवहारात उद्भवला आहे. रात्रंदिवस मेहनत करणारा शेतकरी जेव्हा कापूस विकायला जातो, तेव्हा त्याला उत्पादन खर्चाच्या तुलनेत नफा मिळायला हवा. पण नफा सोडा तोट्यातच त्याला कापूस विकावा लागतो. हा सर्व प्रकार पाहता कापूस खरेदीच्या व्यवहारात खाजगी व्यापाऱ्यांची वाढत असलेली मक्तेदारी मोडीत काढायची वेळ आता आलेली आहे. पण ही मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी भारत सरकारच्या सहकार्याची गरज आहे. त्याशिवाय मक्तेदारी मोडीत काढणे अशक्यप्राय आहे.

महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळावा म्हणून ऑगस्ट १९७२ मध्ये एकाधिकार कापूस खरेदी योजना कार्यान्वित झाली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यात प्रमुख अभिकर्ता म्हणून कार्य करीत होता. दरम्यान याच योजनेत गोंधळ झाला अन् शासनाने ती पद्धत गुंडाळली. पण तेव्हाच दुसरी पर्यायी सर्वोत्तम व्यवस्था करून ठेवणे गरजेचे होते. मात्र तसे न केल्याने तेव्हापासून खाजगी व्यापाऱ्यांचे फावले. त्यांनीही मग इस्ट इंडिया कंपनीच्या धर्तीवर संधीचे सोने करीत आपली वेगळी दुकानदारी थाटली. आज तीच दुकानदारी भारत सरकारने दिलेला हमीभाव मानायला तयार नाही. ते आपल्या मतानुसार भाव देतात अन् शेतकऱ्यांना खुलेआम लुटतात. इतर विषयांवर आंदोलन करणारे यावर मात्र बोलणे टाळतात.

दरम्यान, भारत सरकारच्या अखत्यारीतील भारतीय कपास निगम लिमिटेडचे काम काही प्रमाणात चांगले सुरू आहे. पण त्यांच्या केंद्रांची संख्या अपुरी आहे. शिवाय नेमलेले कर्मचारी आळशी आहेत. एवढेच नव्हे तर तेही खाजगी व्यापाऱ्यांच्या दावणीला बांधल्यासारखे वागतात. याचा फटका शेतकऱ्यांनाच बसतो. कर्मचाऱ्यांना नियमित पगार मिळत असल्याने शेतकऱ्याचा कापूस विकला गेला किंवा नाही याच्याशी त्यांना काही देणे घेणे नाही.

याच कारणाने प्रत्यक्षात विदर्भातील बहुतांश तालुक्यात कपाशीचे प्रचंड उत्पादन होत असताना तिथे सीसीआय केंद्रच स्थापित करण्यात आलेले नाही. उदाहरण द्यायचे झाल्यास, आजही नागपूर जिल्ह्यातील पारशिवनीसह रामटेक तालुक्यातील शेतकरी सीसीआय केंद्रापासून वंचित आहेत. याचाच गैरफायदा खाजगी व्यापारी घेतात आणि कमी भावात शेतकऱ्यांकडून कपाशीची खरेदी करून त्यांची पिळवणूक करीत आहेत. हा सर्व प्रकार पाहता पारशिवनीत आता सीसीआयचे केंद्र सुरू करावे, याकरिता शेकडो कापूस उत्पादक प्रगतिशील शेतकरी सुधाकर मेंघर यांच्या नेतृत्वात समोर आले आहेत.

भारत सरकारने २९ जुलै २०२४ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार मध्यम लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ७१२१ रुपये घोषित केला. तर लांब धागा कपाशीसाठी ७५२१ रुपये ठरला. प्रत्यक्षात खाजगी व्यापाऱ्यांनी आतापर्यंत जो काही कापूस खरेदी केला, त्याकरिता त्यांनी प्रति क्विंटल केवळ ७१०० रुपये भाव दिला. तो भाव हमीभावापेक्षाही कमी आहे. प्रत्यक्षात शेतकऱ्याला तेवढा भाव मिळतच नसल्याने तो रडकुंडीला आला आहे. वस्तुतः स्पर्धा झाल्यास तोटा होणार नाही हाच प्रकार पूर्वी सरकारमधील मंडळी सांगायचे. त्यांनीच स्पर्धायुक्त वातावरण निर्मित केले. पण आज सत्ताधारी मंडळी सरकारी केंद्र बंद करून खाजगी व्यापाऱ्यांना फायदा होईल, असा व्यवहार करीत आहेत. वर्तमान युग स्पर्धेचे आहे. पण पारशिवनी, रामटेक भागात सीसीआयचे केंद्र नसल्याने शेतकऱ्यांना खाजगी व्यापाऱ्यांनाच नाईलाजाने कापूस विकावा लागत आहे. याचाच गैरफायदा खाजगी व्यापारी घेतात आणि कमी भाव देत शेतकऱ्यांची कोंडी करीत आहेत. शेतात पिकलेला कापूस अधिक काळ घरात साठवून ठेवणे शक्य नसते. परिणामी शेतकरी मिळेल तो भाव घेऊन नशिबाला दोष देतात. यावर रामबाण तोडगा काढण्यासाठी तातडीने कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे केंद्र शेतकऱ्यांच्या मागणीनुसार उघडणे काळाची गरज आहे. ही गरज पूर्ण न झाल्यास खाजगी व्यापारी इस्ट इंडिया कंपनीनुसार शेतकऱ्यांना गिळंकृत करतील, हे मात्र नक्की.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# काँग्रेसची काळी कृती



नुकताच सुप्रीम कोर्टाने देशभरात प्रलंबित असलेल्या विविध मंदिरांच्या संबंधात याचिकांवर सुनावणी करण्यास खालच्या न्यायालयांना मनाई केली आहे. त्यामध्ये सुप्रीम कोर्ट म्हणते की, कुठल्याही प्रकारचे नवीन सर्वेक्षण कुठल्याही मंदिर-मशीद विवादामध्ये केले जाऊ नये. १९९१ मध्ये काँग्रेसने 'प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट' हा पूजा स्थळांशी संबंधित एक कायदा आणला होता; ज्यामध्ये असे म्हटले आहे की, सर्व धार्मिक स्थळांची परिस्थिती १९४७ प्रमाणे राहील; त्यामध्ये कुठलाही बदल करण्यात येऊ नये. आपल्या सर्वांना माहीत आहे की, या देशावर शेकडो वर्षे मुसलमानांचे विविध राज्यांमध्ये राज्य होते. मुसलमान हे मूर्तिभंजक होते. त्यामुळे त्यांनी ज्या ज्या ठिकाणी हल्ले केले त्या ठिकाणची देवालये उद्ध्वस्त केली. देवांच्या मूर्ती तोडल्या. अनेक ठिकाणी ते संपूर्णतः देवालयांना उद्ध्वस्त करू शकले नाही म्हणून त्यांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्यामध्ये थोडेफार बदल करून त्याचे मशिदीमध्ये रूपांतर केले. १९४७ पासून आजपर्यंत हिंदू आपल्या देवालयांना प्राप्त करण्यासाठी विविध न्यायालयांमध्ये खटले लढत आहे. या सर्व खटल्यांमध्ये विजय हिंदूंचाच होणार, हे निश्चित असल्यामुळे काँग्रेसने मुसलमानांना खूश करण्यासाठी प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट १९९१ मध्ये पारित केला; ज्यामुळे सर्व धार्मिक स्थळांची जी स्थिती १९४७ च्या आधी होती तीच परिस्थिती कायम ठेवण्यात यावी, असे हा कायदा म्हणतो.

विश्वाचा इतिहास बघितला तर सर्वच देशांनी त्यांच्या देशामध्ये आक्रमकांनी उभ्या केलेल्या गुलामीच्या निशाण्या किंवा आक्रमणाच्या निशाण्या पूर्णपणे उद्ध्वस्त केल्या आणि त्या ठिकाणी राष्ट्रीय गौरवाची प्रतीके उभी केली. बाबराचा सेनापती मिरबाकी याने अयोध्येच्या रामजन्मभूमीवर असलेले मंदिर तोडले होते. त्याचप्रमाणे औरंगजेबाने काशी विश्वनाथ मंदिर भ्रष्ट करण्याचा आदेश दिला होता. काशी विश्वनाथाच्या बाजूला असलेली ज्ञानवापी मशीद हा मंदिराचा भाग आहे तर कृष्ण जन्मभूमीमध्ये उभी असलेली मशीद मंदिराचा भाग आहे. उत्तरप्रदेशातील जौनपूर येथील अटला देवीचे मंदिर तोडून तेथे १४ व्या शतकात मशीद बांधण्यात आली होती. उत्तरप्रदेशच्या बदायू येथे बांधण्यात आलेली शमशी जामा मशीद ही नीलकंठ महादेवाचे मंदिर तोडून १३ व्या शतकामध्ये ती बांधली होती. लखनौ येथे असलेली टिलेवाली मशीद टिलेश्वर महादेवाचे मंदिर तोडून औरंगजेबाने बनविली होती. मध्यप्रदेशातील धार येथे भोज शाळेमध्ये वाग्देवीचे मंदिर होते. ते मंदिर तोडून येथे कमल मौला मशीद बनविण्यात आली होती. न्यायालयाने या मशिदीचे सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला होता, परंतु नंतर तो थांबविण्यात आला. अजमेर येथे असलेल्या मोईनुद्दीन चिस्ती यांच्या दरगाहच्या आधी तेथे शिवमंदिर होते अशा पद्धतीचा दावा हिंदू पक्षांच्याद्वारे केला जात आहे. कर्नाटक येथील चिकमंगलूर येथे भगवान दत्तात्रेयाचे मंदिर आहे. त्याला लागूनच बाबा बुधन यांचा दरगाह आहे. १९७० मध्ये काँग्रेस सरकारने ही जागा वक्फ बोर्डाला दिली होती. त्यानंतर तेथे भरपूर वाद झाला. न्यायालयामध्ये खटला उभा राहिला. १९८० साली न्यायालयाने निर्णय दिला की, ही जागा वक्फ बोर्डाची नाही. दत्त मंदिराचा भाग पाडूनच हा दरगाह येथे उभा झालेला आहे. कुतुबमीनार दिल्ली येथे कुव्वत उल इस्लाम नावाची मशीद आहे. या मशिदीच्या परिसरात अनेक छोट्या छोट्या देवी-देवतांच्या मूर्ती असून येथेही मंदिर पाडून मशीद केली गेली असल्याचा हिंदू पक्षाचा दावा आहे. कर्नाटक येथील मंगलोर येथे जुम्मा मशिदीच्या खाली मंदिर आहे, असा पक्षकारांचा दावा आहे. या संदर्भातील याचिका न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे की मशीद अशा पद्धतीचा दावा प्रलंबित आहे.

या सर्वच याचिका प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. परंतु गावोगावी अशी हजारो मंदिरे तोडण्यात आली होती. वास्तविक स्वातंत्र्यानंतर या सर्वच मशिदींचे मंदिरांमध्ये रूपांतर करण्यात यायला हवे होते. मुस्लिमधर्मीय लोकांसाठी वेगळा देश पाकिस्तानची निर्मिती करण्यात आली होती. त्यामुळे किमान भारतामध्ये तोडण्यात आलेल्या मशिदींचे तरी मंदिरांमध्ये रूपांतर करावयास पाहिजे होते. परंतु काँग्रेसला कधी हिंदू-मुस्लिम प्रश्न सुटावा, असे वाटले नाही. त्यामुळे त्यांनी अशा पद्धतीच्या सर्वच गोष्टी सडवत ठेवल्या. सर्वसामान्य भाविकांनी आपापल्या शक्तीनुसार न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या. त्या याचिकांवर कारवाई होऊ नये म्हणून १९९१ मध्ये प्लेसेस ऑफ वर्शिप ॲक्ट हा कायदा काँग्रेसने आणून हिंदूंसोबत विश्वासघात केला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, हिंदूंच्या धार्मिक भावनांबद्दल पूजा करण्याच्या त्यांच्या अधिकाराबद्दल काँग्रेसला काहीही देणे-घेणे नाही. या उलट मुस्लिम तुष्टीकरण करणे व त्याच्या आधारावर एकगठ्ठा मतदान मिळत आपली सत्ता कायम ठेवण्याचेच उद्योग इतकी वर्षे काँग्रेसने केलेले आहे. परंतु आता हा कायदा रद्द झाला पाहिजे, अशी हिंदू समाजाची इच्छा आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे पूजेपासून वंचित असलेल्या ठिकाणी हिंदू समाज पूजा-आरती करू शकेल. देशाच्या संस्कृतीमध्ये या पुरातन मंदिरांचा मोठा सहभाग आहे. आम्ही संस्कृतीचे पूजक आहोत त्यामुळे या मंदिरांवरील हक्क सोडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### पूजेसाठी फुले

मनपाच्या एका बागेत एक सुंदर वाक्य वाचण्यात आले ते असे - 'झाडांना लागलेली फुले झाडांवर सुंदर व मोहक दिसतात, त्यामुळे कृपया कोणीही ही फुले तोडू नयेत.' देवपूजेसाठी जसे हळद, कुंकू, अक्षता, गुलाल, बुक्का, उदबत्ती, आरतीसाठी वाती, कापूर इत्यादी गोष्टी आवश्यक आहेत. तसेच देवाला वाहण्यासाठी फुलेही आहेत. यामध्ये आपल्याला कोणती फुले पाहिजेत? तर तगर, शेवंती, झेंडू, मोगरा, जास्वंद, गुलाब इत्यादी फुले आपण पूजेमध्ये देवाला रोज वाहतो. देवाला आपण जी फुले वाहतो ती तीन ठिकाणांहून आपल्याला मिळतात. एक- घरच्या बगिच्यातील, दुसरे म्हणजे फूल विक्रेत्याकडील व तिसरे म्हणजे रस्त्याच्या बाजूच्या घराच्या कुंपणाला लागून असलेली झाडांची फुलं. खरं तर तिसऱ्या प्रकारातील फुलं देवाला वाहल्याने आपल्याला किती पुण्य मिळतं, याचा विचार व्हायला पाहिजे. सबब देवपूजेसाठी लागणारी फुले, एकतर आपल्या परसबागेतील अथवा फूल विक्रेत्यांकडून विकत घेतलेली असावीत, असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### विरोधी पक्षांचा किती हा बालिशपणा

एक दिवस आधी 'संसद चलने देंगे'' असे विरोधकांनी सांगितले. परंतु प्रत्यक्षात रोज संसदेत व राज्यसभेत गदारोळच सुरू आहे. पहिले लोकसभेचा विचार करूया. अदानी, अदानी करत राहुल गांधींचा पक्ष एक-एक निवडणूक हरत आहे. तरीपण हा मुद्दा कोण्या शहाण्याने त्यांच्या डोक्यात भरवला देव जाणे. काँग्रेस पक्षाची धूळधाण होत असताना, इंडिया आघाडीचे नेतृत्व संपुष्टात येत असताना, काँग्रेससोबत हळूहळू सगळे साथ सोडताना आपल्या पक्षाचा विचार न करता केवळ अदानी अदानी हाच ओरडा राहुलबाबा करीत आहे. कदाचित भविष्यात चुकून सारे एकवटून जर हेच लोक सत्तेत आले तर त्याच अदानीसोबत विविध करार करतील, कारण त्याला पर्याय नाही. एवढे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर आज अदानी, अंबानीशिवाय कोणीच देऊ शकत नाही. काँग्रेसच्या राज्यातही हे अदानी-अंबानी आहेत. परंतु केवळ संसद चालू न देणे हाच एकमेव उद्देश घेऊन काँग्रेस पक्ष उतरतो. काही लोकांच्या चुकीच्या मतदानाने या पक्षाला थोडी बळकटी प्राप्त झाली त्याचा हा परिणाम दिसतो. बालिशपणे अदानी-मोदीचे मखवटे घालणे. त्यांच्या पिशव्या बाळगणे, उगाचच फुले वाटणे असला बालिशपणा संसदेच्या पायरीवर सध्या सुरू आहे. एक बालिश, अपरिपक्व विरोधी पक्षनेता प्राप्त झाला हे दुर्दैव. तिकडे राज्यसभेचा तालच वेगळा. तेथे केवळ अध्यक्ष, उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांचाच विरोध सुरू आहे. त्यासाठी कोमट पाणी पिऊन खडगे साहेब रोज येत आहे. 'आम्हाला बोलू देत नाही' असे म्हणत सतत तेच बोलत आहे. एकही सकारात्मक चर्चा संसदेच्या दोन्ही सभागृहांत झाली नाही. विरोधी पक्षांचा केवळ विरोधच करायचा आहे हे यावरून दिसून येते. त्यांचा सगळा खेळ हा पुढे येणाऱ्या लोकसभेकडे दिसतो. देशाची संसद न चालणे हा जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे व जनता तो ओळखून आहे. तेव्हा विरोधी पक्षांनी आत व बाहेर ओरडून 'एन्जॉय' करावा कारण एवढेच त्यांच्या नशिबी आहे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

## वाचक पत्रे

### स्वतःसह देशहिताचा निर्णय घेतला पाहिजे

कडाक्याच्या थंडीत स्वतःच्या घराला आग लावून शेकत बसणे म्हणजे त्यावर उपाय नव्हे. आजघडीला राज्याच्या व देशाच्या या विशाल अशा या वटवृक्षाला वाईट गोष्टी, व्यसनासारख्या या महाभयंकर किडीने पोखरत पोकळ व कमकुवत करत आहे.

अशा या वाईट गोष्टी आणि व्यसनरूपी भस्मासुर राक्षसाला आवर घालण्यासाठी आणि त्याला पायबंद करण्यासाठीची आता वेळ आली आहे. कळतंय पण वळत नाही. अशी भूमिका घेतली तर आपणच आपले कुटुंब खाईत लोटतो असे होईल. आधीच आपण खूप काही गमावलेले आहे. आत्ता बस्स झाले. आता सरकारनेही गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या सर्व जनतेच्या हिताचे असलेले सर्वच निर्णय घेतले पाहिजे.

मोफत आणि फुकटच्या लाडक्या ज्या योजना आहेत त्या बंद करून प्रत्येकाच्या हाताला कामधंदा दिला पाहिजे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. या नवीन वर्षात नवीन योजना आणि धोरण सरू केले पाहिजे. सरकारच्या सर्वच यंत्रणा सतर्क करून राज्याला व देशाला पुढे नेण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. सरकारचे टीव्ही, चित्रपटावरचे, सोशल मीडिया यावरचे नियंत्रण सुटलेले आहे, ते आटोक्यात आणले पाहिजे. आज नको ते डोळ्यासमोर येत आहे. लहान लहान मुले आणि मुली यामुळे फार बिघडत चालली आहेत. जुन्या काळी सारे कुटुंब एकत्र टीव्ही, सिनेमा पाहात होते. पण आता ते पाहणे अवघड झाले आहे. कमी कपडे, नको ते हावभाव अशा अश्लील दृश्यामुळे त्यांच्या मनावर वाईट परिणाम होत आहेत. यासोबतच व्यसनामुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. अनेकजण आत्महत्या करीत आहेत. रस्ते अपघातही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. अशा घटना घडणार नाहीत यावर उपाय योजिले पाहिजेत. यासोबतच फसवणूक, भ्रष्टाचार, लाचखोरी संपुष्टात आणली पाहिजे. स्वतःच्या व देशहितासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न केले पाहिजेत.

**रा. हा. जेठेवाड**/नांदेड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शहरातील मुख्य प्रवेशद्धारांसह आणखी ४८ रस्त्यांची होणार साफसफाई

## महापालिकेच्या विशेष स्वच्छता मोहिमेस १९ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

## आतापर्यंत शहरातील ७९ रस्ते केले चकाचक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मुख्य रस्त्यांच्या विशेष स्वच्छता मोहिमेस दि. १९ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आता शहरातील विविध ठिकाणच्या मुख्य प्रवेशद्वारांसह आणखी ४८ मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यात येणार आहे. आतापर्यंत शहरातील ७९ रस्ते चकाचक करण्यात आले आहेत.

सोलापूर महापलिकेच्या वतीने दि. २ ते १३ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या नियंत्रणाखाली आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.



सोलापुरात दिनांक १३ डिसेंबर पर्यंत ही मोहीम राबविण्याचे नियोजन होते. मात्र शहरातील सर्व मुख्य प्रवेशव्दार तसेच आणखी काही रस्त्यावरही ही मोहीम राबविणेचा संकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यानुसार पुनश्चः दि.१३ ते १९ डिसेंबर २०२४ या कालावधीत शहरातील विविध ठिकाणचे मुख्य प्रवेशद्वार तसेच आणखी ४८ मुख्य रस्ते व परिसर याप्रमाणेच विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

शहरातील मुख्य रस्ते व परिसराची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. त्यास नागरिक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक संघटना, खाजगी संस्थेचे कर्मचारी, कॉलेजचे विद्यार्थी आदींच्या सहभागातून व महानगरपालिकेतील सर्व विभागांकडील मनुष्यबळ व यंत्रणेच्या माध्यमातून शहरातील निश्चित केलेल्या बहुतांश मुख्य रस्ते व भागात ही मोहीम राबविणेत येत आहे. १३ डिसेंबर पर्यंत या मोहिमेअंतर्गत एकूण ७९ मुख्य रस्त्यांची व परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे. हे रस्ते सर्वच बाबतीत चकाचक करण्यात आले आहेत. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी ऑन द स्पॉट जाऊन स्वच्छता कामाची पाहणी केली. आवश्यकता सूचना संबंधित विभाग आणि कर्मचाऱ्यांना वेळोवेळी देत आहेत. यामध्ये रस्त्यांबरोबर परिसर स्वच्छता, दुभाजकाकडील माती काढणे, फुटपाथ वरील अनावश्यक गवत, झाडी तसेच कचरा, डिव्हाईडर मधील लाईट पोल वरील कुजलेले बोर्ड व स्टिकर, डिव्हाईडर मधील झाडांची छाटणी करणे, अतिक्रमण काढणे, तसेच फुटपाथ वरील दोन्ही बाजूची स्वच्छता करण्यात आली. यास शहरवासियांचा अतिशय उत्स्फूर्त व सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. ही मोहीम दैनंदिन कामकाजा व्यतिरिक्त सकाळच्या सत्रात राबविण्यात येणार असून नेमलेले नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली रोज सकाळी सात ते दहा या वेळेत पूर्वी केलेल्या नियोजनाप्रमाणेच हाती घेण्यात येणार आहे.

### रस्ते स्वच्छतेमुळे नागरिकांतून समाधान

सोलापूर महापालिकेच्या वतीने शहरातील मुख्य रस्त्यांची विशेष स्वच्छता मोहीम १३ डिसेंबर पर्यंत राबविण्यात आली. स्वच्छतेबरोबरच अतिक्रमण हटवण्यापर्यंत महापालिकेचे विविध सात विभागाचा राबता होता. प्रथमच अशा पद्धतीने विविध विभाग एकत्र येऊन विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामुळे हे रस्ते चकाचक झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

### विविध सामाजिक संस्था, विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा

या कालावधीमध्ये जास्तीत जास्त नागरिक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, विविध सामाजिक संघटना, खाजगी संस्थेचे कर्मचारी, कॉलेजचे विद्यार्थी यांनी या मोहिमेमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

सोलापूर शहर काँग्रेस कमिटी वतीने पोलादी पुरुष, देशाचे माजी गृहमंत्री, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त काँग्रेस भवन सोलापूर येथे त्यांच्या प्रतिमेस सोलापूर शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महिला अध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, हेमा चिंचोलकर, भीमाशंकर टेकाळे, नूर अहमद नालवर, लखन गायकवाड, विवेक कन्ना, मोहसीन फुलारी, जब्बार शेख, मेहमूद शेख, अभिलाष अच्युगटला, नागनाथ शावने, आदम शेख, सिद्धाराम दुलपागे, संतोष कोळी, आदी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने,भालचंद्र साखरे, नईम मुचाले आदी उपस्थित होते.

### अर्धनग्न अवस्थेत मुलीसमोर थांबून हिडी कृत्य; युवकावर पोस्को अंतर्गत गुन्हा

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

टेलरच्या दुकानात मोबाईल बघत असलेल्या लहान मुली समोर येऊन अर्धनग्न अवस्थेत उभा राहून मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी युवकावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादीचे शहरात टेलरचे दुकान आहे.शनिवारी सायंकाळी पाचच्या सुमारास फिर्यादी हा मुलीस दुकानात सोडून बाहेर गेला असताना आसिफ रफिक शेख (रा.सोलापूर) या युवकाने दुकानासमोर येऊन असे कृत्य केले.ही घटना मुलीने वडिलांना सांगितली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात आसिफ शेख याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.तपास पोलीस निरीक्षक बामणे हे करत आहेत.

### सिद्धेश्वर तलावात पडून युवकाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर तलावात पडुन अलिगड उत्तर प्रदेश येथे राहणाऱ्या एका युवकाचा मृत्यू झाला.अकिब माजिद खान (वय-२३,रा.अलीगड,उत्तर प्रदेश) हा काल रात्री साडेनऊच्या सुमारास सिद्धेश्वर तलावातील पाण्यात तरंगताना आढळून आला.बेशुद्ध अवस्थेत त्यास फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे हवालदार जे.एम.रुपनर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.परंतु उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या इसमाचा मृत्यू

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

डब्ल्यूआयटी कॉलेजच्या गेट जवळ विको प्रोसेस ते तानाबाना चौकाकडे जाणाऱ्या रोडवर बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी ५५ वर्षीय इसमाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.काल दुपारी हा इसम बेशुद अवस्थेत त्या ठिकाणी आढळून आला. जेलरोड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार घुगे यांनी त्यास उपचाराकरता सिव्हिल मध्येदाखल केले होते. परंतु उपचारापूर्वी त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# इन्फ्लूएन्झामुळे वर्षभरात ७१ दगावले




## राज्यात २,३४२ रुग्णांची नोंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर -**

इन्फ्लूएन्झामुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्ययंत्रणा विविध पातळ्यांवर प्रयत्न करत असली तरी यंदा १ जानेवारी ते १० डिसेंबर या कालावधीत फ्लू संसर्गामुळे ७१ जणांना प्राण गमवावे लागले आहेत. त्यात एच१एन१मुळे जीव गमावलेल्या व्यक्तींची संख्या ७० असून, एच३एन२ मुळे एका व्यक्तीला प्राण गमवावा लागला आहे. इन्फ्लुएन्झामुळे राज्यात २ हजार ३४२ रुग्णांना संसर्ग झाल्याची नोंद सार्वजनिक आरोग्य विभागाने केली आहे. सध्या या तापामुळे नऊ रुग्णांवर वैद्यकीय उपचार सुरू आहे.

इन्फ्लूएन्झा संदर्भात नियमित रुग्णसर्वेक्षण, सहवासितांच्या सर्वेक्षणाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे सूचना देण्यात आल्या आहे. फ्लूसदृश्य रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार करण्यात येतात. राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये विलगीकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. राज्यातील सर्व शासकीय व खासगी डॉक्टरांची क्लिनिकल मॅनेजमेंटबद्दलचे पुनर्प्रशिक्षण ऑगस्ट २०२३ मध्ये घेण्यात आले आहे. तर ६ मार्च रोजी राज्यसस्तरावरून सर्व जिल्ह्यांना सर्वेक्षण, प्रतिबंध व उपचारासंदर्भात मार्गदर्शक लेखी सूचना देण्यात आल्या, असे सांगण्यात आले.


### हे लक्षात ठेवा

* इन्फ्लूएन्झा हा विषाणुमुळे होणारा आजार आहे.
* एच १एन१, एच२एन२, एच३एन२ आदींचा त्यात समावेश होतो.
* ताप, खोकला, घशात खवखव, धाप लागणे, न्यूमोनिया ही लक्षणे दिसतात.
* इन्फ्लूएन्झा बाबत रुग्ण सर्वेक्षण हे मुख्यतः लक्षणाधारित आहे.
* आरोग्य केंद्रात रुग्णाची तपासणी व लक्षणानुसार उपचार करण्यात येतात.

# आलबॉर्ग विद्यापीठाच्या तज्ज्ञांची एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, सोलापूरच्या कार्यकारी अध्यक्ष प्रा. स्वाती कराड आणि कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांच्या अलीकडील आलबॉर्ग विद्यापीठ, डेन्मार्कच्या भेटीनंतर, आलबॉर्ग विद्यापीठातील युनेस्को सेंटर फॉर प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंगच्या (UCPBL) संचालिका आणि प्राध्यापिका प्रा. झियांग्युन डू, तसेच त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये प्रा. युआन लिंडसे आणि डॉ. हेनरिक वॉर्म राऊथे यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठास दिनांक १३ ते १६ डिसेंबर २०२४ दरम्यान भेट दिली.



या भेटीचा एक भाग म्हणून, १४ डिसेंबर रोजी विद्यापीठातील शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत उच्च शिक्षणाशी संबंधित जागतिक स्तरावरील सर्वोत्तम उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. यात उच्च शिक्षणातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, विद्यार्थ्यांच्या चांगल्या, शिकण्यासाठी मूल्यमापन प्रक्रिया, आणि प्रॉब्लेम-बेस्ड लर्निंग (PBL) दृष्टिकोनाद्वारे बहुविषयक शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.

या कार्यशाळेत संगणकशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, डिझाईन, आणि फार्मसी अशा विविध विभागाच्या शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच, आलबॉर्ग विद्यापीठाच्या पथकाने कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांच्या नेतृत्वाखालील विद्यापीठाच्या नेतृत्व मंडळासोबत विविध क्षेत्रांत अर्थपूर्ण सहकार्याची शक्यता शोधण्यासाठी चर्चा केली.

यावेळी प्रा. जोशी यांनी विश्वास व्यक्त केला की, ग्रीनफील्ड विद्यापीठ म्हणून चखढ विश्वप्रयाग विद्यापीठ जागतिक दर्जाच्या विद्यापीठांसोबत सहकार्य करून सोलापूर क्षेत्रातील उच्च शिक्षणामध्ये नवी क्रांती घडवू शकते. संपूर्ण भेटीदरम्यान दोन्ही विद्यापीठांच्या तज्ज्ञांनी शैक्षणिक धोरणे, संशोधन संधी, आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले.

# विद्यार्थिनींना आर्थिक मदत; सोलापूर कथामालेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूरच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही होतकरु विद्यार्थ्यिनींना आर्थिक मदत देण्यात आली. दानशूर- सामाजिक कार्यकर्ते आणि सभेचे अध्यक्ष निवृत्ती गायकवाड (स्वकुळसाळी) यांनी दिलेल्या भरीव देणगीतून प्रतिवर्षी हा उपक्रम कथामाला आयोजित करते.




अरुण धुमाळ यांच्या प्रार्थना गायनानंतर मान्यवरांच्या हस्ते,सरस्वती पूजन करण्यात आले.साने गुरुजी कथामाला जिल्हा समिती सोलापूरचे अध्यक्ष अशोक खानापुरे यांनी स्वागत करुन प्रास्ताविक केले. कथामाला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. उपाध्यक्षा आरती काळे यांचे साभिनय कथाकथन झाले. आर्थिक मदत वितरणानंतर पर्यवेक्षक सुरेश राठोड यांनी मनोगत व्यक्त करुन या स्तुत्य उपक्रमाबद्दल कथा मालेला व भरीव देणगी देणाऱ्या गायकवाड यांना धन्यवाद दिले. वसंतराव नाईक हायस्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमात प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक म्हमाणे कथामालेचे राष्ट्रीय कार्यवाह सुनील पुजारी, शिवलिंग शाबादे, बापूराव माने, रंगसिद्ध कोरे, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

कार्यवाह रामचंद्र धर्मसाले यांनी सूत्रसंचालन केले तर राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. अशोक म्हमाणे यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### डॉ. शिवानंद झळके



**मंद्रुप, दि. १५ डिसेंबर-**

कंदलगाव येथील डॉ. शिवानंद सिद्राम झळके (वय ४५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने रविवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन मुले, बहीण व भाऊ असा परिवार आहे. ते अखिल भारतीय किसान सभेचे जिल्हाध्यक्ष होत.

### शिवाजी गव्हाणे



**वैराग, दि. १५ डिसेंबर-**

हिंगणी (पा.) येथील शिवाजी बापुराव गव्हाणे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते पाटबंधारे विभागात नोकरीस होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# लोक अदालतमध्ये ६४० जुन्या प्रकरणासह २० हजार ८३१ प्रकरणे निकाली

## 10 जोडप्यांचे वैवाहिक संबंध सामंजस्याने पुर्नस्थापित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१५ डिसेंबर-**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशाप्रमाणे १४ डिसेंबर रोजी सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये चौथे राष्ट्रिय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय लोकअदालत सोलापूर जिल्हयातील एकुण १९ हजार ८३१ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोकअदालतीच्या माध्यमातून एकुण रक्कम रु. ७१,०५,१४,६०५/- इतके मुल्य असणा-या प्रकरणांमध्ये सामजस्याने तडजोड करण्यात आली. दरम्यान, १० जोडप्यांचे वैवाहिक संबंध सामंजस्याने पुर्नस्थापित करण्यात आले.



चौथ्या राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन मो. सलमान आझमी, अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, जिल्हा सरकारी वकिल ॲड. प्रदिपसिंग रजपूत, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अमित आळंगे, सोलापूर महानगरपालिका उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक पोलीस अधिक्षक सुधीर खिराडकर, सहाय्यक पोलीस अधिक्षक राजन माने, भारतीय स्टेट बँकेचे वरिष्ठ शाखाधिकारी अनिकेत फले, विधीज्ञ व्ही. एन. देशपांडे आणि जिल्हा न्यायालय प्रबंधक पल्लवी पैठणकर, विधीज्ञ, पक्षकार आदी उपस्थित होते.

सोलापूर जिल्हा न्यायालय तसेच जिल्हयातील सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आले. राष्ट्रिय लोकअदालत मध्ये ४४ हजार २०१ प्रलंबित प्रकरणे, दाखलपुर्व ९४ हजार ५२५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. यापैकी प्रलंबित ५ हजार ०६२ प्रकरणांमध्ये तडजोड झाली आणि १४ हजार ७६९ दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीच्या पार्श्वभुमिवर निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोकअदालतमध्ये सोलापूर मुख्यालयाच्या ठिकाणी पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश जे. जे. मोहिते, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आर. यु. नागरगोजे, दिवाणी न्यायाधीश, श्रीमती. एस. ए. आर. सय्यद, दिवाणी न्यायाधीश, पी. पी. पेठकर, दिवाणी न्यायाधीश, न्यायदंडाधिकारी डी. डी. कोळपकर, न्यायदंडाधिकारी पी. व्ही. चव्हाण, न्यायदंडाधिकारी एस. पो. मर्डेकर, न्यायदंडाधिकारी व्ही. व्ही. रजपूत कुलकर्णी, न्यायदंडाधिकारी एस. पी. पाटील, न्यायदंडाधिकारी व्ही. एम. रेडकर, न्यायदंडाधिकारी व्ही. पी. कुंभार यांनी काम पाहिले.

पॅनल सदस्य म्हणून लोकअभिरक्षक कार्यालयातील लोकरक्षक स्नेहल राऊत, एस. एम. झुरळे, एम. बी. सोलनकर, रेवण पाटील, जी. बी. नवले तसेच व्ही. व्ही. कुर्ले, डी. व्ही. किणगी, एस. आर. शेंडगे आदींनी काम पाहिले.

चौथी राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी करण्याकरीता पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सोलापूर महानगरपालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी परिश्रम घेतले.

### स्पेशल ड्राईव्ह

राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजनापूर्वी दि. ०९ डिसेंबर २०२४ ते दि. १३ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. विशेष मोहिमेमध्ये ४० वर्षे जुनी ०२, ३० वर्षे जुनी ३, २० वर्षे जुनी १, १५ वर्षे जुनी २४, १० वर्षे जुनी १२८, ५ वर्षे जुनी ८८० व इतर अशी एकुण ३३०० प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### लोक न्यायालयाची यशस्वी गाथा

लोक अदालत दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी पॅनल कमांक १ मध्ये एकूण ३२ प्रकरणांची यशस्वी तडजोड झाली. विशेषतः एल.ए. आर. १०३/२०२० हे प्रकरण दि. १५ डिसेंबर २०२० रोजी दाखल होवून मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ या न्यायालयात प्रलंबित होते. सदर प्रकरण हे रु. १,३२,९३०००/- या रक्कमेवर तडजोड झाली. सदर प्रकरणामध्ये एकूण १५ प्रतिवादी होते त्यांच्यामध्ये त्यांच्या वैयक्तिक हिश्यांच्या वाटणीसाठी बराच काळ प्रकरण प्रलंबित होते. सदर प्रकरण हे लोक न्यायालयाकडे सादर करण्यात आले. सदर प्रकरण हे लोक न्यायालयामध्ये तडजोड होवून सर्व प्रतिवादींनी भूसंपादन संदर्भ कमांक १०३/२०२० ची तडजोड रक्कम रु. १,३२,९३०००/- त्यांच्या सहमतीने केलेल्या हिश्यांच्या प्रमाणात विभागणी झाली.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

**बँक ऑफ महाराष्ट्र**
**आंचलित कार्यालय, सोलापूर**

अग्रवाल पॅलेस, पहिला मजला, डी-मार्ट ते भारती विद्यापिठ रोड, पतंजली मॉल समोर, जुळे सोलापूर, सोलापूर फोन नं. २७३३८७०/७१ ई-मेल - pln_sol@mahabank.co.in

**परिशिष्ट - १३ सार्वजनिक नोटीस**

| अ. क्र. | लॉकर क्रमांक | लॉकर धारकाचे नांव |
|---|---|---|
| १ | १०००५४८५३९ | डब्लू. व्होनप नारायण |
| २ | १०००५४७८८५ | सौ.राधाबाई किसनराव झिंगाडे |
| ३ | १०००५४४८२८ | सौ.सुनिता नारायण पाटोले |
| ४ | १००६३३०४६१५ | श्री. रामनारायण |
| ५ | १०००५४५१४१ | श्री. पवन बाबूराव सोमवंशी |
| ६ | १०००५४८५९५ | सौ.विजया बाबूराव चिडगुंपी |
| ७ | १०००५४८३९१ | सौ. पुष्पावती ताराचंद माही |
| ८ | १००१७४०२०९ | श्री. शरद ठेकेदार गंगाधर |
| ९ | १०००५४९२३६ | श्री. प्रसन्न बी तानावडे |
| १० | १०००५४७९०९ | श्री. जगन्नाथ कल्लप्पा कुंभार |
| ११ | १०००५४६४७३ | श्री. अमोल चंद्रकांत गोडसे |
| १२ | १०००५४९२४७ | श्री. कृष्णा गणेश पागे |
| १३ | १०००५४९६०० | श्री. संजय शंकर खैरनार |
| १४ | १०००५४७८०७ | सौ. वैजयंती प्रकाश शेळके |
| १५ | १०००५४६४८४ | श्री. इष्टलिंगप्पा सिध्दप्पा ची |
| १६ | १०००५४७७१६ | श्री. ओक श्रीकांत विनायक आणि सौ.श्रीया श्रीकांत ओक |
| १७ | १०००५४९१५६ | सौ. सरोजनी रामकृष्ण पेटकर |

- वरील नमूद लॉकर धारकांनी लॉकर शुल्क भरण्यात असमर्थता दाखवली असून, बँकेने त्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर विविध नोटीसा पाठवूनही शाखेशी संपर्क साधलेला नाही.
- त्यानुसार, आपले थकीत शुल्क भरले नसल्याने व सतत पाठपुरावा करुनही दायित्व पूर्ण न केल्यामुळे, बँकेने आपला लॉकर मालकी हक्क संपुष्टात आणला असून लॉकर पुनर्प्राप्तीचा हक्क वापरला आहे.
- बँकेने आपला लॉकर ताब्यात घेतला असून, तो दिनांक १८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आपल्यावर खर्च आणि परिणामांच्या अधीन राहून उघडण्याचा निर्णय घेतला आहे.
- कृपया सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ठरवलेल्या कालावधीत थकीत रक्कम तत्काळ भरावी.

सही/-
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ महाराष्ट्र
आंचलिक कार्यालय - सोलापूर

# गिरण्यांचा भोंगा... मार्शल लॉ.. ते प्रशासकीय राजवट!

## ● पोटातील कावळे मेली, चिमणी वाचवून काय उपयोग?

**स्वातंत्र्यपूर्व काळापासून गिरणगाव अर्थात सोलापूरचे महत्त्व भारताच्या इतिहासात अद्वितीय आहे. सोलापूर हे गिरणगाव म्हणून आज ही ओळखलं जातं. गिरणगाव ते स्मार्ट सिटी सोलापूर असा हा एक मोठा प्रवास आहे. गिरण्यांचा भोंगा... मार्शल लॉ..... ते महापालिकेतील प्रशासकीय राजवट अशा महत्त्वपूर्ण टप्प्यांमधून हे शहर गेले आहे. पारतंत्र्यात ब्रिटिश राजवटीसह मार्शल लॉ आणि स्वातंत्र्यातील प्रशासकीय राजवट अशा सर्व राजवटी सोलापूरने अनुभवल्या आहेत. अखेर गिरण्यांच्या भोंग्याचा आवाज कायमचा बंद झाला. बेरोजगारीमुळे पोटातली कावळे मेली, आता चिमणी वाचवून काय उपयोग ?? असे म्हणत गिरण्यांच्या चिमण्याही जमीनदोस्त केल्या... चिमण्या जमीनदोस्त करत गिरण्यांच्या जागेवर टोलेजंग इमारती उभारल्या. नवे वळण घेत आता सोलापूर शहराचा अवघा चेहरा मोहरा बदलत असल्याचे चित्र दिसून येते.**

**गिरणगाव ते स्मार्ट सिटी सोलापूर**

**किरण बनसोडे**

स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. सोलापूरच्या नागरिकांना ४ दिवस म्हणजे ९ ते १२ मे १९३० स्वातंत्र्य मिळाले. या काळात कायदा सुव्यवस्थेची जबाबदारी आणि नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी सोलापुरातील नेत्याच्या खांद्यावर होती. स्वातंत्र्यापूर्वीच मे १९३० मध्ये नगरपालिकेच्या इमारतीवर सर्वप्रथम राष्ट्रीय ध्वज फडकवणारी भारतातील एकमेव नगरपालिका होती. महात्मा गांधी यांच्या दांडी यात्रेची प्रेरणा घेवून सोलापूरमधील स्वातंत्र सैनिकांनी सोलापूर पालिकेवर राष्ट्रध्वज फडकवण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ६ एप्रिल १९३० रोजी नगरपालिकेत ठराव करून पुण्याचे जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक अण्णासाहेब भोपटकर यांनी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रध्वज फडकावला. संपूर्ण देशभरात ही पहिली व एकमेव घटना होती. सोलापुरातील स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र आणि आक्रमक झाला होता. या घटनेने संतापून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सोलापूर येथे मार्शल लाँ घोषित केला. दरम्यान, सोलापुरातील चार स्वातंत्र्यसेनानींना फाशीची शिक्षा देण्यात आली.

सोलापूर ही पूर्वी १८७४ पर्यंत उतार पेठ म्हणून ओळखली जायची. त्यानंतरच्या काळात सोलापूर स्पिनिंग अँड विविंग मिलसह (जुनी मिल) अनेक गिरण्या स्थापन झाल्या. हजारो गिरणी कामगार कार्यरत होते. सोलापुरातील पहिली गिरणी शेठ गोकुळदास मोरारका यांनी १८७४ मध्ये सुरू केली. तिला आजही आपण जुनी मिल म्हणून ओळखतो. मराठवाडा आणि आंध्र प्रदेशात मुबलक पिकणारा कापूस आणि आजूबाजूच्या खेड्यातून स्थलांतरित होणारे स्वस्त कामगार यामुळे पुढे सोलापुरात अनेक कापड गिरण्या सुरू झाल्या. सोलापूर शहर व जिल्ह्यात पूर्वी अनेक छोट्या-मोठ्या सूत गिरण्या होत्या. सोलापूरला ''गिरणगाव अशी नवी ओळख मिळाली. या गिरण्यामध्ये हजारो कामगार कार्यरत होते. गिरणी कामगारांनी सोलापुरातील स्वातंत्र्यलढा मोठ्या हिमतीने लढला होता. सोलापूरला गिरणगाव अशी ओळख निर्माण झाली आणि आता स्मार्ट सिटी म्हणून ओळख होऊ पाहत आहे. सोलापूर आणि महापालिकेचा इतिहास महत्त्वपूर्ण असा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून गिरणगाव अर्थात सोलापूरचे महत्त्व भारताच्या इतिहासात अद्वितीय आहे. स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे. सोलापूर पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. सोलापूर शहराला स्वातंत्र्य लढ्याचा क्रांतिकारी जाज्वल्य इतिहास आहे. सोलापूर शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. पर्यावरणपूर्वक सुशोभीकरणातून नवा लूक दिला जातोय. १८५२ ते १९६४ पर्यंत नगरपालिका आणि त्यानंतर आजतागायत महानगरपालिका नगर विकासात अखंडपणे कार्यरत आहे. या कार्यकाळात गिरणगाव ते स्मार्ट सिटी अशा प्रवासात सोलापूर शहरात अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. स्मार्ट सिटी म्हणून ओळख होत असली तरीही संपूर्णपणे मूलभूत समस्या सुटल्या नाहीत.

### सोलापूरकरांना मार्शल लॉ अन् प्रशासकीय राजवटीचाही अनुभव

स्वातंत्र्य लढ्यातील सोलापूरचा जाज्वल्य इतिहास अजरामर आहे.ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सोलापूर येथे मार्शल लाँ घोषित केला. सोलापुरात दि. १२ मे ते ३० जून १९३० पर्यंत मार्शल लॉचा अंमल सुरू होता. त्यानंतर महापालिकेत प्रशासकीय राजवटही अनुभवली आहे. दि. १ जून १९६७ ते २२ जून १९६९ दरम्यान सुमारे २ वर्ष २१ दिवस पहिल्यांदा प्रशासकीय कारकीर्द होती. आणि पुन्हा दि. ६ फेब्रुवारी १९८१ ते १२ मे १९८५ या कालावधीत साधारणता: ४ वर्षे ३ महिने प्रशासकीय कारकीर्द होती. असे यापूर्वी दोन वेळेला प्रशासकीय राजवट लागू करण्यात आली होती. १९६७ ते १९६९ आणि १९८१ ते १९८५ या सहा वर्षाच्या कालावधीत यापूर्वी ६ प्रशासकांनी कामकाज पाहिले. मार्च २०२२ पासून तिसऱ्यांदा प्रशासकीय राजवट लागू झाली. महापालिका लोकप्रतिनिधीची पाच वर्षाची मुदत संपल्याने राज्य शासनाकडून ८ मार्च २०२२ पासून प्रशासक म्हणून महापालिका आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. सुरुवातीच्या काळात आयुक्त पी. शिवशंकर यांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांच्या बदलीनंतर दि. २१ नोव्हेंबर २०२२ पासून आजतागायत शितल तेली - उगले या प्रशासक तथा आयुक्तपदाची धुरा सांभाळत आहेत.

### १७२ नागरिकांनी केली नगरपालिका स्थापनेची अर्जाद्वारे मागणी

सन १८५१ च्या दरम्यान सोलापुरात विविध नागरी समस्यांनी आणि मूलभूत सोयी सुविधा अभावी सोलापूरकर त्रस्त झाले होते. या सोयी सुविधा मिळाव्यात. सुधारणा व्हाव्यात अशी सोलापूरकरांची भावना होती. मि. एन्व्हारारिटी व मि. लॉफनन या तत्कालीन दोन कलेक्टरांच्या प्रोस्ताहनातून सन १८५० च्या ॲक्ट २६ नुसार स्थानिक गैरसोयी दूर करण्यासाठी सरकारकडे सोलापूर शहरातील १७२ नागरिकांनी नगरपालिका स्थापनेची अर्जाद्वारे मागणी केली. शहरातील रहिवाशांना पाण्यासाठी केवळ तलावावर अवलंबून राहावे. लागते ज्या खोडवीने तलावास पाणी येते. त्याचे बांध फुटले आहेत. त्यामुळे तलावास पुरेसे पाणी येत नाही. तलाव गाळाने भरला आहे. हे जर थांबवले नाही तर नागरिकास व जनावरास बहुत दु:ख होईल. रस्ते, बोळ गल्ली यांची दुरुस्ती नसल्यामुळे आणि पावसाळ्यात गलिच्छ स्थितीत असल्यामुळे रस्त्याने जाणे मुश्किल होते. त्याची दुरुस्ती होणे जरुरीचे आहे. दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे एकाच तलावातून पाणी न्यावे लागते. नळाने पाणी आणून शहरात ठीक ठिकाणी हौद बांधल्यास जनतेस बहुत सुख लाभेल. त्यामुळे अशा प्रकारच्या



सुधारणा करण्याची आमची इच्छा आहे असा आशय असलेला अर्ज दि. २८ ऑगस्ट १८५१ रोजी बापूजी कृष्ण व इतर १७२ सोलापूर करांच्या स्वाक्षरीने सरकारला देण्यात आला होता. रस्ते पाणीपुरवठा आणि आरोग्य याबाबत अशी सोय करावा की जनतेस बहुत सुख लाभेल, अशी महत्त्वाची मागणी तत्कालीन नागरिकांनी केली होती.

### सोलापूर नगरपालिकेची स्थापना

दरम्यान, दि. १ ऑगस्ट १८५२ रजी सोलापूर नगरपालिकेची स्थापना करण्यात आली. सोलापूर नगरपालिकेची पहिली सभा ३ ऑगस्ट १८५२ रोजी कलेक्टर कचेरीतील एका हॉलमध्ये भरवण्यात आली होती. नगरपालिकेचे कार्यालय मंगळवार पेठ येथे होते मात्र नगरपालिकेची सभा कलेक्टर कचेरीतच होत होती.

### सहा खण सोपा व सहा खण माडी

नगरपालिकेची स्वतःची मालकीची इमारत नसल्याने सुरुवातीला मंगळवार पेठेत काशीबाई शेटे यांच्या वाड्यात सहा खण सोपा व सहा खण माडी अशी बारा खण जागा दरमहा रुपये पाच रुपये भाड्याने घेण्यात आली होती. तत्कालीन कचेरीची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी ठरवण्यात आली होती. वेळ समजण्यासाठी व वालुका यंत्र ठेवण्यात आले होते. त्यानंतर पुढे नवी पेठ येथील दगडी इमारतीमध्ये नगरपालिकेचे कामकाज सुरू झाले. तिथून इंद्रभुवन इमारत आणि पुढे कै. यशवंतराव चव्हाण सभागृह (कौन्सिल हॉल) असा महापालिका कामकाजाचा प्रवास झाला आहे.




### नगरपालिकेच्या सभेवेळी चंदनी अत्तर अन् पानाचे विडे

नगरपालिकेच्या सभेवेळी प्रत्येक सभासदास दोन पानाचे विडे दिले जात होते आणि सभेच्या शेवटी चंदनी अत्तर लावून गुलाब पाणी शिंपडण्यात येत असे. प्रत्येक सभेस विड्यांची सहाशे पाने व इतर सामान अंदाजे लागत होते. पान सुपारीचा खर्च नगरपालिकेमार्फत केला जात होता. कलेक्टर कचेरीतील इतर अधिकारी, कारकून, पट्टेवाले त्याचबरोबर उपस्थित लोकांनाही पान सुपारी दिली जात असे.

### तेव्हा १३ आणि आता १०७ नगरसेवकांची संख्या

१८५२ साली सभासद संख्या १३ होती. १८५२ ते १८८३ या काळात शासन नियुक्त सभासद होते. त्यात अधिकारी व प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश होता. १८८३ मध्ये नगरपालिकेची प्रथमच निवडणूक झाली. नागरिकांनी मतदानाद्वारे निवडलेले १२ तर शासनाने नेमलेले १४ असे २६ सभासद या नव्या नगरपालिका मंडळात होते. ऑगस्ट १८८५ रोजी पहिल्या लोकनियुक्त नगराध्यक्षांची निवड झाली.राव बहादूर आप्पाजी देगावकर हे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष ठरले. सन १९४७ मध्ये ''नगरसेवा हीच ईश सेवा'' हे नगरपालिकेचे ब्रीदवाक्य सर्वांमध्ये संमत करण्यात आले. महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू होण्यापूर्वी सर्व मिळून १०७ नगरसेवक कार्यरत होते. दरम्यानच्या काळात सोलापूर नगरपालिकेचा कारभार (सध्याच्या नवी पेठ येथील प्राथमिक शिक्षण मंडळ) स्वतःच्या दगडी बिल्डिंगमध्ये सुरू झाला. त्यानंतर एक मे १९६४ रोजी नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले. महानगरपालिकेचा कारभार इंद्रभुवन इमारतीतून सुरू झाला. सन १९९८ पासून महापालिका आवारातील कै. यशवंतराव चव्हाण कौन्सिल हॉल या वास्तूत सभेचे काम सुरू झाले. सध्या कौन्सिल हॉल, इंद्रभुवन आणि प्रशासकीय इमारत अशा तीन वास्तूंमधून महापालिकेच्या कारभाराचा गाडा चालवला जातो.

### पारतंत्र्यातही नगरपालिकेवर फडकविले राष्ट्रीय निशाण

दि. ६ एप्रिल १९३० रोजी सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा असा ठराव करण्यात आला. त्यानुसार देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि. ९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य उपभोगले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शलला पुकारला. मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वानुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. असा हा क्रांतिकारी इतिहास आहे.

### आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले

सन १९६४ पासून सोलापूर महानगरपालिकेच्या साठ वर्षाच्या या कालखंडात आतापर्यंत ३७ महापौर व ३६ उपमहापौर झाले. महापौरपदावर तीन जणांची बिनविरोध निवड झाली. महापालिकेत महापौरपदी एकूण ७ महिला विराजमान झाल्या आहेत तर ६ महिलांना उपमहापौर पदाचा मान मिळाला आहे.महापालिकेचे एकूण ३.५ हजार कर्मचारी व अधिकारी मिळून महापालिकेच्या कारभाराचा गाडा ओढत आहेत. शेवटचे नगराध्यक्ष पारसमल जोशी हेच पहिले महापौर झाले. त्या - त्या कार्यकाळात महिला महापौर व उपमहापौरांनी आपापल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे. कालांतराने मात्र आधुनिकीकरण, जागतिकीकरण आलं आणि औद्योगिक क्षेत्रात आमूलाग्र बदल झाला. विविध कारणास्तव गिरण्यांनी मान टाकली. बेकार मिल कामगाराचे शहर अशी जणू ओळख मध्यल्या काळात झाली होती. सोलापूर शहराची वाढ कापड गिरण्या,टेक्स्टाइल मिल्स,फाऊंडरी उद्योग,विडी उद्योग यामुळे झाली.या उद्योगधंद्यावर अवलंबून असणारा कामगार वर्ग आसपासच्या खेड्यापड्यातून सोलापूर शहरात आला. शासकीय आर्थिक धोरणे,करप्रणाली,विविध परवाने,कामगार वर्गाची मानसिकता,मिल मालकांचा व्यवहारीक दृष्टिकोन या कारणांमुळे कापडगिरण्या, फाऊंडरी उद्योग, चादर कारखाने घसरणीला लागले. यातील अनेक कामगार बेकार झाले.कामगार वर्ग व मालक यांच्यामध्ये कामगारांच्या देय रकमासंबंधी वाद निर्माण झाले होते. अनेक नेत्यांनी कधी सोयीचे दुर्लक्ष तर कधी अर्थपूर्ण वाटाघाटी करून आर्थिक लाभ करून घेतले. परिणामी सोलापूरच्या कामगार जगताची वाताहत झाली.

हळूहळू यंत्रमाग वाढत गेले. गिरणगाव ही सोलापूरची ओळख पुसट होत असली तरीही आजचे यंत्रमाग कुशल व कष्टाळू कामगार व मोजके हातमाग यांच्या माध्यमातून मनमोहक साड्या, जेकॉर्ड चादरी, टर्किश टॉवेल्स, पडदे व वॉल हँगिग्ज यांचे उत्पादन आजही सोलापुरात मोठ्या प्रमाणावर होत आहे. सोलापूर शहरात हातमागावर नऊ वारी साडी तयार करण्याची प्रथा आहे. इथल्या नऊवारी साडीला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. त्यामुळे सोलापूरची बाजारपेठ आजही प्रसिद्ध असल्याचे दिसून येते. सोलापूर शहर हे कामगारांची वस्ती म्हणून ओळखले जाते.याचे मुख्य कारण म्हणजे पूर्वीपासून चालत आलेला हातमाग व्यवसाय आणि आता सुरू असलेला पॉवर लूमचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू असून आज त्याबरोबरच महिला बिडी उद्योग यामुळे सोलापूरला ही ओळख प्राप्त झाली.

विशेष म्हणजे मेडिकल हब म्हणूनही सोलापूर पुढे आले आहे. शहरात अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असलेली अनेक हॉस्पिटल निर्माण झाली आहेत. प्रिसीजन, बालाजी अमाईन्स यासह काही कंपन्यांमुळे सोलापूरचे नाव जगभरात गेलं. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातही वेगळी ओळख जपली आहे. असे असले तरी नागरी मूलभूत प्रश्न पुर्णपणे सुटले नाहीत. काळानुसार बदल होत आहेत. राजकीय इच्छाशक्ती अभावी नवे उद्योग आले नाहीत. सोलापूकरांनी रोजी रोटीसाठी पडेल ते काम केले. आजही बहुतांश तशीच स्थिती आहे.

दरम्यान, स्मार्ट सिटींमध्ये सोलापूरचे नाव यादीत समाविष्ट झाल्याने आता सोलापूरही स्मार्ट शहर बनण्याकडे वाटचाल करताना दिसते आहे. स्मार्ट सिटी कॉर्पोरेशन मार्फत विविध प्रकारची विकास कामे करण्यात आली आहेत. रस्ते, ड्रेनेज, पाणी , पार्क स्टेडियम , राणी लक्ष्मी मार्केट , हेरिटेज इंद्रभुवन इमारत सुशोभीकरण यासह विविध कामे करण्यात आली. शहराच्या पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी सुमारे सातशे कोटी खर्चाची उजनी जलाशय ते थेट सोलापूर दुहेरी जलवाहिनी योजनेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. स्मार्ट सोलापूर होत असताना खड्डेमय रस्ते धुळ यासह विविध समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. नुकत्याच मुख्य रस्त्यांच्या विशेष स्वच्छता मोहिमेमुळे रस्ते धुळमुक्त करण्याचा प्रयत्न महापालिकेकडून सुरू आहे. उड्डाणपूल उभारणीचे काम प्रक्रियेतच अडकले आहे. तर सोलापूर शहरातील होटगी रोड विमानतळाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. आता विमान सेवेची प्रतीक्षा सर्वांना लागून राहिली आहे.


### आतापर्यंत एकूण ८ प्रशासकांनी सांभाळला महापालिकेचा कार्यभार

सोलापूर महापालिकेत साठ वर्षाच्या कार्यकाळात आत्तापर्यंत एकूण तीन वेळा प्रशासकीय राजवट होती. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण सात प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला आहे. आठवे प्रशासक म्हणून सध्या शितल तेली - उगले या कार्यरत आहेत. शितल तेली - उगले या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या आहेत. या कार्यकाळात एम. जी. सप्रे, डी. डी. रणदिवे, एस. के. जांबवडेकर, व्ही. के. कोल्हटकर, रमानाथ झा आणि ए. के. नंदकुमार या आयुक्तांनी प्रशासक म्हणून काम पाहिले. त्यांची कारकीर्द वैशिष्ट्यपूर्ण ठरली. रमानाथ झा यांच्या कार्यकाळातील अतिक्रमण विरोधात बेधडक कारवाईच्या आठवणी आजही सांगितल्या जातात.

### सोलापूर महापालिकेसाठी अखेर आकृतीबंध केला मंजूर

महाराष्ट्र शासनाने सोलापूर महापालिकेसाठी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी आकृतीबंध मंजूर केला. या आकृती बंधानुसार महापालिकेत ४ हजार ६१२ पदे मंजूर करण्यात आली. मंजूर आकृतीबंधानुसार आवश्यक ती पदे सोलापूर महापालिका प्रशासनात उपलब्ध नाहीत. मंजूर पदांपैकी ३ हजार ३९० कर्मचारी व अधिकारी कार्यरत आहेत उर्वरित १ हजार १२५ म्हणजेच सुमारे २५ टक्के कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर सोलापूर शहराचा कारभार चालला आहे. सहाय्यक आयुक्तांची ६ पदे रिक्त आहेत. एकूण अ, ब, क, ड या चारही वर्गातील सुमारे १हजार १२५ पदे रिक्त आहेत. दरम्यान, सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत सुमारे ६०० कोटींची कामे झाले मात्र यातील अनेक





प्रकल्प देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याचेच दिसून येते. तर उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनी हा महत्त्वपूर्ण प्रकल्प सध्या मार्गी लागत आहे. साधारणता: ७०० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे. सध्या शहराला चार ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. अमृत २ योजनेअंतर्गत ड्रेनेज आणि जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी निधी मंजूर असून काम सुरू झाले आहे. उड्डाण पुलाचे काम हे रखडले आहे. विमानतळ नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले आहे आता विमान सेवा कधी सुनाव सुरू होणार याचीच प्रतीक्षा सोलापूरकरांना आहे. गिरणगाव म्हणून ओळख असलेल्या या शहराला मात्र औद्योगिक दृष्ट्या गती मिळू शकली नाही. यामुळे बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून स्थलांतरही मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते महामार्गाचे मोठे जाळे निर्माण झाले आहे.

### तीन महापौर झाले बिनविरोध करण्याचा राजकीय इतिहास

महापालिकेच्या इतिहासात फक्त तीन महापौर बिनविरोध निवडले गेले. यामुळे सोलापूरची राजकीय संस्कृतीही गौरवास्पद राहिली आहे. मागासवर्गीय प्रवर्गातील पहिले महापौर होण्याचा मान दलितमित्र भीमराव जाधव गुरुजी (१९७४-७५) यांना मिळाला. मुस्लिम समाजाचा पहिला व्यक्ती महापौरपदासाठी उभा असल्याने विरोधकांनी उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे युन्नूस शेख (१९७५-७६) यांचीही बिनविरोध निवड झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून अनुसूचित जाती प्रवर्गातील मुरलीधर पात्रे (१९९०-९१) यांची बिनविरोध निवड झाली होती.

### राजकीय इच्छाशक्ती अभावी नवे उद्योग आले नाहीत

काळानुसार बदल होत आहेत. राजकीय इच्छाशक्ती अभावी नवे उद्योग आले नाहीत. सोलापूकरांनी रोजी - रोटीसाठी पडेल ते काम केले. आजही बहुतांश तशीच स्थिती आहे.

स्मार्ट सोलापूर होत असताना खड्डेमय रस्ते धुळ यासह विविध समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत सुमारे २२ कोटी रुपयांच्या निधीतून विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. धूळ मुक्त सोलापूर आणि पर्यावरण पूरक सोलापूर शहरासाठी ही योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत विविध ठिकाणी रस्ते आणि पर्यावरण पूरक सुशोभीकरण कामे करण्यात आली आहेत.

### ....आणि महापालिकेतीलही भोंगाही झाला बंद !

पहाटे चार वाजता, सकाळी सहा, दुपारी १२ वाजता, दुपारी ४ वाजता, रात्री ८ वाजता ते रात्री १२ वाजता नियमितपणे वाजणाऱ्या सोलापुरातील गिरण्यांच्या भोंग्यावर सर्व शहर त्याकाळी सतर्क आणि जागे राहायचे. भोंगा म्हणजे घड्याळच ! गिरण्यांच्या त्या भोंग्याचा आवाज स्मार्ट सोलापूर महापालिकेने काही महिने जपला होता. सोलापूर महापालिकेचा भोंगाही वाजत होता.. त्यावरच कर्मचारी कार्यरत होते मात्र अचानकपणे महापालिकेतील हा भोंगा बंद करण्यात आला. अधिकारी बदलले की बऱ्याच गोष्टी बदलतात. याचा प्रत्यय महापालिकेत आला. गिरणगावचे अस्तित्व आणि ओळख असलेला भोंगा चालू राहणे महत्त्वाचे होते, अशी प्रतिक्रिया त्यावेळी सुजाण नागरिकांतून व्यक्त झाली होती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### डॉ. कोटणीस यांच्या स्मृतीदिनी रोटरी क्लबतर्फे मानवतावादी रॅली

**सोलापूर, दि. १४ डिसेंबर-**

आंतरराष्ट्रीय मानवतावादी व डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या स्मृती दिनानिमित्त डॉ. कोटणीस स्मृती समिती व रोटरी क्लब जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मानवतावादी रॅली काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले. प्रास्ताविक सुरेश व्यवहारे यांनी केले. या रॅलीसाठी साई आयुर्वेदिक महाविद्यालय वैराग, सेठ गोविंदरावजी आयुर्वेद महाविद्यालय सोलापूर, व्ही.एम. मेडिकल कॉलेज सोलापूर, सावित्री महिला संघटना यांचे विद्यार्थी आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी , सर्व रोटरीयनस, डॉ. ज्योत्सना गंगासागर, डॉ. आनंद मादगुंडी, डॉ. जयकुमार आडे, प्राचार्य सुनीता गायकवाड, ॲड. सरिता मोकाशी, जयंती कदम, शकुंतला सूर्यवंशी, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अमित गायकवाड, डॉ. नयना व्यवहारे, पल्लवी बंडेवार, गायत्री देशमुख, सारिका होमकर, डॉ. सरिता पाटील, अश्विनी झांबरे, मेघा क्षीरसागर, प्रमोद देशपांडे, कमलेश शहा, हिरेमठ, माली झांबरे उपस्थित होते. सेक्रेटरी अक्षय पाटील यांनी आभार मानले.



### मंगळवेढा शहरात दत्त जयंती साजरी; दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**मंगळवेढा, दि. १५ डिसेंबर-**

दत्त जयंतीनिमित्त शहरातील प्रसिद्ध अशा दत्त मंदिरामध्ये त्यात मुरडे गल्ली येथील तायाप्पा करे महाराज मंदिरात, उजनी वसाहत ,जिल्हा परिषद उप विभाग बांधकाम, संत दामाजी मंदिर, दामाजी चौकातील हॉटेल वंश दत्त मंदिर या विविध ठिकाणी दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. अबल वृद्ध भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. अवधुतचिंतन श्री गुरुदेव दत्त महाराज की जय या जयघोषात भाविक भक्तीतत्तल्लीन झाल्याचे दिसत होते. श्री दत्त जयंती निमित्त गुरुदेव दत्तात्रय महाराजांचा दर्शनाचा लाभ घेतला. याप्रसंगी श्रीचा गाभारा आणि मंदिर परिसर आकर्षक फुलांनी तसेच विद्युत रोषणाईंनी सजवण्यात आला होता. करे महाराज दत्त मंदिरामध्ये दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. अभिषेक, प्रवचन, नामस्मरण, पाळणा व पुष्पवृष्टी झाल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### उल्लास नवभारत साक्षरता विभागीय मंडळ अध्यक्षांच्या नेमणुका

**माळीनगर, दि. १५ डिसेंबर-**



उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमाची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य समन्वयक कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर व विभागीय समन्वयकपदी रत्नागिरी मंडळ वगळता संबंधित विभागीय मंडळाच्या अध्यक्षांची नेमणूक करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी आणि योजना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी संयुक्तपणे जारी केले आहेत. सध्या विभागीय अध्यक्ष म्हणून राजेंद्र अहिरे-मुंबई, डॉ. सुभाष बोरसे-नाशिक, मंजुषा मिसकर-पुणे, अनिल साबळे-छत्रपती संभाजी नगर, सुधाकर तेलंग-लातूर, नीलिमा टाके-अमरावती, माधुरी सावरकर-नागपूर हे काम पाहत आहेत. उल्लास योजनेतील अनुभव लक्षात घेता आदेशानुसार राजेश क्षीरसागर यांना राज्य समन्वयक, कोल्हापुर विभाग समन्वयक आणि रत्नागिरी विभाग समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.

### अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी रशिदा शेख-कुरुलकर

**मोहोळ, दि. १५ डिसेंबर-**



अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी रशिदा शेख-कुरुलकर यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष सूर्यमणी गायकवाड यांनी शेख यांना तसे निवडीचे पत्र दिले व त्यांचा सत्कार करण्यात आला. सोलापूर जिल्हा अंगणवाडी कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष सूर्यमणी गायकवाड, सरला चाबुकस्वार, कांचन पांढरे, मोहोळ तालुक्यातील उपस्थित सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस, अनुसया राठोड, संयोगिता दळवी, दिपाली ढोबळे, शमशाह तांबोळी, दिपाली कदम, पद्मिनी मस्के, वेणूताई वाघमोडे, सोनाली पाटील, मैना चौरे, राणी गुंड, सारिका सनगर, समीना जमादार, उषा मोटे, प्रतिभा जाधव, अंजली घोडके उपस्थित होत्या.

### स्विच इलेक्ट्रिक बसेसचे केले औपचारिक अनावरण

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

अशोक लेलँडची सहायक कंपनी आणि हिंदुजा ग्रुपचा भाग असलेल्या,तसेच इलेक्ट्रिक बस आणि हलक्या वाणिज्यिक वाहनांचे आघाडीचे निर्माता असलेल्या स्विच मोबिलिटी लि. ने आज आपल्या आधुनिक इलेक्ट्रिक बस स्विच ईआयवी१२ या भारतीय बाजारासाठीची लो-फ्लोर इलेक्ट्रिक सिटी बसचे अनावरण केले.ही भारतातील पहिली लो-फ्लोर सिटी बस आहे, ज्यामध्ये चॅसिस-माउंटेड बॅटरी असते आणि यामध्ये ४००+ के डब्ल्यू एच पेक्षा जास्त क्षमता असलेल्या स्केलेबल बॅटरीची सुविधा आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचे मान्यवर मंत्री नितिन गडकरी यांच्या हस्ते हे वाहन लाँच करण्यात आले.यावेळी हिंदुजा ग्रुप कंपन्यांचे अध्यक्ष अशोक पी. हिंदुजा, इतर मान्यवर आणि उद्योग क्षेत्रातील लीडर्सची उपस्थिती होती.

# करमाळ्यात जाहीर निषेध आंदोलन

● परभणी येथे झालेल्या संविधान तोडफोड, कोंबिंग ऑपरेशनाचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१५ डिसेंबर-**

करमाळा तहसील समोर परभणी येथे झालेल्या संविधान तोडफोड व कोंबिंग ऑपरेशन निषेधार्थ यशपाल कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी सुहास ओहोळ.नितीन भोसले.युवराज जगताप.कालू कांबळे.मंगेश समंदर वंचितचे विलास कांबळे व यशपाल कांबळे यांचे भाषण झाले. यावेळी कांबळे म्हणाले की, भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची जी तोडफोड झाली परभणीतील त्याच पाठीमागे जिल्हाधिकारी कार्यालय आहे त्याच्या शेजारीच रेल्वे स्टेशन आहे तरीपण हा प्रकार घडला कसा जर तो आरोपी जिल्हाधिकारी कार्यालयावर गेला



असता तर डिपारमेंट गप्प बसला असता काय? रेल्वे स्टेशनवर जर ह्या प्रकार घडला असता तर डिपार्टमेंट गप्प बसले असते काय?हा प्रश्न त्यांनी विचारला घटनाक्रम पाहिला असता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पाशील सिक्युरिटी गार्ड सुट्टीवर जातोच कसा हे प्रश्न यशपाल कांबळे यांनी मांडली.

यावेळी जयश्री सावंत.दीपक लोंढे. नितीन गायकवाड,रंजीत कांबळे,अजय कांबळे, कालू कांबळे. मंगेश समिंदर,नितीन भोसले, प्रवीण भोसले,सचिन गायकवाड,हिरालाल पवार,संतोष पवळ, सचिन पोळके, विजय कांबळे,बाळू कांबळे. कालिदास पवार.अमोल गायकवाड. मयूर कांबळे. संभाजी वाघमोडे,यश अनुप कांबळे,मंगेश लांडगे, अभी लांडगे, धनराज सरोदे, पप्पू भोसले, पप्पू वाघमारे, नवनाथ भालेराव, आकाश दामोदर, सुनील कांबळे, दादा घोडके, फिरोज शेख. सागर आलट, रोहन भोसले, अमोल भोसले, वंचित आघाडीचे विलास कांबळे, किशोर कांबळे, सुगत कांबळे, गोविंदा खरात, समाधान खरात, राहुल गायकवाड, संतोष लांडगे, रोहित लांडगे, चिराग लांडगे, महादेव रणदिवे, नवनाथ रणदिवे, नागेश दामोदरे, नवनाथ आखाडे, बबन भोसले आदी उपस्थित होते.

**अत्याचाराची भरपाई कोण करणार?**

दलित समाजावर जो अन्याय-अत्याचार झाला आहे, त्यांची भरपाई कोण करणार? आज दिनांक १५ डिसेंबर रोजी दलित चळवळीचा खंदा समर्थक सुरवंशी ह्याचा कोठडीमध्ये मृत्यू झाला, त्याला जबाबदार कोण? परभणी येथील भारतीय राज्यघटनेच्या प्रतिकृतीवर जी दगडफेक झाली व सध्या दलितांवर चालू असलेले कोंबिंग ऑपरेशनच्या निषेधार्थ यशपाल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा तहसील कचेरीवर जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.

## मंद्रुपमध्ये वीरभद्रेश्वर यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १५ डिसेंबर-**

येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. वीरभद्रेश्वर देवाची यात्रा हजारो भाविकांच्या उपस्थित संपन्न झाला. मंद्रुप येथील वीरभद्रेश्वर मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे.येथील यात्रेस अनेक वर्षाची मोठी परंपरा आहे. यंदाही यात्रा उत्साहाने साजरा झाला. शुक्रवारी रात्री दहा वाजता विधिवत पूजा करून अग्री प्रज्वलित करण्यात आली. याच ठिकाणी शोभेचे दारूकाम झाले. रात्री मंदिरात श्री. वीरभद्रेश्वर व काशी विश्वनाथ भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम पार पडला.

शनिवारी पहाटे श्री.वीरभद्रेश्वर देवास महाभिषेक करण्यात आले. त्यानंतर सकाळी दहा वाजता 'श्री'ची नंदीध्वज व पालखीची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.त्यानंतर दुपारी बारा वाजता अग्निप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला.त्यानंतर मंदिरात पालखीचे आगमन होऊन येथे 'श्री'ची म



हाआरती करण्यात आले त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रगतशील शेतकरी बाळासाहेब तोडकरी यांच्या निवासस्थानी जंगम, सुतार आणि पुरवंतांना आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. यावेळी भाजपा नेते मनिष देशमुख यांनीही देवस्थानाला भेट देऊन 'श्री'चे दर्शन घेतले.

यावेळी नागनाथ सिंहासन, शिवानंद सिंहासन, विश्वनाथ सिंहासन, वीरभद्र सिंहासन, अप्पासाहेब उंबरजे, चंद्रशेखर हिरेमठ, मळसिद्ध मुगळे, गौरीशंकर मेंडगुदले, गुरय्या स्वामी, विश्वनाथ हिरेमठ, राजशेखर उंबरजे, राजेश सि. स्वामी, अशोक सिंदखेडे, शांतय्या स्वामी, शिवय्या स्वामी, विश्वनाथ सिंदखेडे, ॲड. नागेश मेंडगुदले, सिद्राम बिराजदार, शिवण्णा पंचम, इरण्णा सुतार, सीताराम सुतार, सिद्धण्णा लिगाडे, सुभाष लिगाडे, सिद्धलिंग म्हेत्रे, सुरेश स्वामी, राजशेखर स्वामी, षडाक्षरी स्वामी, श्रीशैल स्वामी, विवेकानंद सुतार यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहोळ येथे रेल्वे गाड्यांना थांबा द्या

**प्रवासी संघटना, भाजपाचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १५ डिसेंबर-**

मोहोळ येथे रेल्वे स्टेशनवर पूर्ववत गाड्यांना थांबा मिळावा यासह अन्य मागण्यांसाठी मोहोळ प्रवासी संघटना आणि मोहोळ भारतीय जनता पार्टीच्या वतीने रेल्वेचे मुंबईचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी प्रवासी संघटनेचे सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष एडवोकेट अविनाश काळे, रेल्वेचे मोहोळ स्टेशन स्थानिक सल्लागार समिती आणि भाजपा प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सहसंयोजक अविनाश पांढरे, सरचिटणीस तथा पत्रकार महेश सोवनी,भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुशील भैय्या क्षीरसागर,सुरेश राऊत, ज्येष्ठ विक्रेते छगन अष्टूळ ज्येष्ठ



पत्रकार राजकुमार शहा, धनंजय मोहोळकर- पाटील,मच्छिंद्र गाडे पाटील, दत्तात्रय वाघमोडे, बळीराम सर्वगोड, आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष रमेश बारस्कर त्यांचे सहकारी तसेच शिवसेना उभाठा चे माजी नगरसेवक सत्यवान देशमुख महादेव इंगळे पवार आदींनी याच मागण्याचे निवेदन त्यांना दिले. लवकरच विचार करून सिद्धेश्वर एक्सप्रेस, हुतात्मा एक्सप्रेस,कन्याकुमारी एक्सप्रेस, सोलापूर पुणे इंटरसिटी,आणि कलबुर्गी कोल्हापूर या रेल्वे गाड्यांना मोहोळ येथे थांबा देण्याची तसेच रिझर्वेशन काउंटर पूर्वत सुरू करण्याची सर्वांनी आग्रही मागणी केली.

या मागण्यांना मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक (मुंबई) धर्मवीर मीणा सकारात्मक प्रतिसाद दिला. लवकरच रिझर्वेशन काउंटर सुरू होईल असे आश्वासन त्यांनी दिले.

## महेश मांजरेकर, रेणुका शहाणेंची जोडी झळकणार

**देवमाणूस चित्रपटात येत आहेत एकत्र**

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

अभिनेते महेश मंजरेकर आणि अभिनेत्री रेणुका शहाणे, त्यांच्या तीन दशकांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत प्रथमच एका आगामी मराठी चित्रपट 'देवमाणूस' साठी एकत्र येत आहेत.अभिनेते महेश मांजरेकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत स्वत:चा ठसा चांगलाच उमटवला आहे.दुसरीकडे अभिनेत्री रेणुका शहाणे,हम आपके है कौन, अबोली, जानिवा यांसारख्या चित्रपटांतील त्यांच्या अभूतपूर्व भूमिकांमुळे प्रसिद्ध आहेत. टीव्ही आणि चित्रपट या दोन्ही क्षेत्रात दमदार कारकीर्दीसह, त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहे.अभिनेते महेश मांजरेकर म्हणाले, देवमाणूस सारख्या चित्रपटामध्ये रेणुकासोबत काम करणे हा माझ्यासाठी एक खूप बहुप्रतिक्षित सर्जनशील प्रवास वाटतो. मी सध्या या नव्या ऑन-स्क्रीन भागीदारीबद्दल खूप जास्त उत्साहित आहे आणि आशा करतो



की आपले प्रेक्षक सुद्धा आमच्या या नव्या जोडीसाठी असाच उत्साह दाखवतील.तसेच अभिनेत्री रेणुका शहाणे या म्हणाल्या, देवमाणूसच्या निमित्ताने मी महेश सोबत जरी पहिल्यांदा काम करत असले तरी आम्ही एकमेकांना खूप वर्षांपासून ओळखतोय, त्यामुळे असं वाटलंच नाही की आम्ही यापूर्वी एकत्र काम केल नाहीये. मला खात्री आहे देवमाणूस बघून प्रेक्षकांना काहीतरी दमदार बघितल्याचं समाधान मिळेल.

### १९ डिसेंबर रोजी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रम

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

जिल्ह्याचा सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम गुरूवार, दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होणार आहे. यावेळी ध्वजदिन -२०२३ निधी संकलनात उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे. सदर कार्याक्रम महानगरपालिका आयुक्त शीतल तेली उगले, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस आयुक्त एम. राज कुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. तरी सदर कार्यक्रमास जिल्हयातील शासकीय, निमशासकीय कार्यालयांचे प्रमुख, जिल्हयातील माजी सैनिक, सैनिक विधवा,वीरमाता पिता व वीरपत्नी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.



## मंद्रुपमध्ये दत्त जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, १५ डिसेंबर-**

मंद्रुपमध्ये दत्तजयंतीनिमित्त १० डिसेंबर ते १४ डिसेंबरपर्यंत जय हनुमान भजनी मंडळाचे भजन कार्यक्रम पार पडले. शुक्रवारी गाणगापूर येथील दत्तमंदिरातून पादुका आणण्यात आले. शनिवारी राजकुमार अतार महाराज यांच्या हस्ते पहाटे 'श्री'स महाभिषेक करण्यात आला.

रविवारी दुपारी १२ वाजता मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार व भाजपाचे जिल्हा सरचिटणिस मनिष देशमुख यांच्या हस्ते पूजा करून पाळण्याचा कार्यक्रम पार पडला. दुपारी ४ वाजता दत्त मंदिरापासून महात्मा बसवेश्वर चौक, मुख्य रस्त्यावरून हुतात्मा चौक बसस्थानकवरून मंद्रुप पोलीस ठाण्यापर्यंत पारंपारिक वाद्यांच्या समवेत पालखीसह श्रींची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मंद्रुप पोलीस ठाणे येथे महाप्रसाद वाटप करण्यात आले.

यावेळी उपसरपंच भगवान व्हनमाने, लक्ष्मण सुतार, संतोष राठोड, सिद्राम हेळकर, सतीश वेर्णेकर, शरणु हेळवी, बाळासाहेब उतरे, महांतेश धुळखेडे, शिवानंद ख्याडे, मल्लिनाथ बगले, भागण्णा कल्याणी, राजकुमार रावत, अरूण देशपांडे, राजकुमार दळवी, आनंद सुरवसे, संतोष तेली, लाड गुरूजी, गिरीष कुलकर्णी, भगवान सुतार, बसवराज सुतार, परशू कट्टीमनी आदी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये पालखी मिरवणुकीने श्री दत्त जयंती उत्सवाची सांगता

**दर्शनासाठी भाविकांची गर्दी; वटवृक्ष देवस्थानतर्फे भाविकांसाठी विविध सोयीसुविधा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ डिसेंबर-**

अक्कलकोट निवासी दत्तावतारी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मूळस्थान श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने दत्त जयंती उत्सवाची सांगता रविवारी सायंकाळी निघालेल्या श्रींच्या पालखी मिरवणुकीने झाली.

दत्तजयंती निमित्त आज रविवार रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत वटवृक्ष देवस्थानच्या वतीने देवस्थानच्या भक्त निवास येथील भोजनकक्ष येथे सर्व स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद देण्यात आले. हजारो स्वामी भक्तांनी या भोजन महाप्रसादाचा लाभ घेतला. दरम्यान आजही पौर्णिमेचा कालावधी असल्याने हजारो स्वामी भक्तांनी स्वामींच्या दर्शनाचा लाभ घेतला. सायंकाळी ५ वाजता सद्गुरू श्री स्वामी समर्थांच्या पालखी मिरवणुकीची प्रारंभीक आरती पुरोहित मंदार पुजारी यांचे हस्ते होऊन मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली प्रथमेश इंगळे यांचे हस्ते पालखी पूजन करून सालाबादप्रमाणे पालखी मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आले.

या पालखी मिरवणुकीत समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे व मंदार महाराज पुजारी यांच्यासह सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त संपतराव शिंदे, महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, दयानंद हिरेमठ, राजेश निलवाणी, प्रा.नागनाथ जेऊरे, गणेश दिवाणजी, मंगेश फुटाणे, रामचंद्र समाणे, गिरीश पवार, सागर गोंडाळ, संजय पवार, नरसिंग क्षीरसागर, प्रसन्न हत्ते, किरण किरात, शशिकांत लिंबितोटे, अमर पाटील, निखिल पाटील, दिलीप हजारे, शिवशरण अचलेर, दिपक जरिपटके, संजय बडवे, चंद्रकांत सोनटक्के, प्रसाद किलजे, अण्णा सावंत, विजय इंगळे, प्रथमेश पवार, वैभव मोरे, प्रसाद सोनार, ऋषिकेश लोणारी, स्वामीनाथ लोणारी, महेश काटकर, संतोष जमगे, श्रीशैल गवंडी, अक्षय सरदेशमुख, बाळासाहेब घाटगे, प्रदीप हिंडोळे, बंडेराव घाटगे आदींसह मराठवाड्यातील लातूर, उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर इत्यादी भागातून दिंडयांसह टाळकरी, विणेकरी, आदींसह हजारो स्वामी भक्त व दत्तभक्त स्वामी नामाच्या जयघोषात सहभागी झाले होते.



**महाप्रसादाचे वाटप**

श्रींची पालखी मिरवणूक अक्कलकोट शहरातील प्रमुख मार्गावरून बुधवार पेठेतील श्री स्वामी समाधी मठापर्यंत व तेथून परतीस रात्री साडेनऊ वाजता पालखी मिरवणूक वटवृक्ष मंदिरात आल्यानंतर सर्व स्वामी भक्त, सेवेकरी, टाळकरी, विणेकरी, भजनकरी आदींना देवस्थानच्या वतीने शिरा प्रसाद वाटप करून दत्त जयंती उत्सवाचा सांगता समारंभ झाला.



### दहिगावमध्ये शिक्षक-पालक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नातेपुते, दि. १५ डिसेंबर-**

श्री १००८ महावीर स्वामी दिगंबर जैन अतिशय क्षेत्र दहिगाव संचलित, विलासचंद्र एम. मेहता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) दहिगावमध्ये शिक्षक-पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष अनंतलाल दादा दोशी होते.

यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष अमृतलाल गांधी, रोनक चंकेश्वरा उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी कोषाध्यक्ष अमृतलाल गांधी, रत्नत्रय अकॅडमीचे चेअरपर्सन रोनक चंकेश्वरा, आयटीआयचे प्राचार्य गजेश जगताप, मुख्याध्यापक सतीश हांगे, शिवराम नाळे, निलेश शेंडे, गणेश खंडागळे, पूजा चव्हाण, शुभांगी जाधव, सुभाष शिरतोडे, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक सतीश हांगे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### शांतकुमार मोरे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

साप्ताहिक मावळ मराठाच्यावतीने ज्येष्ठ पत्रकार शांतकुमार मोरे यांचा ज्येष्ठ इतिहास अभ्यासक प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांच्या हस्ते राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देवून गौरविण्यात आले. सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या कार्यालयात सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून त्यांना गौरवले. यावेळी व्यासपीठावर साप्ताहिक मावळ मराठाचे संपादक सदानंद खोपकर, सिमांतीनी उपस्थित होते. यावेळी दै. तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने व दत्ता थोरे यांनी मनोगतातून सत्कारमूर्ती विषयींच्या भावना व्यक्त केल्या. पत्रकारितेच्या माध्यमातून आयुष्य समर्पित केलेल्या कृतीशील निवृत्त पत्रकार म्हणून विशेष गौरवपत्र देण्यात आले. गौरवपत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या पत्रकारितेतील कार्याचा यथोचित गौरवास्पद उल्लेख केला. सूत्रसंचालन दत्ता थोरे यांनी केले. यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### प्रल्हाद नगर येथे पथदिवे बसवण्याचे कामकाज पूर्ण; नागरिकांतून समाधान

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

जुळे सोलापूरातील प्रभाग क्र.२६ मध्ये अवंती नगर येथील नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले होते. ज्या हद्दवाढ भागातील प्रल्हाद नगर येथे अवंती नगरच्या नागरिकांना स्थलांतरित केले होते. तेव्हा अनेक सोयी सुविधांचा अभाव येथे होता.. स्थलांतरित नागरिकांना सोलापूर महानगरपालिका हद्दीतील प्रल्हाद नगर येथे तात्पुरत्या स्वरूपात जागा उपलब्ध करून देऊन तेथे फिरते शौचालय, लाईट साठी इलेक्ट्रिक पोल, लावण्यात आले होते. परंतु येथे पथदिवे नसल्याने संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळेस अंधारमय होत असे, यासंबंधी स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी महापालिकेला, तसेच अधिकाऱ्यांना निवेदन दिले. तरी देखील समस्येवर तोडगा निघत नव्हता. त्यामुळे कंटाळून येथील नागरिकांनी प्रभागाच्या माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांना समक्ष भेटून समस्या सांगितल्या. दरम्यान, त्यानंतर संबंधित स्थलांतरित नागरिक यांना घेऊन माजी नगरसेविका चव्हाण यांनी महापालिकेच्या आयुक्त शितल तेली उगले यांना निवेदन दिल होते. त्याची दखल घेऊन आज येथे पथदिवे सुरू करण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे तेथील स्थलांतरित नागरिकांनी माजी नगरसेविका राजश्री चव्हाण यांचे आभार मानले.

### जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षपदासाठी सातलिंग शटगार यांची मागणी

**सोलापूर दि.१५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी सातलिंग शटगार यांची निवड करण्यात यावी, अशी मागणी ई-मेलद्वारे देशाचे नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, खासदार प्रणितीताई शिंदे, प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे त्यांनी केली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यातील पक्षाचे नेतृत्व बदलण्याचे संकेत आहेत. सातलिंग शटगार हे गेल्या २० वर्षापासून अतिशय प्रामाणिकपणे काम करीत आले आहेत. आतापर्यंत त्यांनी जिल्हा सरचिटणीस, जिल्हाउपाध्यक्ष, जिल्हा समन्वयक, जिल्हा मिडीया प्रमुख, जिल्हा निरीक्षक, तालुका निरीक्षक अशा विविध पदावर काम केलेले आहे. सध्या ते सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचा प्रवक्ते, वरीष्ठ उपाध्यक्ष, जिल्हा प्रसिध्द प्रमुख म्हणून काम करीत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील लोकसभा, विधानसभा व तालुक्याची संपूर्ण माहिती त्यांना आहे. त्यांना मानणारा वर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा सुपुत्र असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांना माहिती आहेत. यामुळे सोलापूर जिल्हा काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष म्हणून निवड झाल्यास जिल्ह्यात काँग्रेस पक्षामध्ये कोणत्याही प्रकारचे गट-तट न करता सर्वांना सोबत घेवून जाईन असा शब्दही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. यासाठी त्यांची सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात यावी. अशी मागणी ई- मेलद्वारे वरीष्ठाकडे त्यांनी केली आहे.



### स्वत:च्या फायद्यासाठी रक्कम वापरून अपहार केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सोलापूर दि.१५ डिसेंबर-**

स्वत:च्या फायद्यासाठी रकमेचा वापर करून अपहार केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना सप्टेंबर २०२३ ते जून २०२४ दरम्यान पाथरूट चौक येथे घडली. याप्रकरणी तौसिफ म. शफिक बागवान (वय-३८, रा. साखर पेठ, बुर्ला कॉलेज जवळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून साहेब अनिस सय्यद (वय-२९, रा. शहेबाज हॉल मागे,नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आरोपी याने हारूण ट्रेडर्स फर्मचे विक्री केलेले साहित्याची विक्री प्रतिनिधी म्हणून पैशाची वसुली केली. त्यानंतर फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्याच्या पदाचा दुरुपयोग करून फिर्यादी यांच्या संमतीशिवाय स्वत:च्या फायद्यासाठी रकमेचा वापर करून आभार केला आहे, असे फिर्यादित म्हटले आहे. पुढील तपास पोसई बनकर हे करीत आहेत.

# सोलापूर बनले 'सोलर' पूर

- जिल्ह्यात रूप-टॉप सोलरचे आठ हजार अर्ज मंजूर; २ हजारकामे पूर्ण
- जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

पीएम सूर्यघर योजना ही भारत सरकारने सुरू केलेली एक महत्वाकांक्षी योजना आहे. या अंतर्गत देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. तरी ही योजना सोलापूर जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंतच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी वीज वितरण कंपनीने योग्य नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पीएम सूर्यघर योजना २०२४ जिल्हास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने, कार्यकारी अभियंता आशिष मेहता, रमेश राठोड, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक प्रसन्न चित्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत इशादीन शेळकंदे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, पीएम सूर्य घर योजना अंतर्गत आज रोजी पर्यंत महावितरणच्या पोर्टलवर ७९६९ अर्ज प्राप्त असून



त्यातील ७९२६ अर्जांना महावितरण्य मंजुरी दिलेली आहे व ५८११ सोलरचे काम सुरू असून २११५ सोलर चे काम पूर्ण झालेले आहे तरी उर्वरित रूप टॉप सोलर चे काम त्वरित मार्गे लावावे. व जिल्ह्यातील अन्य पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी वीज वितरण कंपनीने मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे प्रबोधन करावे. गावोगावी जाऊन आपल्या लाईन स्टाफ मार्फत या योजनेचे महत्त्व नागरिकांना पटवून द्यावे. या योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात काम करणाऱ्या वेंडरची स्वतंत्र बैठक आयोजित करावी,




असेही त्यांनी सुचित केले. सद्यस्थितीत या योजनेची बँकाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या बँक निहाय जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावी. तसेच सर्व बँकांशी एक स्वतंत्र बैठक या योजनेच्या अनुषंगाने घेऊन त्यांना या योजनेअंतर्गत ची प्रकरणे विहित पद्धतीने त्वरित मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी पीएम सूर्यघर योजना जिल्ह्यात कशा पद्धतीने राबवली जात आहे याविषयी माहिती दिली. वीज वितरण कंपनीकडून २११५ काम पूर्ण झालेल्या रूट ऑफ सोलर च्या माध्यमातून ७.६५ किलो वॅट क्षमतेची वीज निर्मिती झाल्याचे सांगितले. तसेच जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. तसेच सौर ग्राम योजनेअंतर्गत चिंचणी (पंढरपूर), धानोरे (माळशिरस), हिपळे (दक्षिण सोलापूर) या गावांची निवड करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

**पीएम सूर्य घर योजना म्हणजे काय?**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेची घोषणा केली. ही योजना रुफ टॉप सोलर योजना आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करून १ कोटी घरांना प्रकाश देण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत शासन अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करेल त्यांना सवलतीच्या दरात बँक कर्जही दिले जाईल यासाठी एक राष्ट्रीय ऑनलाईन पोर्टल तयार केले जाईल. यामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा एकत्रित केल्या जातील एक प्रकारे हे पोर्टल इंटरफेस सारखे कार्य करणार आहे.





सोलापूर : शहरात रविवारी सकाळी बाळीवेस परिसरात होटगी मठ येथुन प.पू.श्री.ष.ब्र.तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या शिलामूर्तीची राजवैभव मिरवणूक काढण्यात आली. (छायाचित्र : केवल तिवारी)

## तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या शिलामूर्तीची मिरवणूक

- गुरुपुण्याराधना अन् सांस्कृतिक नृत्यविष्कार कलेचे विद्यार्थ्यांकडून सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

श्री ब्रह्नमठ होटगी होटगी मठाचे तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्या पुण्याराधनानिमित्त रविवार, दी. १५ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता प.पू.श्री.ष.ब्र. तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांच्या शिलामूर्तीची राजवैभवाने मिरवणूक काढण्यात आली. त्याच पद्धतीने दुपारी नूतन मंदिरास शिखराभिषेक दुपारी ४ वाजता करण्यात आले.

या मिरवणुकीत हजारो भक्तगण १५ किलोमीटरचे अंतर पायी चालले. सांस्कृतिक नृत्याविष्कार सादर करत विद्यार्थ्यांनी मंत्रमुग्ध केले. आकर्षक फुलांच्या सजावट केलेल्या रथामध्ये तपोरत्न योगीराजेंद्र महाराजांची नवी प्रतिमा विराजित करण्याचा आली होती. या सजवलेल्या रथासमोर विद्यार्थ्यांनी आपले कालाविष्कार सादर केले. दरम्यान, बाळीवेस येथील मठात विधिवत पूजा आणि महारती करून महास्वामी यांच्या शिलाम ूर्तीचे राजवैभवाने मिरवणूक मार्गस्थ झाली. सदरची मिरवणूक श्री मल्लिकार्जुन मंदिर, मधला मारुती, आजोबा गणपती, गुरुभेट, सात रस्ता, मजरेवाडी (विसावा), साखर कारखाना मार्गे ही मिरवणूक होटगी येथील मठात पोहोचल्यानंतर - मिरवणुकीची सांगता झाली. आज दुपारी ४ वाजता नूतन मंदिरास शिखराभिषेक करण्यात आला. तपोरत्न यांच्या सातव्या पुण्याराधनानिमित्त विविध धार्मिक, शैक्षणिक व समाजोपयोगी कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष चन्नयोगिराजेंद्र शिवाचार्य स्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आल्याची माहिती काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी दिली.

**मिरवणूक मार्गांवर शोभायात्रेचे आयोजन**

श्री ब्रह्नमठ होटगी संस्थेच्या विविध शाळेच्या वतीने मिरवणूक मार्गांवर शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेच्या बालगोपाळांनी विविध वेशभूषा परिधान करत लक्षवेधी मिरवणूक काढली. यामध्ये पौराणिक आणि धार्मिक वातावरणात नृत्याविष्कार सादर करत सर्वांना मंत्रमुग्ध केले.




## दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर गायडन्स खूप महत्वाचे : यावलकर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर -**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ तर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शिवस्मारक सभागृहात शनिवारी मोफत करिअर गायडन्सचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाची सुरुवात सोलापूर जिल्हा पोलिस दलाचे अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांचे हस्ते दीपप्रज्वलनाने आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी पुण्याचे योगेश नागपाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अप्पर पोलिस अधिक्षक यावलकर यांनी करिअर गायडन्स विद्यार्थ्यांसाठी किती महत्त्वाचे आहे हे सांगितले व मुलांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अप्पर पोलिस अधिक्षक प्रीतम यावलकर यांचा सत्कार रोटरीच्या अध्यक्षा डॉ. जानवी मखिजा आणि संचालक सुनील दावडा यांनी केला. प्रास्तविक आणि प्रमुख अतिथी यांची ओळख दीपक आहुजा यांनी करून दिली. यावलकर यांचे हस्ते योगेश नागपाल यांचा सत्कार झाला. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी एम आय टी चे प्राचार्य स्वप्नील शेठ, रोटरीचे आरती गांधी, दीपक आर्वे, आसावरी सराफ, दौलत सिताफळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव स्वप्नील कोंडगुळे यांनी केले तर आभार प्रदर्शन सुनील दावडा यांनी केले.








सोलापूर : सोलापूर शहरात बाळे येथील खंडोबा मंदीरात दर्शनासाठी गर्दी केली होती. तसेच लंगर तोडण्याचा कार्यक्रम पार पडला. (छायाचित्र : केवल तिवारी)

**खंडोबा मंदिर परिसरात लख्ख पडला प्रकाश दिवट्या मशालीचा...**

## यात्रेचा दुसरा रविवार...आकर्षक सजावटीने सजले मंदिर परिसर; भंडाऱ्याची मुक्त उधळण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

मार्गशीर्ष महिन्यातील दुसऱ्या रविवारी तीर्थक्षेत्र बाळे येथील श्री खंडोबा मंदिरात श्रींचे दर्शन घेण्यासाठी आबालवृध्द भाविकांची अलोट गर्दी होती. यावेळी मंदिर परिसरात भंडारा उधळून येळकोट... येळकोट....जय मल्हार..... सदानंदाचा येळकोट...... हा जयघोष करण्यात आला.

दरम्यान, तीर्थक्षेत्र श्री खंडोबा मंदिरात आज सकाळ पासूनच भाविकांची मांदियाळी होती. यात्रेनिमित्त श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात तसेच मंदिरात सुमारे शंभर ते दीडशे किलो शेवंती आणि झेंडूच्या फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. यामुळे सारा परिसर उकळून निघाला होता.

सर्वत्र भंडाऱ्याची मुक्त उधळण करत यळकोट यळकोट जय मल्हार सदानंदाचा येळकोट हा जयघोष करीत श्रींना नैवेद्य अर्पण करण्यात आला. श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या भाविक भक्तांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी देवस्थानच्या वतीने दर्शनरांग तसेच सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**मंदिरात फुलांची आरास**

श्रींच्या गर्भ गाभाऱ्यात तसेच मंदिर परिसरात शेवंती आणि झेंडूच्या फुलांची सजावट करण्यासाठी सुमारे दीडशे फुलांचा वापर करण्यात आला. मंदिराच्या दर्शनी भागात भू कैलास पतये नमः अशी सौंदर्यपूर्ण सजावट केल्याने मंदिर परिसर सजून गेल्याचे दिसून आले. श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून मंदिर प्रशासन आणि देवस्थान ट्रस्टच्या वतीने सोई सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. सुरक्षेसाठी पोलिसांचा ताफा तैनात करण्यात आला आहे.

**- विनय ढेपे, अध्यक्ष, श्री खंडोबा देवस्थान, बाळे**

**सकाळी विविध धार्मिक विधी संपन्न**

श्री खंडोबा देवस्थान बाळे येथील मंदिरात यात्रेच्या दुसऱ्या रविवारी पहाटेपासून संध्याकाळपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. सकाळी पाच वाजता काकड आरती, त्यानंतर श्रींचे महापूजा सकाळी आठ वाजता संपन्न झाली. दुपारी जागरण गोंधळ, नवस, आणि नवजात शिशुचा नामकरण सोहळा, संध्याकाळी नऊ वाजता श्रींच्या पालखी छबिना गावप्रदक्षणा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. यात्रेच्या दुसऱ्या रविवारी मंदिर परिसरात भाविकांचे अलोट गर्दी होती.

**- सागर पुजारी, सचिव, श्री खंडोबा देवस्थान, बाळे**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# सोलापूरच्या वैष्णवीचा कर्नाटकात सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

बी.एल.डी आयुर्वेद मेडिकल कॉलेजमध्ये सोलापूरच्या डॉ वैष्णवी गणेशकर हिचा कर्नाटकात सन्मान करण्यात आला आहे.

या मेडिकल कॉलेजमध्ये सन २०२४-२५ या वर्षात डॉ. वैष्णवी हिने मेडिकल कॉलेजमध्ये फस्ट रॅंक मध्ये येऊन प्रथम क्रमांक पटकावला. या मेडिकल कॉलेजमध्ये पदवीप्रदान समारंभ आयोजित केला होता. पदवीप्रदान झाल्या नंतर उमा रेड्डी यांच्या कडून पंचवीस हजार रुपये रोख व प्रशिस्त पत्र देवून सन्मानित करण्यात आले व शल्य चिकित्सक या विषयात प्रथम क्रमांक त्यांनी मिळविला म्हणून रोख पाच हजार रुपयेचे बक्षिस म्हणून डॉ वैष्णवी हिने पटकावले. डॉ. अश्विनी यांच्याकडून पाच हजार रुपयेचे चरक संहिता हे पुस्तक देवून डॉ. वैष्णवी हिला सन्मानित करण्यात आले. यावेळी बी.एल.डी आयुर्वेद मेडिकल कॉलेजचे प्राचार्य संजय कडल्लीमठ्ठि व बी.एल.डी आयुर्वेद महाविद्यालयचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.






https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### १६ डिसेंबरपासून ओंकार साधना शिबीर

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांच्या प्रेरणेने योगविहार येथे ओंकार साधना शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ज्येष्ठ साहित्यिक, कवियत्री श्रीमती सुनेत्रा पंडित या घेणार आहेत. यापूर्वी श्रीमती सुनेत्रा पंडित यांनी योगविहारांमध्ये घेतलेल्या ओंकार साधना शिबिरार्थींना सकारात्मक परिणाम अनुभवास आले आहेत. सोमवार दि. १६ ते शुक्रवार दि.२० डिसेंबर या ५ दिवसासांठी सायंकाळी ४ ते ५ या वेळेत शिबिर योगविहार, महातपस्वी श्री कुमारस्वामीजी आश्रम, इंदिरानगर जवळ, विजापूर रोड, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा.

### घरासमोर का थांबला असे विचारल्यावर मारहाण

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

घरासमोर का थांबला असे विचारले असता संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना तू आम्हाला विचारणारा कोण असे म्हणून हाताने व बुक्क्यांनी मारहाण करून लोखंडी पाईपने फिर्यादी यांच्या डोक्यात मारून तुला बघून घेतो अशी धमकी दिल्याची फिर्याद तिपण्णा सिद्राम केंचनाळ (वय-३८,रा. धाकटी ईरण्णा वस्ती) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून निलेश ऊर्फ ढोले माढेकर व सचिन माढेकर (रा.धाकटी ईरण्णा वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १४ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता सुमारास धाकटी ईरण्णा वस्ती येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.



### शिवीगाळ करून मारहाण; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १४ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सिद्धार्थ नगर येथे घडली.याप्रकरणी साईनाथ यादगिरी चिंताकिंदी (वय-३९,रा. सिद्धार्थ नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश यादगिरी चिंताकिंदी (वय-३७,रा.सिद्धार्थ नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या पत्नीने आईस तुम्हाला पाणी लवकर गरम करता येत नाही का असे म्हणाले असता, आईस का बोलली या कारणावरून गणेश याने फिर्यादी व तिच्या पत्नीस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.तसेच चुलीजवळ पडलेले लाकडाने फिर्यादीच्या हातावर मारून दुखापत केली आहे, असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### पाच एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने पळवल्या

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

वाहनात ठेवलेल्या पाच सॅमसंग कंपनीच्या एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मे २०२३ ला डाळिंब संशोधन केंद्राजवळ घडली. एका वर्षानंतर याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात श्रीकांत अरुण डांगे (वय-३४, मु. पो. उळे,तालुका दक्षिण सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध तब्बल एक वर्षानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मे २०२३ मधील एका दिवशी (तारीख आठवत नाही) पहाटे पाच वाजण्याच्या दरम्यान पुणे सोलापूर कडे जाणाऱ्या सर्विस रोडवर डाळिंब संशोधन केंद्राजवळ फिर्यादी यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच. १३. डीक्यू. ४८०८ हे वाहन थांबून प्राताविधीसाठी गेले असता,वाहनाच्या मागील बाजूस हौदात ठेवलेल्या १ लाख ७१ हजार रुपये किमतीच्या पाच सॅमसंग कंपनीच्या एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या आहेत.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस नाईक भीमदे हे करीत आहेत.



# सोलापूरच्या पदरी निराशाच

## दिग्गज दोन देशमुखांसह आ. कल्याणशेट्टी, आवताडेही पहिल्या यादीत बेदखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

महाराष्ट्रात तीन दशकांनंतर राज्य सरकारच्या मंत्र्यांचा शपथविधी मुंबईऐवजी नागपुरात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांनी १५ डिसेंबर रोजी नागपुरात दुपारी ४ वाजता गोपनीयतेची शपथ घेतली. महाराष्ट्रात यापूर्वी १९९१ मध्ये नागपुरात शपथविधी सोहळा पार पडला होता. त्यानंतर आता २०२४ मध्ये मुंबईऐवजी नागपुरात शपथविधी सोहळा झाला. मात्र सोलापूरच्या पदरी निराशाच आली आहे. दिग्गज दोन देशमुखांसह आ. कल्याणशेट्टी, आवताडेही पहिल्या यादीत बेदखल झाले आहेत. सोलापुरातील एकाही आमदारांना फोनच आला नसल्याने सर्वांनीच मंत्रीपदाचा नाद सोडला. दरम्यान, यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींसह नागरिकांनीही तीव्र नाराजी व्यक्त केली.



मुंबईतील आझाद मैदानावर पाच डिसेंबर रोजी भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून, तर शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा सुरू होती. शपथविधीसाठी आधी १२ आणि नंतर १४ डिसेंबर तारीख जाहीर करण्यात आली होता. अखेर आता १५ डिसेंबर तारीख निश्चित करण्यात आली होती. मात्र या मंत्रीमंडळात सोलापुरातील एकाही आमदारांना संधी दिली नाही. विधानसभेचं हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून नागपुरात सुरू होणार आहे. त्याआधी एक दिवस सर्व मंत्र्यांना शपथ दिली आहे.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ विस्तारासाठी रविवारचा मुहूर्त निश्चित करण्यात आला होता. यासाठी भाजपमधून मंत्रिपद मिळणाऱ्या आमदारांना खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः केल्यावर शपथ घेण्यासाठी उपस्थित राहण्याच्या सूचना मिळाल्यावर यावर अधिकृत शिक्कामोर्तब होणार होता. मात्र शनिवारी रात्री उशिरापर्यंत आणि आज रविवारी सकाळीही कोणालाही मुख्यमंत्री तथा इतर हायटेक नेत्यांचा फोन आला नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जिल्ह्यातील जाणकार नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपूरमध्येच मंत्रिमंडळ विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी राजभवनात संपूर्ण तयारी झाली होती. दुपारी फोन येण्याचा ४ वाजेचा टायमिंग होता. मात्र जिल्ह्यातील भाजपाच्या पाच आमदारांपैकी कोणालाही मुख्यमंत्र्यांचा फोन आला नाही. शनिवारी सायंकाळी मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींचे पीए एकमेकांच्या स्वीय सहाय्यकांना तुम्हाला फोन आला का ? असे विचारताना दिसून आले. इतकेच नाहीतर दुपारनंतर सर्वांचे डोळे मोबाईलकडेच लागले होते. काही आमदारांनी तर नागपूरला जाण्यासाठी आपल्या बॅगा तयारच ठेवल्याचेही सांगण्यात आले; मात्र या सर्वांचा एकप्रकारे हिरमोडच झाला आहे.

भाजपमधील संभाव्य मंत्र्यांच्या यादीतही सोलापूरच्या जुन्या आणि बुजुर्ग असलेल्या आमदार सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख यांची नाहीत. इतकेच नाहीतर अक्कलकोट मतदारसंघातील सचिन कल्याणशेट्टी यांच्याही नावाची गेल्या चार दिवसांत मंत्री होणार म्हणून फक्त चर्चाच झाली. एकंदरीत, सोलापुरातील एकाही आमदारांना मंत्रीमंडळात संधी मिळाली नसल्याने जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा दुसऱ्याच जिल्ह्यातील मिळणार हे निश्चित झाले आहे. गेल्या ५ वर्षात तब्बल ५ जणांना पालकमंत्री होण्याची संधी लाभली होती. आगामी पाच वर्षात सोलापूरला परजिल्ह्याचेच किती पालकमंत्री येणार? याबाबतही उलट-सुलट चर्चांना शनिवारी दिवसभर ऊत आला होता.



# शिवाई इलेक्ट्रिक बसला प्रवाशांचा प्रतिसाद

## बीड मार्गावर धावणार नव्या इलेक्ट्रिक बसेस

## सोलापूर आगारात चार्जिंग पॉइंटची वाढणार व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर**

एसटी प्रशासनाकडून प्रवाशांच्या आरामदायी प्रवासासाठी आणि प्रदूषण कमी व्हावे, यासाठी शिवाई इलेक्ट्रिक बसला प्राधान्य दिले जात आहे. यामुळे आता नव्या इलेक्ट्रिक बसेसची खरेदी मोठ्या प्रमाणात सुरु आहे. यात सोलापूर विभागात आणखी चार शिवार्ड गाड्या दाखल झाल्या आहेत. या गाड्यांना आता बीड मार्गावर सोडण्यात येत आहे. यापूर्वी या गाड्या पुणे, लातूर आणि सातारा मार्गावर सुरू करण्यात आले आहेत. या गाड्यांना प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

दरम्यान, सोलापूर एसटी आगारांमध्ये शिवाई इलेक्ट्रिक बस देखभाल दुरुस्तीसाठी कंपनीकडून इलेक्ट्रिशियन आणि मेकॅनिक यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामध्ये सुहास साबळे, शुभम अंबाळे, नरेश पलंगे यांचा समावेश आहे. या शिवाई बसच्या बॅटरीची क्षमता ही सुमारे २४ मेघा हड्स तर मोटरची क्षमताही ५५० डीसी होल्टेज इतकी आहे. तसेच एका तासामध्ये ही बॅटरी फुल चार्जिंग होऊन ३५० किलोमीटर बस धावते. अशी माहिती ओलेक्ट्रा कंपनीचे मनोज चव्हाण यांनी दिली आहे. दरम्यान, या गाड्या खासगी असल्या, तरी त्यांना महामंडळाकडून भाडे करार करून घेण्यात येत आहे. या गाड्यांची देखभाल दुरुस्ती आणि वाहनचालक हा खासगी कंपनीचा असून, त्यातील वाहक मात्र एसटीचा असणार आहे. दरम्यान, सोलापूर विभागात एकूण ९ आगार आहेत. यातील फक्त सोलापूर आगारात इलेक्ट्रिक चार्जिंग पॉइंटची सोय आहे. यामुळे आगारात यापूर्वीच इलेक्ट्रिक शिवाई गाड्या दाखल झाल्या आहेत. सध्या सोलापूर विभागात एकूण १७ गाड्या होत्या, यात शुक्रवारी चार गाड्या दाखल झाल्या. या गाड्या दाखल झाल्यानंतर या गाड्यांना बीड मार्गावर सोडण्यात येत आहेत.




### बीडच्या गाड्यांचे वेळापत्रक

सोलापूरहून पुण्यासाठी धावणाऱ्या शिवाई गाड्यांना प्रवाशांचा खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. काही दिवसांपूर्वी सात गाड्या आल्या. यातील चार गाड्या लातूर मार्गावर आणि सातारा मार्गावर दोन गाड्या सोडण्यात आल्या. या गाड्यांना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यानंतर चार शुक्रवारी सायंकाळी आलेले चार शिवाई गाड्यांना बीड मार्गावर सोडण्यात येत आहे. बीडसाठी सकाळी साडेआठ ते साडेअकरापर्यंत प्रत्येक एका तासाला एक गाडी- सोडण्यात येत आहे. तेथून साडेतीन वाजता परतीसाठी गाडी असणार आहे. याला जवळपास पाचशे रुपये तिकीट असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या गाडीला तुळजापूर, उस्मानाबाद, येरमाळा, येथे थांबा असणार आहे.

### इतर मार्गावर सोडण्यात येणार शिवाई

आरामदायी निमआराम सेवा असल्याने प्रवाशांनी या गाड्यांचा लाभ घ्यावा. पुढील काही दिवसांत आणखी इकेट्रिक शिवाई बसेस येतील, त्यांना प्रवाशांच्या मागणीनुसार इतर मार्गावर या शिवाई गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

**- उत्तम जुंदळे,**
**आगार व्यवस्थापक, सोलापूर**



# श्रीगुरुचरित्र पारायण सोहळ्याची समाप्ती

## छत्र-चामरसह पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

पूर्वभागातील दत्त नगर येथील श्री दत्त मंदिरच्या वतीने श्री दत्त जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या श्री गुरुचरित्र पारायणमध्ये १६० भक्तगण सहभाग नोंदवित मनोभावे दत्ताची आराधना केली. शनिवार, ७ डिसेंबर ते शुक्रवार १३ डिसेंबर या कालावधीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रचामरसह पालखी मिरवणुकीने श्रीगुरुचरित्र पारायण सोहळ्याची समाप्ती करण्यात आली. दत्त नगर येथील श्री दत्त मंदिर परिसरातून छत्रचामरसह पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सनई-चौघडाचा निनाद आणि अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त, दिगंबरा दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जयघोष यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. श्रीदत्त जयंतीच्या दिवशी शनिवार, १४ डिसेंबर २०२४ रोजी श्रींचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची मोठी गर्दी झाली होती. मंदिर परिसरात विविध पूजासाहित्यांची दुकाने थाटण्यात आली होती. ह.भ.प. अजनेयलू दुस्सा महाराज, गोविंद तुम्मा यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आ. देवेंद्र कोठे यांनी पारायणस्थळी भेट देवून पारायणकर्त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेविका इंदिरा कुडकयाल, ॲड. श्रीनिवास कटकूर, देवस्थानचे अध्यक्ष दत्तात्रय सिंगम, महेश देवसानी, गणेश देवसानी, किशोर देवसानी, सरोजनी चिंता, विजयालक्ष्मी देवसानी, श्रीनिवास गरदास, बालाजी सम्गम, धर्मय्या माचर्ला, सनी मडूर, श्रीधर चिठ्याल आदी उपस्थित होते.

## हजारो वऱ्हाडी...साधुसंतांच्या आशीर्वादाने...

# गोरज मुहूर्तावर बांधल्या ३७ जोडप्यांच्या रेशीमगाठी

## 'लोकमंगल'चा सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

## दक्षिणमधील प्रत्येक गावात विवाह सोहळा करणार

## आ. सुभाष देशमुखांनी व्यक्त केला मानस



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

लोकमंगल फौंडेशनतर्फे आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्याची... रविवारच्या गोरज मुहूर्तावर...लगीनघाई सुरु होती... व्यासपीठावरील श्री विठ्ठलाची भव्य मूर्ती व वारकरी दिंडींची प्रतिकृती उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. ३७ जोडपी कपाळाला बाशिंग बांधून लग्नमंचावर आली...आयुष्यभर साथ देण्यासाठी...त्यांच्या रेशीमगाठी बांधण्यासाठी अन् आशीर्वाद देण्यासाठी. विविध गावची हजारो वऱ्हाडी मंडळी, सर्वधर्मिय साधुसंतांची उपस्थिती होती. याचे साक्षीदार होण्यासाठी विविध क्षेत्रावर मान्यवरही आले. आणि सायंकाळी ६ वा. १५ मिनिटाच्या दरम्यान... हा लोकमंगल फाऊंडेशन आयोजित हा देखणा विवाहसोहळा प्रतिवर्षीप्रमाणे उत्साहात आणि आनंदात पार पडला. दरम्यान, याच विवाह सोहळ्यात माजी सहकारमंत्री तथा आ. सुभाष देशमुख यांनी आगामी वर्षांपासून प्रत्येक गावात असा विवाहसोहळा पार पाडण्याचा आपला संकल्प सोडला.

आ. सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आज दि. १५ डिसेंबर रोजी विजापूर रोडवरील शिवाजी अध्यापक विद्यालय नेहरुनगर (डी. एड. कॉलेजच्या) मैदानावर हजारो मान्यवरांच्या उपस्थिती हा देखणा सोहळा पार पडला. या विवाह सोहळ्यात लोकमंगल फाऊंडेशनच्या नोंदणीकृत ३७ वधू-वरांनी रेशीमगाठी बांधल्या. यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी आगामी काळात दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात विवाह सोहळा करण्याचा मानस व्यक्त केला. यासाठी प्रत्येक गावच्या सरपंच, उपसरपंच, ग्रा. पं. सदस्य, सोसायटी चेअरमन आदींनी यामध्ये सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन केले. कारण वधुवरांच्या नातेवाईकांना आणि वऱ्हाडी मंडळींना सोलापुरात सायंकाळी येण्या-जाण्याचा त्रास होतो. यासाठी मतदारसंघातील गावोगाव किमान ५ जोडपी लग्नासाठी स्थानिक नागरिकांनी तयार केल्यास त्याचा संपूर्ण खर्च करण्याची तयारी आ. देशमुखांनी दाखविली. यामुळे आपल्याच गावात अन् घरासमोर लग्न केल्याचा सर्वांना आनंद मिळेल, असाही आशावाद आ. देशमुखांनी यावेळी व्यक्त केला. रविवारी सकाळपासूनच शहरात ही लगीनघाई दिसून येत होती. वधू-वरांना मान्यवरांच्या हस्ते शालू, सफारी ड्रेस व रुखवत साहित्य देण्यात आले. यावेळी रक्तदान शिबिरही घेण्यात आले. लग्न सोहळ्यात उपस्थित असलेल्या वधूवरांच्या पालक तसेच नातेवाईकांना स्वादिष्ट असे भोजन देण्यात आले. या वधू-वरांची उघड्या बग्गीमधून वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी गोरज मुहूर्तावर पार पडलेल्या या विवाहसोहळ्यात माजी खा. जयसिद्धेश्वर महास्वामी, आ. सुभाष देशमुख, लोकमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष रोहन देशमुख, भाजप नेते मनीष देशमुख, पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी माळकवठे, अभिनव बसवलींग महास्वामीजी नागणसूर, श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी नागणसूर, सिध्दलींग महाराज शिरवळ, औदुसिद्ध महाराज आरकेरी, राजशेखर स्वामीजी, शांतलिंगेश्वर विरक्त मठ नंदगाव, महांतेश हिरेमठ स्वामीजी तदेवाडी, पसारा शास्त्री हिरेमठ, सोलापूर महासभेचे अमृतेश्वर शिवाचार्य महास्वामी जिंतूर मठ, हरिभक्त परायण भागवत चौरे महाराज, किरण बोधले महाराज, लक्ष्मण चव्हाण महाराज, सुधाकर इंगळे महाराज, ज्योतीराम चांगभले महाराज, संजय पाटील महाराज, विष्णुपंत मोरे महाराज, बळीराम जांभळे महाराज, अभिमन्यू डोंगरे महाराज नाशिककर, मोहन शेळके महाराज, संजय केसरे महाराज, पंकज गुंड महाराज, पांडुरंग माने महाराज कुमठे आदि साधुसंतांची मांदियाळी होती. या उपस्थित साधुसंतांनी या वधुवरांना आशीर्वाद दिले आणि भावी आयुष्यासाठी मार्गदर्शनही केले.

### आ. सुभाष देशमुख यांनी केले कन्यादान

या सोहळ्यात आ. सुभाष देशमुख आणि त्यांच्या धर्मपत्नी स्मिता देशमुख यांनी प्रथेप्रमाणे वधू-वरांना विवाहाचे कपडे, हळदीच्या कपड्यांसह ताट-वाटी, ग्लास प्रत्येकी ५ नग, बालकृष्णाची मूर्ती, स्टीलचा हंडा, स्टीलचा डबा, तांब्या असे संसारोपयोगी साहित्य देऊन कन्यादान केले.

### विवाह सोहळ्याचे होणार व्यापक स्वरूप

लोकमंगलच्या सामुदायिक विवाह सोहळ्याने व्यापक स्वरूप घेतले आहे. आता आगामी काळात दक्षिण तालुक्यातील प्रत्येक गावात विवाह सोहळा करण्याचा मानस आहे. एका गावात जर पाच जोडप्यांचे विवाह जमले असतील तर संबंधित गावच्या सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी लोकमंगल फोंडेशनशी संपर्क साधावा. गावभोजनासहित गावातच विवाहसोहळा करण्यात येईल.

**- सुभाष देशमुख, आमदार**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९७६

**ब्रम्हादिक पडती पाया ।**
**जे शरण पंढरिराया ।।**

एखाद्या नेत्याला जर कोणी उलट सुलट बोलले तर त्याला तेवढा राग येणार नाही जेवढा त्याच्याकार्यकर्त्याला कोणी बोलले तर येतो. हे खरे आहे. कारण कार्यकर्तेच नसतील तर नेतृत्वाला महत्व उरत नाही. नेत्याचे मोठेपण हे प्रामुख्याने कार्यकर्त्यांवर अवलंबून असते. म्हणून खऱ्या अर्थाने नेत्यापेक्षा कार्यकर्तेच मोठे म्हटले पाहिजेत. त्याप्रमाणे देव मोठा की भक्त मोठा? असा प्रश्न निर्माण केला तर क्षणाचाही विलंब न लावता भक्त मोठा म्हणावे लागेल. देवापेक्षा भक्त मोठा असतो, म्हणूनच देव भक्तांकडे दळू लागायला, पाणी भरायला, खुरपायला, शेले विणायला, ऋण फेडायला, चर्म रंगवायला, गुरे ओढायला, चिखल तुडवायला आल्याचे आपणाला ऐकायला मिळते. एखाद्या मातेचे कोणी कौतुक केले तर तिला आवडेलच असे नाही. मात्र कोणी तिच्या लेकराचे कौतुक केले तर ते तिला निश्चितच आवडेल. अगदी त्याप्रमाणे भक्तांना लेकरू समजून त्यांच्या मदतीला धावणाऱ्या पांडूरंगाला त्याच्या भक्तांना शरण जाणारे, त्यांची सेवा करणारे आवडतात. याची जाण ब्रम्हादिकांनाही आहे. म्हणून संत सेनाजी पंढरीनाथाच्या भक्तांचे ब्रम्हादिकही पाय धरून भाग्यवंत होत असल्याचे सांगतांना, ब्रम्हादिक पडती पाया । जे शरण पंढरिराया ।। असे म्हणतात.



आईने लेकराला बस, उठ म्हटले तर ते ऐकेलच असे नाही. मात्र लेकराने आईला बस, उठ म्हटले तर ती ऐकते. लेकराच्या प्रेमापोटी ती त्याची केवळ काळजीच घेते असे नव्हे, तर ती त्याच्यासाठी वाट्टेल ते करते. याचाच अर्थ असा होतो की, आईकडे असणारी ताकद, शक्ती, बुध्दी सर्व कांही लेकराच्या भोवती ती एकवटते. अगदी त्याप्रमाणे परमेश्वर त्याच्याकडे असणारी ऋध्दि, सिध्दी सर्व कांही भक्तांच्या भोवती एकवटतो. आईने लेकराला सर्वस्व देण्याची तयारी दर्शविण्याची गरज नसते. कारण ती क्षणाचाही विलंब न लागू देता त्याच्यासाठी सर्वस्व अर्पण करायला तयारच असते. अशा अनेक घटना आपण अवती भवती पाहत असतो. लेकरु मोठे झाल्यास थोडे वेगळे वागते. असो, आपणालाही अशा बाबींचा अनेकवेळा अनुभव येत असतो. आई लेकरासाठी सर्वस्व अर्पण करीत असली तरीही लेकराला त्याचे विशेष काही वाटत नाही. कारण त्याला तिच्या प्रेमाशिवाय इतर कांही नको असते. अगदी त्याप्रमाणे व सेनाजींच्या, मोक्षमुक्ती लोटांगणीं । उभ्या तिष्ठती अंगणीं ।। या म्हणण्याप्रमाणे मोक्ष, मुक्ती, ऋध्दि, सिध्दी सर्व कांही भक्तांच्या अंगणात लोटांगण घालत असल्या तरी त्याला त्यांच्याशी कांही देणे-घेणे नसते. हे फक्त नि:स्सिम भक्तांच्या बाबतीत घडते. खऱ्या भक्तांची सेनाजींनी गायीलेली महती अनुभवायची असेल तर नि:स्वार्थ भक्ती करावी लागेल. हे लक्षात असू द्यावे. आई वडिलांच्या प्रेमाचा विसर पडणे म्हणजे माणुसकीचा, जीवनातील आनंदलहरीचा विसर पडणे होय, असे आम्हास वाटते. असो, आपल्या बाबतीत विसर पडूच नयेअशी अपेक्षा.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# महापालिकेतील १४ कनिष्ठ अभियंत्यांच्या अंतर्गत बदल्या

### सात कनिष्ठ अभियंते विद्युत विभागातील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

महापालिकेतील तांत्रिक संवर्गातील १४ कनिष्ठ अभियंत्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.यामध्ये सात कनिष्ठ अभियंता हे विद्युत विभागातील आहेत. मात्र प्रशासनाकडून यानंतर आणखी कनिष्ठ अभियंत्याच्या लवकरच बदल्या करण्यात येणार आहेत. ठराविक अभियंत्यांच्याच बदल्यांची महापालिकेत जोरदार चर्चा आहे.

महापालिकेच्या विविध विभागात वर्षानुवर्षे अनेक कनिष्ठ अभियंता हे एकाच ठिकाणी ठाण मांडून असल्याची ओरड लोकप्रतिनिधी आणि विविध संघटनांकडून सुरू असतानाच त्या कनिष्ठ अभियंत्यांना सोडून महापालिकेतील ठराविक कनिष्ठ अभियंत्यांची अदलाबदल आणि अंतर्गत बदल्या प्रशासनाने केल्या आहेत. महापालिका आयुक्तांच्या आदेशाने महापालिकेतील तांत्रिक संवर्गातील कनिष्ठ अभियंता आणि अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या मात्र नगर अभियंता आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयातील ठराविक कनिष्ठ अभियंत्यांची अदलाबदल करण्यात आली आहे, असे बोलले जात आहे. दरम्यान, वर्षानुवर्षे एकाच ठिकाणच्या कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात आली असल्याचे सांगण्यात येत आहे.



महापालिकेतील नगर अभियंता कार्यालयातील स्थापत्य कनिष्ठ अभियंता मोहम्मद हनीफ बक्षी, आरिफ कंदलगावकर, परशुराम बोमकंटी यांची बदली अनुक्रमे विभागीय कार्यालय क्रमांक ३, सार्वजनिक आरोग्य अभियंता आणि विभागीय कार्यालय क्रमांक ५ येथे करण्यात आली आहे तर विभागीय कार्यालय क्रमांक ३ मधील स्थापत्य कनिष्ठ अभियंता हारुण सिद्दिकी आणि विभागीय कार्यालय क्रमांक २ येथील कनिष्ठ अभियंता विष्णू कांबळे यांची बदली नगर अभियंता कार्यालयाकडे करण्यात आली आहे. तर भूमापक सज्जाद शेख यांची बदली भूमी व मालमत्ता विभाग येथून विभागीय कार्यालय क्रमांक ४ येथे करण्यात आली आहे. महापालिकेतील विद्युत विभागातील सात कनिष्ठ अभियंत्यांची अंतर्गत बदली झाली आहे.

विभागीय कार्यालय क्रमांक २ आणि ३ येथे कार्यरत भाऊसाहेब गेजगे यांची बदली विभागीय कार्यालय क्रमांक १ व २ येथे, विभागीय कार्यालय क्रमांक ३ येथील संदेश शिंदे यांची बदली विभागीय कार्यालयात, विभागीय कार्यालय क्रमांक १ येथील विवेकानंद स्वामी यांची विभागीय कार्यालय क्रमांक ४, विभागीय कार्यालय क्रमांक ६ व ८ येथील प्रेमनाथ पवार यांची बदली विभागीय कार्यालय क्रमांक ५, विभागीय कार्यालय क्रमांक सहा येथील प्रतीक कोल्हे यांची बदली विभागीय कार्यालय येथे, महापालिका विद्युत विभागातील प्रणोती कदम यांची विभागातील कामकाजासह विभागीय कार्यालय क्रमांक ७, विभागीय कार्यालय क्रमांक ४ व ५ येथील परवेज शेख यांची विभागीय कार्यालय क्रमांक ८ येथे तर विद्युत विभागातील कनिष्ठ अभियंता प्रथमेश कुलकर्णी यांची बदली विभागातच करण्यात आली आहे.

# स्थापत्य सेवेचा निकाल रखडला

### विद्यार्थ्यांमध्ये असंतोष; शासनाच्या विविध विभागांमध्ये कंत्राटी पद्धतीने अभियंत्यांद्वारे कामकाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवा मुख्य परीक्षेचा निकाल एक वर्षापासून रखडला असून, विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आहे. महाराष्ट्र स्थापत्य अधिकारी सेवेच्या ४९५ पदांसाठी ४ जून २०२३ रोजी पूर्व परीक्षा पार पडली. तर २८ जानेवारी २०२४ रोजी मुख्य परीक्षा पार पडली. परीक्षा होऊन आता वर्ष संपत आले तरी मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर झालेला नाही.

स्थापत्य अधिकारी सेवेच्या ४९५ पदांसाठी ४ जून २०२३ रोजी पूर्व परीक्षा पार पडली. तर २८ जानेवारी २०२४ रोजी मुख्य परीक्षा पार पडली. राज्यातील लाखोंच्या संख्येने पूर्व परीक्षेला आणि हजाराच्या संख्येने मुख्य परीक्षेला विद्यार्थी बसले होते. आयोगाकडून ठोस तारीख निश्चित नाही. सुमारे ५ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे. याचा निकाल कधी लागणार? याबाबत कोणतीही ठोस माहिती एमपीएससीकडून दिली जात नाही. एमपीएससीच्या कार्यालयात जाऊन विचारणा केली असता, १५ दिवसात निकाल जाहीर होईल, तर कधी पुढच्या महिन्यात निकाल जाहीर होईल असे उत्तर मिळत आहे, असे काही विद्यार्थ्यांनी सांगितले.

दरमयन, शासनाच्या विविध विभागांमध्ये कंत्राटी पद्धतीने अभियंता द्वारे कामकाज सुरू असून, आज घडीला राज्यामध्ये शासकीय विविध विभागामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग जलसंधारणमध्ये तर सर्वात महत्त्वाचे जलजीवन मिशन या अशा अनेक विभागात त्रयस्थ संस्थेकडून कंत्राटी पद्धतीने तुटपुंज्या मानधनावर आज अभियंतांना निवडून त्यांच्याकडून कामकाज करून घेतले जात आहे. राज्यात अनेक शासकीय विभागात हजाराच्या संख्येने कायमस्वरूपी जागा असताना सुद्धा सर्व पदे भरली जात नाही आणि जी पदे भरली जातात त्यांची नियुक्ती दोन तीन वर्षे रखडली जात असल्यामुळे भावी अधिकारी यांच्या मनात उदासीनता दिसून येत आहे

# २० डिसेंबरला प्रदर्शित होणार श्री गणेशा मराठी चित्रपट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

एमएच-१२ सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने निर्माण केलेला 'श्री गणेशा' हा मराठी चित्रपट येत्या शुक्रवार दि. २० डिसेंबरला राज्यभरात प्रदर्शित होणार आहे, अशी माहिती दिग्दर्शक मिलिंद कवडे यांनी दिली.

हा चित्रपट प्रेक्षकांना मनोरंजनाच्या अनोख्या सफरीवर घेऊन जात आहे. मराठी फॅमिली एन्टरटेनर असलेला 'श्री गणेशा' हा मराठीतील एक धमाल रोड मुव्ही आहे. या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस उतरली असून, ट्रेलरलाही तूफान प्रतिसाद मिळत आहे. धमाल रोड ट्रीपचा आणि फॅमिली एंटरटेनमेंटचा हा चित्रपट खऱ्या अर्थाने रोड ट्रीपच्या रोलर कोस्टर राईडवर नेणारा आहे. संजय भोसले आणि कांचन भोसले या चित्रपटाचे निर्मिते, तर रवी भोसले आणि महेश भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. मिलिंद कवडे आणि प्रथमेश परब ही दिग्दर्शक-अभिनेत्याची सुपरहिट जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आली आहे. या चित्रपटात प्रथमेशसोबत मेघा शिंदे ही नवीन नायिका असल्याने नव्या जोडीची केमिस्ट्रीही प्रेक्षकांना आकर्षित करणार आहे. या पत्रकार परिषदेस निर्माते संजय भोसले, कलाकार शशांक शेंडे, प्रथमेश परब, मेघा शिंदे, मानसी शिंदे उपस्थित होते.

## तीन नवीन प्रगत तंत्रज्ञान ट्रॅक्टर्स लाँच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

भारतातील पहिल्या क्रमांकाचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने महाराष्ट्रातील पुणे येथील किसान कृषी प्रदर्शन २०२४ मध्ये दृढ उपस्थिती दाखवली आहे, जेथे कंपनीने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी सानुकूल केलेले सर्वात नाविन्यपूर्ण आणि हेवी ड्युटी ट्रॅक्टर्स दाखवले आहेत. कंपनीने ३ नवीन हेवी ड्युटी ट्रॅक्टर्स सादर केले आहेत - सोनालिका टायगर डीआय २६, सोनालिका चीता डीआय ३२ आणि सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४डब्ल्यूडी, जे महाराष्ट्रातील खडतर जमिनीमध्ये अपवदात्मक कार्यक्षमता देण्यासाठी सानुकूल करण्यात आले आहेत.

# सेवासदन प्रशालेचा भाषा संवर्धन पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रथमा आणि प्रवेश परीक्षेला सर्वाधिक विद्यार्थिनींनी परीक्षा दिल्याबद्दल व सुयश संपादन केल्याबद्दल सोलापूरतील सेवासदन प्रशालेचा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या वतीने डॉ.न.म.जोशी मराठी भाषा संवर्धन पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. हा पुरस्कार प्रशालेतील सहशिक्षिका डॉ.प्रिया निघोजकर यांनी स्वीकारला.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्या वतीने प्रथम आणि प्रवेश या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. पुणे विभागातून सोलापूरच्या सेवासदन प्रशालेतून ३०० विद्यार्थिनींनी ही परीक्षा दिली होती. एकाच प्रशालेतून बहुसंख्येने विद्यार्थिनी परीक्षेस बसवून भाषा संवर्धनासाठी योगदान दिल्याबद्दल हा पुरस्कार सेवासदन प्रशालेला देण्यात आला आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आणि ख्यातनाम वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते सेवासदन प्रशालेच्या सहशिक्षिका



डॉ. प्रिया निघोजकर यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला. विद्यार्थिनींना प्रोत्साहित केल्याबद्दल आणि मार्गदर्शन केल्याबद्दल सहशिक्षिका डॉ.प्रिया निघोजकर यांचाही महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्याच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. या सन्मानाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष शीला मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिवा वीणा पत्की, प्रशालेच्या मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांच्यासह संस्थेच्या सर्व पदाधिकारी, सदस्य, आणि पालकांनी शाळेतील विद्यार्थिनींचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १६ डिसेंबर २०२४ | धनुर्मासारंभ |
| विक्रम संवत् २०८०-८१ | विजय दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. प्रतिपदा - (१२.२७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आर्द्रा (२५.१३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुक्ल (२३.२२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२३.३७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.



# उज्वला-सुशीलरत्न पुरस्काराचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

विश्वकृपा विद्या प्रतिष्ठान बाळे या शैक्षणिक संस्थेच्या मार्गदर्शिका कै. मीनाताई दिगंबर ढेपे यांच्या स्मरणार्थ उज्वला सुशीलरत्न पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

पुरस्काराचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिगंबर ढेपे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहायक लेखाअधिकारी किशोर बारड,पत्रकार भरतकुमार मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. यंदाच्या वर्षी आदर्श शिक्षक म्हणून वंदना जाधव, मुकुंद माळी, रोहित व्होटकर, सारंग पाटील, धर्मा कोरे, सर्पमित्र संतोष धाकपाडे व पत्रकार विकास कस्तुरे या मान्यवर व्यक्तींना या पुरस्काराने गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मुख्याध्यापक अमोल ढेपे व मित्रपरिवार यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सूत्रसंचालन नागटिळक यांनी केले.

## अशासकीय वाहन चालक पदासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात अशासकीय वाहन चालक एक पद भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी केले आहे.

सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी स्वत:ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पदाकरीता उमेदवारास चार चाकी वाहन चालविण्याचा परवाना व अनुभव असणे आवश्यक आहे. हे पद फक्त माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार आहे. तसेच सदर पदाकरीता सैन्यातील वाहन चालक संवर्गातील माजी सैनिकास प्राधान्य देण्यात येईल. तरी जिल्यातील माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा असे अवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# पूर्वभागात आजपासून घुमणार गोविंदा, गोविंदाचा जयघोष

### श्री व्यंकटेश्वर देवस्थानम्च्या वतीने धर्नुमासोत्सवम् रंगनाथ स्वामी व गोदांबा यांचा कल्याणोत्सवम्

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

श्रीक्षेत्र तिरुमला-तिरुपती येथील श्री व्यंकटेश्वर देवस्थानमच्या धर्तीवर सोलापुरातील दाजी पेठ येथील श्री व्यंकटेश्वर देवस्थानम्च्या वतीने सोमवार, १६ डिसेंबर २०२४ ते सोमवार, १३ जानेवारी २०२५ या कालावधीत धर्नुमासोत्सवम्चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने पूर्वभागात गोविंदा, गोविंदाचा जयघोष घुमणार आहे. या उत्सवांतर्गत रंगनाथ स्वामी व गोदांबा यांचा कल्याणोत्सवम् विधी पार पाडण्यात येणार आहे. हा विधी याचि देहि, याचि डोळा पाहण्यासाठी सोलापूरसह परिसरातील भक्त मोठ्या संख्येने येत असतात, अशी माहिती श्री व्यंकटेश्वर देवस्थानम् अध्यक्ष जयेंद्र द्यावनपल्ली यांनी दिली.



धर्नुमासोत्सवम्चे यंदाचे ५४ वे वर्ष आहे. सोमवार, १६ डिसेंबर २०२४ रोजी गोदांबादेवी अभिषेक. बुधवार, १८ डिसेंबर २०२४ रोजी विशेष पाशुरम पूजा. मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ राजी द्वारपालन पूजा. गुरुवार, २ जानेवारी २०२५ रोजी आंडाळमाता कुंकुमार्चना. मंगळवार, ७ जानेवारी २०२५ रोजी सिंहासन अलंकार. बुधवार, ८ जानेवारी २०२५ रोजी महाआरती. शुक्रवार, १० जानेवारी २०२५ रोजी वैकुंठद्वार दर्शन. शनिवार, ११ जानेवारी २०२५ राजी नैवेद्य. रविवार, १२ जानेवारी २०२५ रोजी अंडाळमाता गोदांबा निराद्रम. सोमवार, १३ जानेवारी २०२५ रोजी उत्सवमुर्ती अभिषेक, रंगनाथ स्वामी व गोदांबा यांचा कल्याणोत्सवम् असे या महोत्सवातील मुख्य कार्यक्रम राहणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

# दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेस विजेतेपद

### सेवासदन कला कौमुदी युवती महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

येथील सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाच्या दर्शकपूर्ती महोत्सव अंतर्गत आयोजित आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन सेवासदन कला कौमुदी युवती महोत्सवात दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेने सेवासदन कलाकौमुदी युवती चषक पटकावला. प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही सेवासदन कनिष्ठ महाविद्यालय आयोजित या स्पर्धेत ३० शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदवत अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

महोत्सवाच्या पहिल्या सत्रात स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या सचिव वीणा पतकी यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत सहभागी संघांनी एकाहून एक सरस नृत्य सादर करून परीक्षकांसह उपस्थितांची दाद मिळवली. डॉ. मीरा शेंडगे यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर पुणे



सेवासदन संस्था सोलापूर शाखेच्या अध्यक्षा श्रीमती शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी, कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव प्रधान. पद्माकर कुलकर्णी, प्रा. तृप्ती बापट, ॲड. अर्चना कुलकर्णी, श्रीमती पुष्पा आगरकर, सुलभा पिशवीकर, सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी, पर्यवेक्षक प्रा. पद्मकुमार उपाध्ये, प्रा. मधुरा गोगटे, कार्याध्यक्ष प्रा. सविता मादळे, विद्यार्थिनी प्रतिनिधी सौंदर्या बिराजदार आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी श्रीनिवास काटवे आणि प्रा. वैष्णवी शिरसीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुजाता उपासे यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. प्रा. सुप्रिया केसकर आणि प्रा. गीता मोहोळकर यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. सविता मादळे यांनी आभार प्रदर्शन केले.

**महोत्सवातील प्रथम तीन** समूहनृत्य स्पर्धा : शालेय गट : प्रथम-सु. रा. मुलींची प्रशाला सेवासदन, द्वितीय- संभाजीराव शिंदे प्रशाला, उत्तेजनार्थ - भू. म. पुल्ली प्रशाला.

कनिष्ठ महाविद्यालयीन गट : प्रथम विभागून - डी.एच.बी. सोनी कॉलेज, सेवासदन कनिष्ठ महाविद्यालय, गांधी नाथा रंगजी ज्युनियर कॉलेज.



# अहिल्याबाई प्रशालेची बायोटेक्नॉलॉजी विभागाला क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

अहिल्याबाई प्रशाळेच्या इ.९ वी.व १० वी.च्या विद्यार्थ्यांना अभ्यासांतर्गत वालचंद कॉलेज,बायोटेकनॉलॉजि विभागात क्षेत्रभेट आयोजित केली होती.

या भेटीदरम्यान वालचंद कॉलेजच्या बायोटेकनॉलॉजी विभागातील विभाग प्रमुख सहाय्यक प्राध्यापक यांनी विद्यार्थ्यांना सर्व प्रायोगिक माहिती, वेगवेगळे साहित्याची माहिती व प्रत्यक्ष दाखवली. मूळ पेशी, उती संवर्धन, रक्तपेशी, सूक्ष्मजीव इत्यादी च्या प्रतिकृती, याचं खूप छान अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांसोबत सहशिक्षिका अल्पना जाधव, मंदाकिनी बसाटे हे मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. या क्षेत्रीय भेटीचा उद्देश बायोटेकनॉलॉजि या विषयाचे सखोल ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे हा होता. या उपक्रमाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोट येथे राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये तब्बल १,१४५ प्रकरणे निकाली

**अक्कलकोट, दि. १५ डिसेंबर-**

अक्कलकोट येथील न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण ११४५ प्रकरणे निकाली काढण्यात आली, तसेच विविध विभागाची सुमारे १ कोटी २७ लाख इतक्या रकमेची तडजोड करण्यात आली, अशी माहिती एम.एम. कल्याणकर, अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, अक्कलकोट यांनी दिली. राष्ट्रीय लोकअदालतीसाठी एम.एस. आझमी, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर तसेच यु. पी. देवर्षी सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली दोन पॅनलची स्थापना करण्यात आली होती. सदर पॅनलमध्ये एम.एम. कल्याणकर, दिवाणी न्यायाधीश क.स्तर आणि श्रीमती एन.ए. एल. शेख, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच ड.श्री.एस.जी. वंगे यांनी पॅनल विधीज्ञ म्हणून काम पाहिले. सदर लोकअदालीतमध्ये ८७ प्रलंबित प्रकरणे व १०५८ दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकअदालती मध्ये विस्तार अधिकार पाटील, विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. हल्ले, सरकारी वकील सरवदे, बेसकर, विधीज्ञ संघाचे सचिव ॲड. बाके, ॲड.शहा, ॲड. पायमल्ले, ॲड. मंगरुळे, ॲड. बोराळकर, ॲड. उडचाण, ॲड.हर्डीकर व इतर विधीज्ञ तसेच अक्कलकोट न्यायालयाचे सहा. अधिक्षक किशोर रणदिवे, न्यायालयीन कर्मचारी डोके, कांबळे, अमित खिस्ती, किणगी, मोरे, आळगुंडगी, नदाफ, पठाण, यामजले, जाधव, कुंभार, आहेरकर, शेख उपस्थित होते.



### रिफ्लेक्टर नसणाऱ्या ट्रॅक्टरसह अन्य वाहनांवर कारवाई करण्याची मागणी

**माढा, दि. १५ डिसेंबर-**

सध्या सर्वत्र साखर कारखान्याचा गळीत हंगामाचा सीजन सुरू आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर वाहनांची रस्त्यावरून ऊस वाहतूक करण्यासाठी रेलचेल आहे. तसेच अनेक ट्रॅक्टर ट्रॉलींना रिफ्लेक्टर लावलेले नसल्याने माढा भागात अपघातांचे प्रमाण वाढले असून, रिफ्लेक्टर न लावणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करण्याची मागणी माढा शहर शिवसेना प्रमुख देविदास खरात यांनी निवेदनाद्वारे केली आहे. माढ्याचे सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की सध्या साखर कारखान्यांचा ऊस गळीत हंगाम सुरू आहे. यासाठी माढा भागातून मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टरने उसाची वाहतूक होते. अनेक ट्रॅक्टर व ट्रॉलीना रिफ्लेक्टर लावलेले नाहीत. तसेच अनेक ट्रॅक्टर व ट्रॉली रात्रीच्या वेळी रस्त्यात व रस्त्याच्या कडेला उभ्या असतात. त्यामुळे अपघात होतात. यात काही लोकांना प्राणही गमवावे लागतात. तसेच ट्रॅक्टरमध्ये कर्णकर्कश आवाजात गाणी लावलेली असतात. यामुळे रात्री नागरिकांची झोपमोड होते तर दिवसा विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येतो. त्यामुळे रिफ्लेक्टर नसणाऱ्या व कर्णकर्कश आवाजात गाणी लावणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी देविदास खरात, रवींद्र सरवदे, अनिकेत चवरे, किरण पवार, विकास पवार उपस्थित होते.



### चिखलठाणच्या न्यू इरा पब्लिक स्कूलला कृतीशील शाळा पुरस्कार

**करमाळा, दि. १५ डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील चिखलठाण येथील न्यु इरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला यशवंतराव सभागृह बार्शी येथे महाराष्ट्र राज्य कृती समितीच्यावतीने उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल कृतीशील शाळा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच सुजाता जाधव यांचा कृतीशील शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार महाराष्ट्र कृती समितीचे अध्यक्ष आमदार दत्तात्रय सावंत व इतिहास अभ्यासक प्रसिद्ध व्याख्याते श्रीमंत कोकाटे यांचे हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. ब्रिजेश बारकुंड यांनी स्वीकारला.यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक आनंद कसबे, पुरस्कार प्राप्त सुजाता जाधव व प्रशालेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

### जबरी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस दोन वर्षे सश्रम कारावास

**माढा, दि.१५ डिसेंबर-**

जबरी चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी कुर्डू येथील संदीप रोहिदास धोत्रे याला माढा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी वाय. एस. आखरे यांनी दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. सप्टेंबर २०२४ मध्ये कुर्डू येथील विलास विष्णू भाकरे यांच्या घरासमोर येऊन संदीप धोत्रे याने त्याची कबुतरे फिर्यादीच्या घरावर आल्याचे सांगून घरातील जिन्यावर येत फिर्यादी भाकरे यांच्या पत्नीस चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देत गळ्यातील मंगळसूत्राची मागणी केली. अशा आशयाची फिर्याद कुर्डुवाडी पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. त्यावरुन गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याचा तपास होऊन माढा न्यायालयात धोत्रेविरुद्ध दोषारोपपत्र दाखल झाले. त्याची न्यायालयीन सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान आरोपीविरोधात भक्कम पुरावा आल्याने त्यास दोषी धरण्यात आले. त्यामुळे आरोपी संदीप धोत्रे यास दोन वर्षे सश्रम कारावास व रुपये दोन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास पंधरा दिवस सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली. तो सराईत गुन्हेगार असल्याचे सरकार पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणले. ही बाब न्यायालयाने ग्राह्य धरली आहे. सरकार पक्षकारतर्फे सरकारी वकील म्हणून विशाल सक्री यांनी काम पाहिले.

# पंढरपूर ते घुमाण रथ, सायकल यात्रेची उत्साहात सांगता

## महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील १०० सायकल यात्रींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ डिसेंबर-**

शांती, समता व बंधूता या संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या हेतुने भागवत धर्माचे प्रचारक संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची ७५४ वी जयंती, संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२८ वा संजीवन समाधीदिन सोहळा व शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानकदेव यांच्या ५५५ व्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) अशी सुमारे २,५०० किलोमीटरच्या काढण्यात आलेल्या रथ व सायकल यात्रेची मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात सांगता झाली. या सायकल यात्रेत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सुमारे १०० सायकल यात्रींनी सहभाग नोंदविला होता.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी भागवत धर्माचा पाया रचला तर संत तुकाराम महाराज या धर्माचे कळस झाले . संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांनी उत्तर भारतात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला व भागवत धर्माची पताका फडकावली. पंजाबमधील शीख धर्मीयांमध्ये आपल्या सात्त्विक विचारांचा प्रभाव तेवत ठेवला. मुगल सम्राट फिरोजशा तुघलक यांनी श्री क्षेत्र घुमाण येथे संत नामदेव महाराज यांचे भव्य दिव्य मंदिर उभारले. या पार्श्वभूमीवर अध्यात्मिक क्षेत्रातील विश्वातील पहिल्या रथ व सायकल यात्रेला श्री विठ्ठल भक्तीचा तसेच शांती, समता व बंधूता या संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने भागवत धर्म प्रसारक मंडळ, राज्य पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद व समस्त नामदेव शिंपी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण अशी भव्य रथ व सायकल यात्रा २०२२ पासून सुरु करण्यात आली. यात्रेचे हे तिसरे वर्ष होते.

संत नामदेव महाराज रथ व सायकल यात्रेला महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील सायकलस्वारांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. विविध राज्यांतील भाविकांची मागणी आणि संत नामदेव महाराजांच्या शांती, समता व बंधुता या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी यंदाही भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद, श्री नामदेव दरबार कमिटी घुमाण (पंजाब) व देशभरातील विविध नामदेव शिंपी समाज संस्था-संघटनांच्या वतीने ही यात्रा १२ नोव्हेंबर रोजी श्री क्षेत्र पंढरपूरहून श्री क्षेत्र घुमाण ( पंजाब ) कडे प्रस्थान केले होते .या यात्रेत सुमारे ५० वारकरी व १०० सायकलयात्री सहभागी झाले होते, ही यात्रा महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा मार्गे पंजाब राज्यातील संत नामदेव महाराजांची कर्मभूमी असलेल्या गुरुदासपूर जिल्ह्यातील श्री क्षेत्र घुमाण येथे ४ डिसेंबर रोजी पोहोचली.

संत नामदेव महाराजांच्या रथ व सायकल यात्रेचे महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, हरियाणा, पंजाब राज्यात मोठ्या उत्साही व भक्तीमय वातावरणात स्वागत करणार आले. भाविकांनी पादुकांची पूजा व सायकल यात्रींचा सन्मान करीत यात्रेस शुभेच्छा दिल्या. श्री क्षेत्र घुमाण येथे ५ डिसेंबर रोजी सायकल यात्रेचा समारोप झाला. त्यानंतर ही रथयात्रा पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश राज्यातुन प्रवास करीत दि. १२ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचली.

पाटण जि सातारा येथील माउली प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपकसिंह पाटणकर, यशश्रीदेवी पाटणकर यांच्या हस्ते संत नामदेवांच्या पादुकांची विधीवत पूजा करुन आरती व महाप्रसादानंतर नाम दास परिवाराचा व सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला . महाप्रसादाने यात्रेची सांगता करण्यात आली.

या सोहळ्याचे नियोजन नामदेव समाजोन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवसकर, सचिव डॉ. अजय फुटाणे, उपाध्यक्ष रविंद्र रहाने, विश्वस्थ वसंतराव खुर्द, पंकज सुत्रावे, सीमा नेवासकर, वैष्णवी नेवासकर, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे, उपाध्यक्ष शंकर टेमघरे, सचिव ड विलास काटे, खजिनदार मनोज मांढरे, सदस्य सुभाष भांबुरे, राजेंद्र मारणे, राजेंद्रकृष्ण कापसे, राज्य समन्वयक खेमराज नामा (राजस्थान), मुलचंदजी परमार (गुजरात), सिताराम टांक (राजस्थान), सरबजितसिंह बावा (पंजाब), प्रेमसिंह अग्रोईया (हरियाणा), महेंद्र लड्डा (दिल्ली), किशनसिंह राजपूत (उत्तर प्रदेश), अशिष नामदेव (मध्यप्रदेश) आदींनी केले होते.



**पंढरपूरच्या नामदेव मंदिरात सांगता**

संत नामदेव महाराजांची जन्मभूमी असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर येथे संत नामदेव परिवाराकडून मोठ्या उत्साही व भक्तिमय वातावरणात यात्रेचे स्वागत करण्यात आले. संत नामदेवांचे वंशज ह भ प निवृत्ती महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, एकनाथ महाराज नामदास, माधव महाराज नामदास, ज्ञानेश्वर महाराज नामदास, केशव महाराज नामदास, कृष्णदास महाराज नामदास आदी यावेळी उपस्थित होते.

# पोलिसांनी केले दत्त जयंतीचे नेटके नियोजन

## स्वामी समर्थांच्या भक्तांमधून समाधान; पोलिस प्रशासनाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १५ डिसेंबर-**

श्री गुरुदेव दत्त जयंती उत्सव श्री तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीचा महत्वाचा धार्मिक उत्सव आहे. गाणगापुर यात्रेतील भाविक मोठ्या प्रमाणात परतीच्या प्रवासात अक्कलकोट तीर्थक्षेत्री येतात. यंदाही भाविकांची संख्या खुप मोठी होती. मात्र अक्कलकोट उत्तर पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे यांनी नगरपालिका मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्या सहमतीने भाविकांची दर्शन बारी, वाहने पार्किंग, भाविकांना ध्वनीवर्धकावरून योग्य सूचना, मार्गदर्शन पाठपुरावा करून दत्तजयंती उत्सव यात्रेचे नेटके नियोजन व योग्य हाताळणी केल्याने वाहनांची कोंडी दर्शनबारीचा सुयोग्य व्यवस्थापन याचे चांगले परिणाम दिसून आले.

या नियोजनाबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी केंद्रीय मंत्री भारती पवार यांनी पोलीस निरीक्षक राजेद्र टाकणे यांचे कौतुक करून सत्कार केला. दिवसोदिवस दत्तअवतार श्री स्वामी समर्थ महाराजांचा महिमा वाढत असुन अक्कलकोट तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांची संख्या तीव्र झपाट्याने वाढत आहे. धार्मीक उत्सवाखेरीज गुरुवार, शनिवार, रविवार सलग सुट्टी, पोर्णिमा, रोजच आता भाविकांची मोठी गर्दी होत आहे. शहराचा अद्यापही मास्टर प्लॅन राबविण्यात आला नाही. प्रचंड प्रमाणात रहदारी वाहने वाढली. मात्र रस्ते रुंद मोठी तर झाली नाहीच. शिवाय गर्दीमुळे व्यवसाय करणारे फेरीवाले टोरिक्षा संख्या वाढली. मात्र रिक्षाची थांबे निश्चित झाली नाहीत अशा स्थितीमध्ये आहे त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणातील भाविकांची संख्या सुलभ दर्शन रांग रांगेत छत भाविकानां सुचना फलक ध्वनी वर्धक यंत्रणा द्वारा सुचना यंत्रेणेद्वारा तटपुंजे मनुष्यबळाद्वारा अंमलबजाणी केली.





**चांगल्या नियोजनाची तात्काळ दखल**

माजी आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री भारती पवार आणि आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दत्त जयंती उत्सवानिमित्त भाविकासाठी सुलभ व्यवस्था मिळणेकामी व योग्य बंदोबस्त केल्यानुळे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांचे व सहकाऱ्यांचे कौतुक केले. माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांच्या हस्ते पोनि राजेद्र टाकणे यांचा सत्कार केला.

# कुसमोड येथे कालवडीवर तरसाचा हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १५ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड परिसरात तरसाचा वावर दिसून येत असून महिनाभराच्या आतच कुसमोड गावातील तरसाने जनावरावर हल्ला करण्याची दुसरी घटना एकाच भागात घडली आहे.



काही दिवसापूर्वी कैलास घोंगडे यांच्या देशी गाईवर तरसाने हल्ला केल्याने गाई मरण पावली होती.यानंतर त्याच भागातील सर्जेराव लोखंडे यांच्या जरशी कालवडावर तरसाने हल्ला केला. यामध्ये जरशी कालवड गंभीर जखमी झाले आहे. याबाबत त्यांनी संबंधित त्या गावातील वनाधिकारी यांना घटनेची माहिती दिली पण रविवारच्या सुट्टीचे कारण देत त्यांनी घटनास्थळी भेट देण्याचे टाळले. कुसमोड गावात एकाच भागात तरसाचा वावर असताना सुद्धा प्रशासन या ठिकाणी कोणतीही उपाययोजना करीत नसल्याने सध्या शेतकरी वर्गामध्ये प्रचंड भितीचे वातावरण पसरले आहे.

# हुतात्मा, उद्यान एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा द्या

## महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांच्याकडे रेल्वे प्रवासी संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १५ डिसेंबर-**

हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसला जेऊर येथे थांबा देण्यासाठी रेल्वे प्रशासन अनुकूल असून यासंबंधीचा प्रास्ताव लवकरच रेल्वे बोर्डाच्या बैठकीत सकारात्मक पद्धतीने मांडला जाईल असे आश्वासन मध्य रेल्वेच्या मुंबई क्षेत्रिय मुख्यालयाचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना यांनी जेऊर स्टेशनला भेटीवेळी उपस्थित जेऊर रेल्वे प्रवासी संघटना व परिसरातील ग्रामस्थांना दिले.

मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर हे आपल्या नियमित स्टेशनभेट कार्यक्रमानिमित्त जेऊर येथे शुक्रवार १३डिसेंबर रोजी दुपारी अकरा वाजता आले होते. यावेळी रेल्वे प्रवासी संघटना विविध संस्थांचे पदाधिकाऱ्यांच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी रेल्वे प्रवासी संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. यामध्ये जेऊर रेल्वे स्टेशन वरून प्रवाशांकडून तीन कोटी ३५ लाख रुपयांचे उत्पन्न प्रतिवर्षी रेल्वेला मिळते याशिवाय स्टेशनवरून प्रतिवर्षी पाच ते सहा लाख प्रवासी प्रवास करत आहेत असे असतानाही अनेक दिवसांपासूनच्या हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसच्या थांब्याची मागणी मान्य होत नाही याशिवाय सोलापूरकडे सकाळी जाण्यासाठी व माघारी येण्यासाठी दौंड-कल्बुर्गी-दौंड डेमो गाडी सुरू करण्यात यावी या निवेदनात पुढे म्हटले आहे की

जेऊर हे करमाळा, जामखेड, इंदापूर परांडा, भूम, कर्जत या तालुक्यांना संलग्न व दाट संपर्क असणारे मध्ये रेल्वेवरील स्थानक असून जवळजवळ ५०-६० गावे जोडली गेलेली आहेत, या गावातील हजारो प्रवाशी रेल्वेने सतत येत जात असतात, दवाखाना, कोर्ट कचेरीची कामे, शाळा, कॉलेज, खरेदी, चाकरमानी यांना जावे लागते. यामुळे रेल्वे स्टेशन सतत गजबजलेला असतं त्यांची सोयीसाठी सोयीचं ठरतं. यावेळी महिला प्रवाशांच्या वतीने तसेच परिसरातील गावातील ग्रामपंचायतच्या विविध संस्था संघटना यांच्या वतीने रेल्वे गाड्यांना थांबा व विविध सुविधा मिळवण्यासाठीची निवेदने महाव्यवस्थापकांना देण्यात आली यावेळी जेऊरसह परिसरातील गावचे सरपंच, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सर्व कार्यकर्ते व्यापारी शेतकरी विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.




**शेतमाल वाहतुकीसाठी थांबा हवा**

शेटफळ करमाळा येथील लोकविकास शेतकरी उत्पादक कंपनीच्या वतीने जेऊर रेल्वे स्थानकावर करमाळा तालुक्यातील शेतकरी उपलब्ध उत्पादित केलेल्या केळी, पेरू, डाळिंब यासारखी पिके व भाजप भाजीपाला यांच्या मुख्य शहरातील बाजारपेठेकडील वाहतुकीसाठी या स्टेशनवरून मालवाहतूक सुविधा सुरू करण्याची मागणी निवेदनद्वारे करण्यात आली आहे.

# केम गावामध्ये विजेचा लपंडाव सुरू; महावितरणचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १५ डिसेंबर-**



केम गावामध्ये तीस ते पस्तीस कुंकू कारखाने आहेत. त्या कारखान्यांमध्ये प्रत्येक कारखान्यात दहा ते पंधरा कामगार आहेत. केम मध्ये लाईट कधी येते कधी जाते यामुळे कारखानदाराचे फार नुकसान होत आहे. यामुळे कामगारांचे हाल होत आहे.

लाईट नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नाही. केम गावांमधून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कुंकू पुरवले जाते. विजेच्या लपंडावामुळे कारखानदारांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. तरी महावितरण कंपनीने ताबडतोब लाईट सुरळीत चालू करावी अशी ग्रामस्थांमधून मागणी होत आहे.लोकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.याची महावितरण कंपनीने लवकरात लवकर दखल घ्यावी.

# वातावरण शुद्धी अन् मन:शांतीसाठी अग्निहोत्राची आवश्यकता

## आ. सुभाष देशमुख : भाविकांच्या उपस्थितीत सामूहिक अग्निहोत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

वातावरण शुद्धी अन् मन:शांतीसाठी अग्निहोत्राची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले. श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ गुरुमंदिर (बाळाप्पा मठ), विश्व फौंडेशन शिवपुरी अक्कलकोट आणि श्री दत्त मंदिर आनंद नगर भंडारकवठे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री दत्त जयंतीनिमित्त भंडारकवठे येथील आनंद नगरमध्ये सामूहिक अग्निहोत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. सुभाष देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर आ. सुभाष देशमुख, भाजप नेते मोहन डांगरे, सोमलिंग महाराज सिद्धमठ बोराळे, डॉ. चनगोंडा हवीनाळे, योगेश डांगरे, लोकमंगल साखर कारखान्याचे संचालक पराग पाटील, मंदिराचे विश्वस्त विजय बिज्जरगी उपस्थित होते. आ. देशमुख म्हणाले, देश- विदेशातील अनेक कुटुंबे नित्य सूर्योदय व सूर्यास्तावेळी नियमितपणे अग्निहोत्र करतात. ७० हुन अधिक देशात अग्निहोत्राचा प्रचार आणि प्रसार करण्याचे कार्य हे विश्व फौंडेशनच्यावतीने केले जाते. आजच्या धकाधकीच्या जीवनात तसेच प्रदूषणयुक्त वातावरणात वातावरण शुद्धीसाठी, मन:शांतीसाठी अग्निहोत्र हि काळजी गरज आहे. सर्वांनी अक्कलकोटमधील निसर्गरम्य अशा यज्ञनगरी शिवपुरीस एकदा भेट देण्याचे आवाहनही आ. सुभाष देशमुख यांनी यावेळी केले. याप्रसंगी ३०० हून अधिक साधकांनी सामुदायिक अग्निहोत्रामध्ये सहभाग नोंदवला. उपस्थित नागरिकांनी एकाचवेळी अग्नीमध्ये गाईच्या तुप लावलेल्या तांदळाची आहुती दिल्याने निर्माण झालेल्या शुद्ध, पवित्र, आनंदी वातावरणाचा अनुभव यावेळी अनुभव उपस्थितांनी घेतला. यावेळी श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ गुरुमंदिर (बाळाप्पा मठ) या गुरुपीठावरील पादुकांचे पूजनदेखील अनेक घरांत झाले.



**अग्निहोत्राचे फायदे**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ गुरुमंदिर (बाळाप्पा मठ), यज्ञनगरी शिवपुरीची माहिती आणि अग्निहोत्राचे फायदे या विषयावर विश्व फौंडेशन शिवपुरी अक्कलकोटचे प्रतिनिधी योगेश डांगरे यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवन कुलकर्णी, शुभम चिट्याल, उमेश चिट्याल, विवेक नक्का, अविनाश शंकू, शिवपुरी अक्क्कलकोट आणि श्री दत्त मंदिर आनंद नगर भंडारकवठे येथील सर्व आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संतोष देशमुख हत्येचा जलद तपास करा, अन्यथा आंदोलन करणार

### सकल मराठा समाजाची निवेदनाद्वारे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. १५ डिसेंबर-**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांच्या खुनाचा जलदगतीने तपास करून आरोपींना कठोर शासन करावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला. माढा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक नेताजी बंडगर यांना निवेदन देण्यात आले. ९ डिसेंबर रोजी मस्साजोग येथील संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृणपणे हत्या करण्यात आली होती. घडलेली घटना अतिशय संताप जनक असून या घटनेमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे घडलेल्या घटनेचा सखोल तपास करून आरोपींना अटक करून त्यांना कठोर शासन करण्यात यावे अन्यथा सकल मराठा समाजाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### शेगाव येथील बालआनंदी बाजाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी व कन्नड शाळा, शेगाव (ता. अक्कलकोट) येथे शनिवारी १४ डिसेंबर रोजी बाल आनंदी बाजार भरवण्यात आला होता. याचे उद्घाटन माजी सरपंच आण्णाराव पाटील यांनी फीत कापून केले. यावेळी सुरेश गड्डी, श्रीमंत कोरे, सरपंच मल्लिकार्जुन पाटील, उपसरपंच शरणप्पा बिराजदार, संगप्पा कोळी आदी मान्यवर उपस्थित होते. या बाजारात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्टॉल मांडले होते. यामध्ये प्रामुख्याने भाजीपाला, फळभाज्या व विविध प्रकारचे खाद्यपदार्थ होते. मेथी, कोथिंबीर, पालक, चुका, अंबाडी, कडीपत्ता, पुदीना आदी भाजीपाल्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. वांगे, बटाटे, टोमॅटो, कोबी, गाजर, फ्लॉवर, कारले, पडवळ आदी फळभाज्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. तसेच, बोरे, पेरू इत्यादी फळांचेही स्टॉल होते. या आनंदी बाजारास केंद्रप्रमुख अमसिद्ध म्हेत्रे, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विरभद्र यादवाड आदींनी भेट देऊन खरेदी केली व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इस्माईल बागवान, सच्चिदानंद अगरखेड, यादगिरीकर, वस्त्रद, हणमंत बगले , स्वामी, अश्विनी विजापुरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश विजापुरे, अमसिद्ध गड्डी यांनी विशेष परिश्रम घेतले.




### आपटे उपलप प्रशालेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचे स्पर्धेत सुयश

**पंढरपूर, दि. १५ डिसेंबर-**

वि. वि. मंडळ पंढरपूर संचलित आपटे उपलप प्रशाला पंढरपूरच्या दिव्यांग- अंध विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभाग, जिल्हा सोलापूर यांच्या वतीने १२ व १३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव प्रशस्तीपत्र व पदक प्रदान करून करण्यात आला. स्पर्धेत यशस्वी ठरलेले विद्यार्थी : पवन संजय प्रक्षाळे (इयत्ता ९वी) लांब उडी, रामनाथ सोलंकर (इयत्ता ९वी) ५० मीटर धावणे, वैष्णवी सोनटक्के लांब उडी व ५० मीटर धावणे. या सत्कार समारंभाला शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रेय धारूरकर, पर्यवेक्षक अनिल अभंगराव, क्रीडा विभागाचे श्री. गुलाखे , एन. पी. डांगे सर, श्री. कुसुमडे, खरात, करकमकर, सर्वगोड व कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन थिटे यांनी केले, तर आभार खरात यांनी मानले. बक्षीस वितरणात धारूरकर, अभंगराव, गुलाखे, एन. पी. डांगे, सितापराव यांचा सहभाग होता. मुलींच्या गटातील पारितोषिक वितरण सर्वगोड व कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेचे सचिव बी. जे. डांगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



### स्केटिंग स्पर्धेत विश्वजीत क्लबच्या ११ खेळाडूंचे घवघवीत यश

**बार्शी, दि. १५ डिसेंबर-**

छत्रपती संभाजीनगर क्रीडा कार्यालय व ऑल इंडिया रोलर रिले स्केटिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत बार्शीच्या विश्वजीत रोलर स्केटिंग क्लबच्या ११ खेळाडूंनी उत्कृष्ट यश संपादन करुन गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. यश संपादन केलेले खेळाडू पुढीलप्रमाणे- मितांश शिंगवी व स्नेहजीत पाटील -दोघांना गोल्ड मेडल. श्रेयस कसपटे व हार्दिक रुनवाल- सिल्व्हर मेडल. आयूश मन्ने-ब्रांझ मेडल. पृथ्वीराज जाधव, अर्णव फल्ले, आदित्य बागूल, पवन सरकाळे, समाधान मुंढे व संजित पाटील. वरील विजयी खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष भगवान जाधव, उपाध्यक्ष-प्रशिक्षक गणेश रोडे, सचिव सविता जाधव, स्नेहल रोडे, संचिती जाधव, आदित्य माळी, यश नान्नजकर, सोहम देशमुख व सर्व पालकांचे मार्गदर्शन लाभले आहे व सर्व विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# बार्शीत ४,५५५ प्रकरणे तडजोडीने निकाली

## राष्ट्रीय महालोकअदालतीला यात्रेचे स्वरुप; ७ कोटी ६९ लाख २८ हजार २ रुपयांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर श्री. मो. मलमात आझमी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर सचिव यु. पी. देवर्षी यांचे सहकार्याने, बार्शी तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, बार्शी तथा जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे यांच्या अध्यक्षतेखाली बार्शी न्यायालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय महालोकअदालतीत ३०१ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पूर्व ४,२५४ असे एकूण ४,५५५ इतकी प्रकरणे राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये तडजोडीने मिटवून त्यात सुमारे अनुक्रमे ३ कोटी ९४ लाख २३ हजार ७०९ व दाखल पुर्व प्रकरणात ३ कोटी ७५ लाख ४ हजार २९३ रुपयांची वसुली झाली.

या राष्ट्रीय महालोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ४१६९ व दाखलपूर्व ७७८६ असे एकूण ११९५५



प्रकरणे लोक अदालत पॅनल मध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीसाठी बार्शी न्यायालयातील एकूण सात पॅनल करण्यात आले. त्यात जिल्हा न्यायाधीश-१ श्री. विक्रमादित्य के. मांडे साहेब, जिल्हा न्यायाधीश-२ श्री.एल.एस. चव्हाण साो, दिवाणी न्यायाधीश व स्तर श्री.ए. पी. खानोरकर, सह दिवाणी न्यायाधीश व स्तर श्रीमती. आर. एम. कंटे मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बार्शी श्री. एस. बी. विजयकर साो, २रे दिवाणी न्यायाधीश क स्तर, बार्शी श्रीमती. पी. व्ही. राऊत मॅडम, ४थे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, बार्शी श्रीमती. एच. यु. यु. पाटील मॅडम असे एकुण सात पॅनल करण्यात आले. विशेष बाब म्हणजे दिवाणी न्यायाधीश व स्तर श्री. ए. पी. खानोरकर, साहेब यांचे पॅनेलमध्ये एकुण ३ दिवाणी प्रकरणांत अभासी यंत्रणेद्वारे तडजोडीने निकाली काढण्यात आली. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर बार्शी श्री. एस. बी. विजयकर साो, यांनी नियमित दिवाणी प्रकरणांतील पक्षकार श्रीमती शिवगंगा सुरेश चेट्टी या वयोवृध्द महिलेसाठी तडजोड पडताळणीसाठी न्यायालय स्वतः न्यायालयाबाहेर पक्षकारांची प्रत्यक्ष पडताळणी केली. जिल्हा न्यायालयाकडील मोटार अपघात प्रकरणांतील एकूण ४ प्रकरणे तडजोडीने मिटुन त्यात सुमारे २० लाख इतक्या रक्कमेची नुकसानभरपाई मंजुर करण्यात आली. एन.आय. क्ट १३८ च्या १५ प्रलंवित प्रकरणांत तडजोड होवून त्यात सुमारे ६३ लाख ५१ हजार १९९ रुपयांची वसुली, तर रक्कम वसुलीच्या ५५ प्रकरणात तडजोड होवून त्यात ३ कोटी ८ लाख ७१ हजार ५७८ रुपयांची वसुली झाली. न्यायालयातील प्रलंबित तडजोड पात्र फौजदारी प्रकरणातील ३ इतकी प्रकरणे व कबुलीची १४८ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे १ लाख १० हजार ३०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

### यांनी केले सहकार्य

सदर लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. राष्ट्रीय महालोकअदालतमध्ये यशस्वी करणे कामी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष काकासाहेब गुंड, पॅनल विधीज्ञ, सर्व न्यायालयातील कर्मचारी, पोलीस स्टेशनकडील पोलीस कर्मचारी, बँका तसेच फायनान्स, नगरपरिषद बार्शी, पंचायत समिती वार्शी, विज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे सहकार्य लाभले.

## झरेगाव येथे दत्त जयंती उत्सव भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ डिसेंबर-**

झरेगाव येथे दत्त जयंतीनिमित्त श्री सद्‌गुरु मठ दत्तमंदिर यांच्या वतीने गुरुवर्य काका महाराज झरेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविकांनी दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.

झरेगाव (ता. बार्शी) येथे श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त श्री सद्गुरू दत्त मठ मंदिरात शनिवारी भाविकांनी दर्शनासाठी केलेली गर्दी केली होती. पहाटे पंढरपूरचे विष्णू महाराज कबीर व गुरुवर्य काका महाराज यांच्या उपस्थितीत काकडा आरती झाली. दुपारी बारा वाजता सद्गुरू दत्त महाराजांची आरती घेण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप सायंकाळ पर्यंत सुरू होते झरेगाव येथिल सदगुरु दत्त मंदीर हे बार्शी तालुक्याच्या सरहद्दीवर असल्याने येथे लातूर, धाराशीव, बीड, सोलापूर येथून भावीक येतात. दत्त जन्मोत्सव सोहळ्यासाठी सुमारे दहा ते पंधरा हजार भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. या सोहळ्याला धाराशीव लोकसभेचे खासदार ओमराजे निंबाळकर ,आमदार



कैलास पाटील ,बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत, आमदार दिलीप सोपल या राजकिय मान्यवरासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देत उपस्थिती दर्शविली.

## सहकार महर्षी गणपतराव साठे जि. प. प्रशालेच्या यशात मानाचा तुरा

### शौर्य अजितसिंह रोंगेची इस्त्रो अभ्यासासाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १५ डिसेंबर-**

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेतील इयत्ता सहावीतील विद्यार्थी चिरंजीव शौर्य अजितसिंह रोंगे यांनी नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षा मध्ये उत्तुंग यश मिळवले असून या यशामुळे त्याला लवकरच इस्त्रोच्या सहलीस जाण्याची संधी प्राप्त झाली आहे. या यशाने माढा येथील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या यशामध्ये आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. इतक्या लहान वयात इस्त्रो (भारतीय अंतरिक्ष संशोधन संघटन) सारख्या जागतिक स्तरावरील वैज्ञानिक संशोधन क्षेत्रातील नामांकित कंपनीच्या अभ्यास दौऱ्यासाठी संधी मिळणारा माढा तालुक्यातीलच नव्हे तर बहुधा सोलापूर जिल्ह्यातील तो एकमेव विद्यार्थी ठरला आहे. इयत्ता पाचवी ते सातवी या गटातून त्याचीही निवड करण्यात आलेली आहे. अतिशय काठिण्य पातळी असणार्या या परीक्षेद्वारे साधारण अडीच हजार विद्यार्थ्यां मधून निवड करण्यात आलेल्या ६० विद्यार्थ्यां मध्ये त्याची ही निवड झाली आहे. ऑनलाईन व लेखी परीक्षा आणि यानंतर मुलाखतीतून त्याने हे यश मिळवले आहे. शौर्य यास त्याच्या आई वडिलांसह प्रशालेतील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.



या यशाबद्दल शिक्षणाधिकारी कादर शेख, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव माढा नगरीच्या नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा माधुरी साठे, सदस्य भैय्या खरात, किरण पवार, प्रविण पवार आदींसह सर्व सदस्य, शिक्षक व पालक वर्गातून अभिनंदन करण्यात आले आहे.

## परभणीच्या माथेफिरुला अटक करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १५ डिसेंबर-**

परभणी येथे संविधानाची विटंबना करणाऱ्या माथेफिरुला तात्काळ अटक करून देशद्रोहाचा खटला दाखल करावा अशी मागणी आंबेडकरवादी व सर्व संघटनांच्या वतीने वैराग पोलीस स्टेशनला निवेदन देऊन करण्यात आली.

नराधम आरोपी सोपान पवार याने सदर संविधान प्रतिकृतीची तोडफोड करून लोकशाहीला कलंकु लावला आहे अशा देशविघातक देशद्रोही प्रवृत्तीना पायबंद घालून त्याच्यावर देशद्रोही खटला दाखल करावा . या प्रकरणात एस.आय. टी. नेमून राज्यशासनाने सखोल चौकशी करावी परत अशा प्रकरच्या देशविघातक घटना घडणार नाहीत शासनाने कडक



पावले उचलावी अन्यथा तीव्र प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. वैरागचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वजीत जगदाळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित पोलीस उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव तसेच आरपीय तालुकाध्यक्ष दत्तात्रय क्षीरसागर, नगरसेवक वैजिनाथ आदमाने, नगरसेवक श्रीशैल्य भालशंकर, प्रशांत भालशंकर, तसेच वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष विजय वाघमारे, प्रफुल्ल भालशंकर, समाधान भालशंकर, विकास कांबळे शिवम थोरात, मल्हारी ठोंबरे, दादा बंड, सत्यवान ताटे, अतुल मलमे व अन्य आंबेडकरवादी अनुयायी, सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

## काँग्रेस ओबीसी सेलच्या रोहित बनकर यांचा राजीनामा फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १५ डिसेंबर-**

नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या त्यात काँग्रेस् पक्षाचा दारून पराभव झाला आहे. सदर निवडणुकीत पक्षातील अंतर्गत गटबाजी मुळे पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. या गोष्टीला कंटाळून बारामती येथील ओबीसी नेते रोहित बनकर यांनी काँग्रेस पार्टी च्या ओबीसी सेल चा प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता.

राजीनाम्याची वरिष्ठ पधाधिकाऱ्यांनी दखल घेतली. प्रांताध्यक्ष नाना पटोले व ओबीसी प्रांताध्यक्ष भानदास माळी यांच्या सचनेने रोहित बनकर यांचा राजीनामा नामंजूर



केला असल्याची माहिती प्रदेश सरचिटणीस धनराज राठोड प्रदेश प्रसिद्धीप्रमुख शैलेश राऊत यांनी दिली. तसेच पक्ष वाढीसाठी पूर्ववत आपले काम करत राहणेबाबत रोहित बनकर यांकडे अपेक्षा व्यक्त केली.



## श्रद्धा आपटेला राज्यात प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. १५ डिसेंबर-**

येथील पत्रकार राहुल आपटे यांची कन्या श्रद्धा आपटे हिला भगवद्‌गीता अभियान २०२४ च्या राज्यस्तरीय समारोप कार्यक्रमात भगवद्‌गीता संस्कृत भाषण स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

विजयपूर येथील सोंडा स्वर्णवल्ली महासंस्थानचे गंगाधरेंद्र, ज्ञानयोगाश्रमाचे बसवलिंग स्वामीजी, सिंदगी सारंग मठाचे श्री यांच्यासह स्वामीजी आणि भगवदगीता अभियानाचे पदाधिकारी उपस्थित होते. सोंडा स्वर्णवल्ली महासंस्थान शिरसी, भगवदगीता अभियानातर्फे आयोजित स्पर्धेत श्रद्धा आपटे हिने संस्कृतमध्ये भगवदगीतावर भाषण करून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

## महावितरणतर्फे १८ डिसेंबर रोजी ग्राहक तक्रार निवारण दिन

### ग्राहक पंचायतीने दिली माहिती

### ग्राहकांच्या अडचणी सुटणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ डिसेंबर-**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये १८ डिसेंबर रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्याची तरतूद* आहे. त्याप्रमाणे डिसेंबर मधील ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन १८ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा.पर्यंत करण्यात आले आहे. तरी वरीलप्रमाणे कार्यकारी अभियंता, महावितरण यांचे कार्यालयात उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून, त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता,उप कार्यकारी अभियंता, सहा. अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी, अडचणी, सोडविणार आहेत. तरी पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर या ठिकाणी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील, सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मिळणे, मीटर रीडिंग वेळेत न घेणे, कनेक्शन वेळेत न मिळणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना स्वखर्चाने आणलेल्या मीटरची संपूर्ण रक्कम न मिळणे, शेतकरी ग्राहकांना वेळेत डी. पी. बदलून न मिळणे अशा कोणत्याही स्वरुपातील




लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी पंढरपूर तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भारत स्काऊट आणि गाईड राज्य पुरस्कार चाचणी शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**खसगी, दि.१५ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड राज्य पुरस्कार चाचणी शिबिर दि.१४ ते १७ डिसेंबर या कालावधीमध्ये राज्य प्रशिक्षण केंद्र लातूर येथे आयोजित करण्यात आले आहे.

या चार दिवशी निवासी शिबिरामध्ये लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक, स्वरूपाची चाचणी घेण्यात येणार असून सदर चाचणीसाठी धाराशिव लातूर नांदेड जिल्ह्यातील संख्या सहभागी आहेत. १५१ गाईड (मुलींचे) राज्य कार्यालयास नोंदणी केलेले परीक्षार्थी चाचणी देत आहेत. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमते बरोबर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्र अभिमान, स्वयंशासन, निढरता, मानव जातीवरती प्रेम, मूल्यांची शिकवण स्काऊट अभ्यासक्रमात दिले जाते.

राज्य पुरस्कार चाचणीचे संयोजक तथा लातूर जिल्हा संघटना आयुक्त डॉ. शंकर चामे यांच्याकडून परीक्षेचे उत्तम नियोजन आणि निवासाची व्यवस्था करण्यात आली असून सर्व परीक्षार्थी आनंद व्यक्त करत आहेत. या परीक्षेच्या नियोजनामध्ये सहाय्यक परीक्षा प्रमुख म्हणून शिवकाशी तांडे जिल्हा संघटक तथा सहाय्यक शिबिर प्रमुख म्हणून काम पाहत आहेत.

त्याचबरोबर ज्योती आमले, भागीरथी बच्चेवार, ज्योती शिंदे, मंजुळा जाधव, शुभांगी स्वामी, चाचणीचे मधल्या वेगवेगळ्या भागाचे मूल्यमापन या सर्वांच्या हातून होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### दहिफळाच्या गिरिजाचे विभाग स्तरावरील सायकलिंग स्पर्धेत यश

**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

नुकत्याच अहिल्यादेवी होळकर विद्यालय अहमदपुर (जि. लातुर) येथे पार पडलेल्या विभागीय सायकलींग स्पर्धेमधे जिल्हा परिषद प्रशाला दहिफळ, (ता.कळंब), येथील गिरीजा अभयकुमार परीतकर हिने १७ वर्ष वयोगटामधे प्रथम क्रमांक मिळवुन शाळेचा तसेच धाराशिव जिल्ह्याचाही नावलौकिक विभागात वाढवला आहे. ही विद्यार्थिनी दि.२२ ते २४ डिसेंबर दरम्यान तालुका क्रीडा संकुल, देवरी, (जि. गोंदिया) या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत खेळण्यासाठी तयारी करीत आहे. यासाठी तिला क्रीडाशिक्षक किशोर नवले व रुपेश भराडे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल येरमाळा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी संतोष माळी, गौर केंद्राचे केंद्रप्रमुख रवींद्र शिनगारे, शाळेचे मुख्याध्यापक शंकर सावंत, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रशांत कदम व उपाध्यक्ष स्वाती भातलवंडे, सहशिक्षक विलास मुंडे, दत्तात्रय मुंडे, प्रशांत गवळी, गोपीनाथ पाखरे, महेश पारखे, राजेश सोनवळकर, महेंद्र माने, ओंकार घोडके, अनिल भडके, मनिषा माने, आफ्रीन अत्तार यांनी अभिनंदन केले.



### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थीकडून मा.आ. ज्ञानराज चौगुले यांना निवेदन

**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**

तालुक्यातील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना सहाय्यक प्रशिक्षणार्थी यांनी एकत्र येत संघटनेतर्फे रविवार (दि.१५) निवेदन देत कार्यकाळ वाढवून द्यावा या मागणीचे निवेदन उमरगा तालुक्याचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले याना देण्यात आले. निवेदनात म्हणले आहे की, आम्ही प्रशिक्षणार्थी म्हणून काम करत आहोत. आणि आम्ही प्रशिक्षण जिद्दीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत.परंतु आम्ही सहा महिन्यानंतर करणार काय? आम्हाला कायम स्वरुपी रोजगार मिळावा यासाठी कार्यकाळ वाढविण्यात यावा. आम्ही ग्रामीण किंवा शहरी भागात काम करत असताना आम्ही त्या अस्थपणामधील संपूर्ण अनुभव घेत आहोत. सर्व अस्थपनामधील युवकांचे मानधन वाढवावे, महिन्याचा एक तारखेला मानधन मिळावे यासाठी शासनाने आणि प्रशासनाने दखल घेण्याची विनंती निवेदनात केली आहे. यावेळी चौगुले यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून न्याय देण्याचा प्रयत्न करेन, असे आश्वासन यावेळी प्रशिक्षणार्थी यांना दिले. यावेळी उमरगा तालुक्यातील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### दिनेश क्षीरसागर यांच्याकडून सारा गौरव कॉलनीला बाकडे भेट

**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

येथील सारा गौरव कॉलनीतील नागरिकांच्या मागणीनुसार विद्यार्थी व जेष्ठ नागरिक यांच्या बसण्याच्या व्यवस्थेसाठी बैठक व्यवस्थेची मागणी केली होती. त्या मागणीची पूर्तता माझा आनंद प्रतिष्ठान व विनोद गंगणे विचार मंच यांच्या वतीने पूर्तता करून दिनेश क्षीरसागर यांच्याकडून कॉलनीत बाकडे बसवण्यात आले. माजी नगरसेवक पंडितराव जगदाळे यांच्या हस्ते पूजन करून व श्रीफळ फोडून लोकार्पण केले. यावेळी कार्यक्रमास दिनेश क्षीरसागर, धैर्यशील दरेकर, कलशेट्टी, बापू जगताप, गवनदारे मेजर, अतुल दिंडोरे, मंगेश कुलकर्णी, पिंटू पाटील, गणेश पाटील, गोविंद खुरुद, नाना जोशी, शिवराज ठोंबरे, अतुल सोमवंशी, यांच्यासह सहारा गौरव कॉलनीतील रहिवाशी नागरिक उपस्थित होते.


### हुंड्यासाठी सुनेला मारहाण; सासरच्यांवर गुन्हा दाखल

**येरमाळा, दि.१५ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील वडजी येथे हुंड्यासाठी सुनेला मारहाण केल्याप्रकरणी सासरच्यांविरूद्ध येरमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, सिताबाई पोपट हांगे (वय ४७, रा. रामेश्वरवाडी, ता. केज) यांची मुलगी पल्लवी हिला विवाह वडजी येथील विशाल निवृत्ती जाधवर याच्याशी झाला होता. १३ डिसेंबर रोजी पल्लवीला सासरी सोडविण्यास वडजी येथे गेले असता सासरच्या मंडळींनी त्यांना शिविगाळ करून मारहाण केली. तसेच विशाल जाधवर, बाळुबाई जाधवर, निवृत्ती जाधवर, प्रतिक मोराळे, राजेंद्र मोराळे, अजय मोराळे, समाधान वाघमारे, भागाबाई मोराळे यांनी लाथाबुक्यांनी, लोखंडी सळई, वीट आणि पाईपाने मारहाण करून सिताबाई यांना जखमी केले. याप्रकरणी येरमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# मेसाई जवळग्यात पवनचक्की ठेकेदाराची 'फिल्मी स्टाईल'ने दहशत

## शेतकऱ्यांना धमकवण्यासाठी पंधरा ते वीस स्कॉर्पिओमध्ये ४० ते ५० बॉन्सर आणि गुंड घेऊन गावात दाखल...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

तालुक्यात रिन्यू कंपनीचे पवनचक्की उभारण्याचे काम चालू आहे. सध्या हे काम मेसाई जवळगा या गावात चालू आहे. पवनचक्की उभारण्यासाठी येथील काही शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीत दिल्या आहेत. पण काही शेतकऱ्यांनी त्याला विरोध केला आहे. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता जमिनी ताब्यात घेण्याचे काम ही कंपनी करत असल्याचा आरोप गावकऱ्यांचा आहे. तर जमिनी न देणाऱ्या शेतकऱ्यांना धमकावण्यासाठी पवनचक्की ठेकेदाराची दादागिरी चालू आहे. शेतकऱ्यांना धमकवण्यासाठी १५ ते २० काळ्या रंगाच्या स्कार्पियोमध्ये ४० ते ५० बॉन्सर आणि गुंड घेऊन ठेकेदार चित्रपटात शोभेल या पद्धतीने गावात दाखल झाला.

फिल्मी स्टाईलने दहशत माजवत असताना शेतकऱ्यांनी विरोध केला असता शेतकऱ्यांच्या वावरात पिकाची नासाडी करत वाहने शेतात नेण्यात आली. गावातील नागरिक, महिला आणि लहान मुले रस्त्यावर उतरले होते. गावातील नागरिकांनी भाजपचे नेते तथा प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांना फोन केला असता रोचकरी हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. तेव्हा त्यांनी ठेकेदाराला जाब विचारून पोलिसांना फोन केला असता पोलिसांकडून शुन्य प्रतिसाद मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. तर पवनचक्की ठेकेदाराचे पोलिसांना हप्ते असून ते जाणीवपूर्वक या प्रकरणाकडे दुर्लक्ष करत असल्याचे त्यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. तर आ. राणाजगजितसिंह पाटील यांना फोनवरून सदरील घटनेबाबत कळविले असून यापूर्वी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले होते. त्यावर देखील कुठलीही कारवाई झाली नसल्याचे रोचकरी यांनी सांगितले. रोचकरी यांच्या समवेत मेसाई जवळगा ग्रामस्थांनी एकत्र येऊन पवनचक्की ठेकेदाराचा हा डाव हाणून पाडला आणि पवन चक्की ठेकेदाराला गावातून गुंड आणि बाऊन्सर घेऊन वापस जावे लागले.

### पोलिसांना फोन करूनही शुन्य प्रतिसाद; पोलिसांच्या भूमिका संशयास्पद...



### पवनचक्की कंपन्यावर कारवाई होणार का? शेतकऱ्यांना न्याय मिळणार का?

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावात पवनचक्की वादात सरपंच संतोष देशमुख यांचा खून झालेली घटना ताजी असतानाच तुळजापूर तालुक्यातील जवळगा मेसाई गावात पवनचक्की ठेकेदाराची दहशत माजवत शेतकऱ्यांना धमकावण्याचा प्रकार होत आहे. पंधरा ते सोळा स्कार्पिओ गाड्यांमध्ये बोन्सर आणि गुंड घेऊन एखाद्या चित्रपटाला शोभेल असे गावात दाखल झाले. गावातील शेतकरी महिला आणि लहान मुलं सर्व रोडवर उतरले. जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर करारापेक्षा जास्त क्षेत्र शेतकऱ्यांना धमकावून पवनचक्की कंपन्या वापरत आहेत. शेतकऱ्यांनी याबाबत कंपनीला विचारले असता शेतकऱ्यांना धमकावले जात असल्याचे देखील पवनचक्की कंपनीला जमिनी दिलेले शेतकरी सांगत आहेत. सदरील घटनेनंतर प्रशासन रिन्यू कंपनीवर काय कारवाई करणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून शेतकऱ्यांना न्याय मिळणार का असा प्रश्न तालुक्यातील नागरिकांना लागला आहे.

## शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी संदीप इंगळे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती धाराशिवतर्फे सालाबादाप्रमाणे याही वर्षी २०२४-२५ चे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते संदीप गौतमराव इंगळे यांची निवड करण्यात आली. यावेळी समितीचे मार्गदर्शक प्रकाश जगताप, विश्वास शिंदे, भारत कोकाटे, जयंत पाटील, भारत इंगळे, बाळासाहेब शिंदे, सुनील काकडे, खलील, खलिफा कुरेशी, मैनुद्दीन पठाण, अभय इंगळे, चंद्रजित जाधव, संतोष पवार, मिनील काकडे, अभिजित काकडे, कुणाल निंबाळकर, पिराजी मंजुळे, सिद्धार्थ बनसोडे, विजय मुद्दे, समितीचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख, धनंजय राऊत, इंद्रजीत देवकते, अभिषेक बागल, रोहित पडवळ, बलराज रणदिवे, राम मुंडे, योगेश सोन्ने-पाटील, दाजी पवार तसेच मोठ्या संख्येने सर्व शिवप्रेमी उपस्थित होते. यावेळी समितीच्या प्रमुख मार्गदर्शकांनी हा शिवजन्मोत्सव सर्व जाती धर्मांना, विविध सामाजिक संघटना, विविध राजकीय पक्ष यांना सोबत घेऊन कोणताही अभिनिवेश न बाळगता शांततेच्या मार्गाने शिवरायांच्या विचाराने उत्साहात साजरा करावा असे आवाहन केले.

सदर बैठकीतचे प्रास्ताविक अमरसिंह देशमुख यांनी केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र कोकाटे व आभार राम मुंडे यांनी मानले.

## अश्विनी होळे यांच्या 'वारसदार' पुस्तकाचे प्रा. विशाल गरड यांच्या हस्ते प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील खामकरवाडी येथे लेखिका अश्विनी होळे यांच्या 'वारसदार' या पुस्तकाचे प्रकाशन लेखक,सामाजिक घडामोडीचे अभ्यासक, व्याख्याते प्रा. विशाल गरड यांच्या हस्ते करण्यात आले.

शनिवार (ता.१४) खामकरवाडी दत्त मंदिरात प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.अशोक मोहेकर, व्याख्याते प्रा. विशाल गरड यांच्या हस्ते अश्विनी होळे, कवडे लिखित 'वारसदार' पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी उपजिल्हाधिकारी अहिल्या होळे, बिभीषण खामकर, बाबुराव घुले, सरपंच रामराजे जाधव प्रा. अंगदराव होळे, दत्तात्रय कवडे, वैभव कवडे, लेखिका अश्विनी होळे, कवडे शिक्षिका मैनाबाई बारकुल, डॉ. विवेक होळे यांची प्रमुख म्हणुन उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा. विशाल गरड म्हणाले की, 'वारसदार' पुस्तकाच्या लेखानातून लेखिका अश्विनी होळे हिने आध्यात्माचा वारसा जपला असुन त्यांच्या आजी कै. कृष्णामाई होळे यांच्या अध्यात्मिक श्रद्धा, जीवनावर आधारित असुन त्यांनी केलेली श्रीदत्त महाराजांची, गानगापूर येथे मंदिरात राहून केलेली नऊ वर्ष सेवा त्यासेवेच्या श्रद्धेवर त्यानी सुख समाधानाने चालविलेले एकत्रित कुटुंब, तसेच अध्यात्मावर लिहिणे सोपी गोष्ट नसुन सध्याच्या मोबाईलच्या युगात अध्यात्मवार प्रतिभाशाली लेखन केल्याचे कौतुक करत, खामकरवाडी गावाची ओळख नागवेडा (नागीण) भयानक त्वचा विकाराच्या अजारावर मंत्र टाकण्यासाठी राज्याच्या काना कोपऱ्यातून लोकं येत असल्याचे सांगितले. लेखिका अश्विनी होळे यांनी आजी कृष्णमाईचा जीवनप्रवासाची वारसदार ठरली असुन आपल्या घरातील इरकलतील आज्या, धोत्रातील गर्भसंस्कारासह जीवनाची संस्कार करणारी विद्यापीठ असुन ही विद्यापीठ जपली पाहिजेत जोपासली पाहिजेत असेही ते म्हणाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी येरमाळा पत्रकार संघ, प्राचार्य सुनील लुगडे, बन्सी होळे, आंनद होळे, दत्तात्रय होळे, सागर होळे, विशाल, प्रवीण होळे, जनार्धन लुगडे यांनी परिश्रम.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतुल होळे यांनी केले तर आभार येरमाळा पत्रकार संघाचे सचिव दत्ता बारकुल यांनी मानले.

## विनाअनुदानित कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान लवकरच मिळेल : मोरे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

विना अनुदानित कर्मचाऱ्यांचा टप्पा वाढ हा जिव्हाळ्याचा व रोजीरोटीचा प्रश्न होता. हा २० टप्पा वाढ आदेश देण्याचा प्रश्न महाराष्ट्रात लातूर विभागाने प्रथम सोडवल्याने शिक्षकांच्या चेहऱ्यावर आनंद द्विगुणित झाला. महाराष्ट्र शासनाचे अनुदान वितरणाचे आदेश निघाल्यास तात्काळ विना अनुदानित शिक्षकांना टप्पा वाढ अनुदान मिळेल, अशी ग्वाही लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक गणपतराव मोरे यांनी दिली.

ते महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघ जिल्हा धाराशिव व कायम विना अनुदानीत कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मोरे यांनी टप्पा वाढ अनुदान मिळवून देण्यास मदत केल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ भाई उद्धवराव पाटील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था म. धाराशिवच्या कार्यालयात १४ डिसेंबर रोजी आयोजित केला होता. त्यावेळी मोरे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कायम विनाअनुदानित कृती समितीचे लातूर विभागीय अध्यक्ष बिभिषण रोडगे होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष बालाजी तांबे, धाराशिव जिल्हाध्यक्ष बालाजी इतबारे, जिल्हा सरचिटणीस राजकुमार मेंढेकर, जिल्हा उपाध्यक्ष नारायण खैरे व संभाजी गायकवाड, विकास वाघमारे आदीसह अनेक शिक्षण क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमास एकनाथ चव्हाण, अमोल घोगरे, प्रा. राहुल पाटील, जगन्नाथ माळी, जयपाल चोबे, एडके, अरुण माडेकर, पी.एन. चव्हाण, ताटे, खैरुद्दीन सय्यद, आशिष होळे, गिरवलकर यांच्यासह संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बालाजी तांबे व नारायण खैरे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एकनाथ चव्हाण यांनी तर सूत्रसंचालन राजकुमार मेंढेकर यांनी केले. शेवटी उपस्थित यांचे आभार शहराध्यक्ष प्रा. राहुल पाटील यांनी मानले.

## औषध निर्मितीच्या क्षेत्रात फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन करावे : शरण पाटील

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**



व्यवसायिक अभ्यासक्रम व तंत्र कौशल्ये हे आधुनिक जगात रोजगार आणि करिअर विकासाची महत्वाची अंगे आहेत. प्रामुख्याने व्यावसायिक कौशल्य, औद्योगिक ज्ञान आणि तांत्रिक क्षमता आजच्या तरुणांमध्ये असणे गरजेचे आहे. तांत्रिक अभ्यासक्रम, माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर विकास, यंत्र अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल अभियांत्रिकी, व्यवस्थापन अभ्यासक्रम, व्यवसाय व्यवस्थापन याकडे विद्यार्थ्यांनी करिअर म्हणून पाहिले पाहिजे. आज आरोग्य क्षेत्रामध्ये औषध निर्मितीच्या कार्यामध्ये फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण संशोधन करुन औषध निर्मितीमध्ये तरुणांनी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी केले.

नगर शिक्षण विकास मंडळ संचलित माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सत्काराप्रसंगी शनिवारी (ता.१४) रोजी उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर होते. यावेळी नाट्य कलावंत संजय कोथळीकर, विज्ञान शिक्षक विजय दिंडोरे, माधवराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, फार्मसी कॉलेजचे समन्वय प्रा. डॉ. रवींद्र आळंगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कै. माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी नाट्य कलावंत संजय कोथळीकर, प्राचार्य श्रीराम पेठकर, विजय दिंडोरे यांना मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य योगेश पाटील, प्रा. प्रियंका काजळे, प्रा. वैष्णवी पाटील, प्रा. सदाफलमास मुजावर, प्रा. अनिल मोरे, प्रा. राहुल इंजे, प्रा. सुदिप ढंगे, अमोल कटके, किशोर कारभारी आदींनी पुढाकार घेतला. नबीलाल जमादार, प्रतीक राठोड, सुरज साठे, दिनेश गडवे, सलोनी वाघे, श्रीया मुरूमकर, आकांक्षा इंगळे, सुप्रिया बावा आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पायल अंबर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनीत बागडे व प्रा. सरोजा कालजाते तर उपस्थितांचे आभार प्रा. विवेकानंद चौधरी यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी वृद्ध उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## हुडहुडी : किमान पारा आला खाली; संभाजीनगर १०.६

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : फेंगल चक्रीवादळामुळे वाढीत असलेल्या किमान तापमानानंतर आता फेंगलचा प्रभाव संपुष्टात आल्याने किमान पाऱ्यात घसरण सुरू झाली आहे. मागील दोन ते तीन दिवसांमध्ये तापमानात कमालीची घसरण झाल्याची नोंद करण्यात आली आहे. शनिवार, १४ रोजी किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे.

दक्षिणेत फेंगल चक्रीवादळाने जवळपास आठवडाभर धुमाकूळ घातला. याचा मोठा परिणाम मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात दिसून आला. छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातही याचा प्रभाव जाणवला. ऐन हिवाळ्यात दिवसभर ढगाळ वातावरणामुळे किमान तापमानाने तब्बल २४ अंशापर्यंत उसळी घेतली होती. मात्र, आता चक्रीवादळ संपले असल्याने वातावरणातदेखील गारवा वाढू लागला आहे. मागील तीन ते चार दिवसात झपाट्याने किमान तापमानाची घसरण अनुभवायला मिळाली.

शनिवार, १४ डिसेंबर रोजी यात आणखी घट होऊन पारा १०.६ अंशावर येऊन ठेवला. शनिवारी कमाल तापमान २७.६, तर किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे.

### रुग्णांची संख्या वाढतेय

दरम्यान, वातावरणात गारवा वाढल्याने सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी अशा व्हायरल आजारांची साथ सुरू झाली आहे. शहरातील दवाखाने व्हायरल रुग्णांनी भरले आहेत. लहान मुले तसेच ज्येष्ठांना याचा अधिक त्रास होत असल्याचे डॉ. अभय शिरसाट यांनी सांगितले.

### दिवसभर गारवा...

थंडीपासून बचावासाठी ठिकठिकाणी स्वेटर, मफलर, कानटोप्या विक्रीची दुकानांवर ग्राहकांची झुंबड उडाल्याचे दिसून येत आहे. सध्या दिवसभर वातावरणात गारवा असून, रात्री कमालीची हुडहुडीचा अनुभव येत असून, पहाटे यात आणखी वाढ होत आहे. यामुळे सकाळी 'मॉर्निंग वॉक' करणाऱ्यांची संख्याही घटल्याचे चित्र आहे.

### गहू, हरभऱ्याला लाभ

दरम्यान, वाढत्या थंडीमुळे गव्हाचे पीक जोमाने बहरत आहे. सध्या गव्हासोबतच हरभरादेखील जोमाने वाढत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. ही थंडी गहू हरभरा पिकासाठी उपयुक्त असल्याचे डॉ. एस. बी. सूर्यवंशी यांनी सांगितले.

## अनिल एंडोले, राजेश राऊत, सी.आय.एस.एफ., सागर इंगळे सी.आर.पी.एफ.मध्ये निवड





तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१५ डिसेंबर

सोयगाव शहरातील अनिल एंडोले (सी.आय.एस.एफ.), राजेश राऊत, (सी.आय.एस.एफ.), सागर इंगळे (सी.आर.पी.एफ.) मध्ये निवड झाली आहे.यासाठी ते गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करीत होते. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्याबद्दल सोयगाव शहरातील मित्रपरिवार व त्यांचे नातेवाईक त्यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांचे नगरपंचायत कार्यालय सोयगावच्या वतीने नगरसेवक यांच्या हस्ते फुल गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला,तसेच शहरातील शेतकरी,व्यापारी,पत्रकार यांनीही त्यांचा सत्कार केला. तसेच सायंकाळी त्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली होती.

## श्रीपारदेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता अभियान उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्थेच्या वतीने पळशी येथील श्रीपारदेश्वर शिव महादेव मंदिर स्वच्छता अभियान शुक्रवारी, १४ डिसेंबर रोजी घेण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेमध्ये आयोजित या अभियानात अनेक भक्तगण उत्स्फूर्त सहभागी झाले होते.

मंदिर परिसराची स्वच्छता झाल्यानंतर श्रीपारदेश्वर शिव महादेवाला महाभिषेक करून महाआरती करण्यात आली. संस्थेचे कोषाध्यक्ष संदीप बेदरकर यांच्या वतीने सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला. मंदिराचे अध्यक्ष आनंद मिश्रा शास्त्री महाराज यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष सुहास ठोसर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देवून करण्यात आला. मंदिराच्या सचिव जयेशा वाघुलकर यांचा सत्कार मीरा गाडेकर व पूजा काकडे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देवून करण्यात आला. श्रीपारदेश्वर शिव महादेवासमोर संघटक तसेच प्रसिद्ध गायक हेमंत चारठाणकर यांनी शिवस्तुती सादर केली.

अध्यक्ष सुहास ठोसर यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली. विक्रम काकडे यांनी सूत्रसंचालन करून आभार प्रदर्शन केले.

यावेळी संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत राजूरकर, सहसचिव प्रकाश सनान्से, सहकोषाध्यक्ष संदीप बेदरकर, संपर्कप्रमुख नरेश देवळे, संघटक हेमंत चारठाणकर, तज्ज्ञ सल्लागार सुरेश जोशी, प्रदीप देशमुख, विठ्ठल मुंडे, विक्रम काकडे, नितीन जोशी, सुधीर पोतदार, दीपक कुलकर्णी, संतोष संत्रे, शशिकांत कुलकर्णी, श्रीधर कुलकर्णी, संजीव वाघ, दत्ता भोसले, अरुण देशमुख, राहुल कुलकर्णी, भगवान इंगळे, सुहास साखरे, नामदेव दांडगे, अक्षय गोरे, महेश पाटील, संतोष खळे, राजेंद्र बिराजदार, संतोष देशपांडे, विजय वेलदे, महेश कुलकर्णी, मीरा गाडेकर व पूजा काकडे यांच्यासह इतर शिवभक्त उपस्थित होते.

## एमजीएममध्ये खेळाडूंसाठी दर्जात्मक सुविधा उपलब्ध : पोलिस उपायुक्त नितीन बगाटे

### एमजीएम ऑलिंपिकचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : खेळ हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असून आज शाळा, महाविद्यालय आणि विद्यापीठात सर्व क्रीडा सुविधा, मार्गदर्शन आणि प्रशिक्षण केंद्रे उपलब्ध आहेत. एमजीएम विद्यापीठाने खेळाडूंची गरज लक्षात घेऊन अत्यंत चांगल्या प्रकारच्या क्रीडा सुविधा येथे उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा वपर करून विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करावे, असे प्रतिपादन पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांनी यावेळी केले.




महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एमजीएम ऑलिंपिकचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम एमजीएम विद्यापीठ परिसर येथे संपन्न झाला. यावेळी पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, रणजीत कक्कड, डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, क्रीडा विभागप्रमुख प्रा.डॉ. दिनेश वंजारे, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, खेळाडू व सर्व संबंधित उपस्थित होते.

पुढे बोलताना पोलिस उपायुक्त नितीन बगाटे म्हणाले, एमजीएम ऑलिंपिक या स्पर्धेत अनेकांनी पदके जिंकली असतील तर काहींना पराभव पत्करावा लागला असेल. आपला खेळामध्ये पराभव झाला असला तरी खेळ माणसाला आयुष्यात पुन्हा एकदा लढण्याची खेळण्याची प्रेरणा देत असतो. वैयक्तिक आणि सांघिक क्रीडा प्रकारांत एका जिद्दीने आपण सर्वांनी खेळला आहात. ज्यांना पारितोषिक मिळाले आहे त्यांचे खूप सारे अभिनंदन आणि ज्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांचेही कौतुक मी या निमित्ताने करतो. कारण, आपल्याला पारितोषिक जरी मिळाले नाही तरी आपल्याला या स्पर्धेदरम्यान खूप काही गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. एमजीएम विद्यापीठाने या स्पर्धा आयोजित केल्या त्याबद्दल विद्यापीठाचे अभिनंदन करतो आणि स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना पुढील वाटचालीस शुभेच्छा!

दरवर्षी एमजीएम संस्थेंतर्गत असणाऱ्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'एमजीएम ऑलिंपिक' अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षीच्या स्पर्धा मंगळवार, दिनांक १० डिसेंबर २०२४ ते गुरूवार, दिनांक १२ डिसेंबर २०२४ दरम्यान एमजीएम स्टेडियम येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत एमजीएम संस्थेच्या नांदेड, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

सर्व विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र तर विजेत्या संघांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षीच्या स्पर्धेत एमजीएम नवी मुंबईच्या संघाने सर्वांना मागे टाकत १२३ गुणांसह 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप' मिळवली. तर उपविजेतेपद एमजीएम विद्यापीठाने प्राप्त केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा.डॉ.शशिकांत सिंग, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, प्रा.रहीम खान, डॉ.अमरदीप असोलकर, बालाजी शेळके, जॉय थॉमस, प्रविण शिंदे व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले आहे. 'एमजीएम ८ व्या ऑलिंपिक' स्पर्धेतील निकाल अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्या संघाची नावे खालीलप्रमाणे आहेत.

## लोकसहभागातून खेड्याचा शाश्वत विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही : डॉ. पुरुषोत्तम भापकर

छत्रपती संभाजीनगर : लोकसहभागातून खेड्याचा शाश्वत विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही, असे प्रतिपादन माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी शनिवारी, १४ डिसेंबर रोजी येथे केले. ग्रामविकास संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सिडको एन-२ येथील ग्रामविकास भवनमध्ये आयोजित 'ग्रामविकासाची सद्यस्थिती : आव्हाने व उपाययोजना कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी भापकर बोलत होते. याप्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे, नरहरी शिवपुरे, डॉ. भगवानराव कापसे, कैलास तवार, अप्पासाहेब उगले, मनोहर सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. भापकर म्हणाले, गाव हेच मंदिर समजून सरपंचांनी गावच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम राबवावा. युवकांनी ग्रामविकासाला सक्रिय योगदान देण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्षीय समारोपात डॉ. सर्जे राव ठोंबरे म्हणाले, कार्यशाळेला उपस्थिती सर्वजण सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्यक्ष कृती करणारे असल्यामुळे या कार्यशाळेला विशेष महत्त्व आहे. विकसित भारत, समर्थ भारताकरिता ग्रामीण भागाचा विकास होणे, ही काळाची गरज आहे.




### शेतीसंबंधी सांगोपांग चर्चा

कार्यशाळेत अनुक्रमे ग्रामविकासाची सद्यस्थिती आव्हाने व उपाययोजना, शेती, स्वयंरोजगार, शिक्षण या विषयांवर डॉ. भगवानराव कापसे, सुनील कस्तुरे, श्रीकांत कुलकर्णी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यात सद्यस्थितीमध्ये ८० टक्के शेतकरी, अल्पभूधारक सिंचनासह मूलभूत सुविधांचा अभाव, बेरोजगारी, स्थलांतर, वाढते शहरीकरण, आव्हाने, बदलते हवामान, शेतमालाचे भाव, ग्राहक केंद्रित शासकीय धोरण, उपायांमध्ये मूलभूत सुविधा, कृषी उद्योग, शेतीला प्रतिष्ठा, गटशेती, रोजगारक्षम उच्च दर्जाचे शिक्षण यावर सविस्तर मार्गदर्शन व चर्चा झाली.

याप्रसंगी अरविंद केंद्रे, प्रा.जयप्रकाश बागडे, अशोक गुरनाळे, रामचंद्र पिल्दे, दिगंबर निकाळजे, शिवाजीराव घुगे, प्रा. उषा वटाणे, बाबासाहेब गोजरे, दादासाहेब शिंदे, राम वाघ, अर्जुनराव ढगे, मीनाक्षी बिराजदार यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन भारती खरटमल यांनी, तर आभार बालाजी बिरादार यांनी मानले.

कार्यशाळेसाठी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, प्रगतशील शेतकरी, अभ्यासक, संशोधक, महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी रवींद्र वासनिक, रवींद्र सातदिवे, निवृत्ती घोडके, अर्चना पवार, संदीप शिंदे, प्रणिता साळवे, दीपाली राऊत, प्रकाश राठोड यांनी परिश्रम घेतले.

## गीता पठण स्पर्धा, दत्त जयंती उत्साहात साजरी

### आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत आयोजन

छत्रपती संभाजीनगर : शनिवारी, १४ डिसेंबर रोजी मॉन्टेसोरी शिक्षण संस्था आणि गीता परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गीता जयंती आणि दत्त जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सामूहिक गीता पठणानंतर विशेष गीता पठण स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दत्त जयंतीचा पावन मुहूर्त साधून ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये गीतेचे ज्ञान रुजविण्यासाठी आणि संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ रमेश मालाणी, संस्थेचे सचिव गोविंद अग्रवाल, संस्थेचे सहसचिव प्रफुल्ल मालाणी, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. गिरीश सावजी, संस्थेचे मान्यवर डॉ. श्रीकांत सावजी, निलेश महाजन, संजय गादिया, श्रीमती सुवर्णा गिरमे, श्रीमती शशिकला बोराडे यांनी प्रोत्साहन दिले. गीता परिवारच्या शोभा मालाणी यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. प्रतिमा पूजन आणि भगवद्गीता ग्रंथ पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ओंकाराने प्रारंभ केला. विद्यार्थ्यांनी गीतेतील श्लोकांचे पठण केले. प्रत्येक श्लोकाचा त्यांनी स्पष्ट उच्चार व गेय पद्धतीने सादरीकरण केले. ज्यामुळे वातावरण आध्यात्मिक आणि शांतीमय झाले. या विद्यार्थ्यांची तयारी श्री राजमाने सर व श्री खेळवणे सर यांनी करून घेतली.

गीता म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ नसून, जीवनाचे वास्तव आणि कर्तव्याचा सखोल मार्ग दाखवणारा ग्रंथ आहे, असे प्रास्ताविक भाषणात प्रथम सत्राचे इन्चार्ज अजय तुपे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अध्याय बारावा, अध्याय पंधरावा, अध्याय सोळावा पठण केले. मॉन्टेसरी बालक मंदिर प्राथमिक विभाग सहावी सातवीतील नऊ विद्यार्थी सहभागी झाले होते. आ. कृ. वाघमारे प्रशाला आठवी ते दहावीतील दहा विद्यार्थी सहभागी झाले होते. गीता पठण स्पर्धा दत्त जयंती निमित्ताने उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर प्रकारे गीता अध्याय सादर केले असे छत्रपती संभाजी नगरच्या गीता परिवार अध्यक्ष माधुरी सोमाणी यांनी प्रतिपादन केले. या स्पर्धेचे परीक्षण इंदिरा भट्टड, मंगला राठी, खेळवणे सर यांनी केले,

## मुख्याध्यापक संजय पाटीलांचा जिल्हास्तरीय निवडीचे स्वागत

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१५ डिसेंबर

नुकत्याच तालुका स्तरिय विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून संजय पाटील जादू पाण्याची या साहित्य कृतीचा प्रथम क्रमांक आला असुन त्याची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे.याबद्दल रंगनाथ आढाव व शिक्षक वृंद कडून पंचायत समिती कार्यालयात गटशिक्षण अधिकारी यांनी गौरव करीत शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.



सोयगाव शहरातील नॅशनल मराठी स्कूल मध्ये पार पडलेल्या ५२ व्या तालुकास्तरीय विज्ञान गणित पर्यावरण प्रदर्शनात शिक्षकाकांचे शैक्षणिक साहित्य या मध्ये वि.जा. माध्यमिक आश्रम शाळा घाणेगाव तांडा येथील विज्ञान शिक्षक मुख्याध्यापक संजय पाटील यांची जादू पाढ्यांची या शैक्षणिक साहित्याचा माध्यमिक गटातून प्रथम क्रमांक आला असून त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये निवड झाली सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## आनंद जीवन छतलानी यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – कुंवारफल्ली, राजाबाजार येथील रहिवासी आनंद जीवन छतलानी (वय ३३) यांचे अल्पशा आजाराने दि.१३ डिसेंबर रोजी राहत्या घरी निधन झाले.

त्यांच्यावर दि.१३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता कैलास नगर स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहिण असा परिवार आहे.

## पद्मभूषण खा.शरद पवार व माजी जि. प. अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१५ डिसेंबर

पद्मभूषण खा.शरद पवार व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा जेष्ठ नेते प्रदेश चिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार )अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल सोयगाव मध्ये शनिवार रोजी शाळेत विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.तसेच शाळेच्या प्रांगणात निबंध स्पर्धा,धावणे स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.या निबंध स्पर्धेत शालेय एकुण ३७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला तसेच बाल वयोगटातील विद्यार्थ्यांनीं धावणे,उंच उडी खेळात नैपुण्य मिळवले विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा आनंद व्यक्त करुन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या स्पर्धा साठी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,उपमुख्याध्यापक सागर घाटे,मार्गदर्शक प्रा.डॉ.दादासाहेब पवार,संस्थेचे प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे ,अंजली कथलकर,शितल पवार,शितल गावांडे,आशा पंडित, नम्रता पाटील,निकिता देशमुख,रोहिणी पाटील,जयश्री श्रीवास्तव,मनिषा पाटील,शितल काटोले,विद्या पाटील, अरुणा भोई,नलिनी पाटील,योगेश काळे,हरिष कोळी, संजय डापके,रमेश कंडारे,किष्णा गोतमारे,ज्ञानेश्वर पंडित, आदींनी या स्पर्धेसाठी सहकार्य केले.



## ध्येयप्राप्तीसाठी स्वत:त बदल घडवावा : डॉ. एम. डी. शिरसाठ

छत्रपती संभाजीनगर : उद्दिष्ट स्पष्ट असतील तर यशाला सहजपणे गवसणी घालता येते. ध्येयासाठी स्वत:त संदर्भानुसार व परिस्थितीनुसार बदल घडवावा लागतो. याकरीता स्वत:मधील क्षमता ओळखायला शिका, असे मार्गदर्शक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. डी. शिरसाठ यांनी मांडले. शनिवारी, १४ रोजी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे होते. मंचावर उपप्राचार्य डॉ. टी. आर पाटील, उपप्राचार्या डॉ. अरुणा पाटील, विद्यार्थी संसद सचिव डॉ. वसंत निरस यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे सर्वच विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होणार आहे. काळाच्या ओघात जो चालेल तोच टिकेल. प्रत्येकाला स्वत:च्या क्षमता विकसित करून सिद्ध करावे लागेल.

## कलावंत घडवणारा सहकार महर्षी बाळासाहेब पवार संगीत महोत्सव : आ. संजना जाधव

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१४ डिसेंबर – सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय व बाळासाहेब पवार फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संगीत महोत्सवाचा समारोप समारंभ सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाच्या प्रांगणात पार पाडला . या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून कन्नड सोयगाव मतदारसंघाच्या आमदार संजना जाधव व छत्रपती संभाजी नगर सिडकोचे प्रशासक भागवत बिघोल उपस्थित होते. लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी बोलताना आमदार संजना जाधव म्हणाल्या की या संगीत महोत्सवाच्या माध्यमातून कन्नड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. याचा फायदा घेऊन भविष्यात कन्नड मधून महाराष्ट्रात मोठे कलावंत निर्माण होतील.सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धात्मक विद्यार्थी घडविण्यासाठी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याचा फायदा विद्यार्थी कलावंतांनी करून घ्यावा असे आवाहन त्यांनी केले या महोत्सवात विविध लोककला, लोकनृत्य,लोकगायन यांचे सादरीकरण झाले यात मुलींचा लक्षणीय सहभाग होता.या कार्यक्रमासाठी मानसिंह पवार ,प्राचार्य डॉ विजय भोसले, प्राचार्य डॉ राहुल क्षीरसागर ,रामकृष्ण पवार, रुपेश मोरे यांच्यासह कन्नड मधील प्रतिष्ठित नागरिक, पालक, विद्यार्थी कलावंत व मोठ्या प्रमाणात रसिक श्रोते उपस्थित होते.






# अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना ५३ कोटींची नुकसान भरपाई

## औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना मदत; आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्याला यश...

**तभा वृत्तसेवा**
**औसा दि.१५ डिसेंबर -**

ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील ३९ हजार हेक्टरातील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त भागाची आमदार अभिमन्यू पवार यांनी पाहणी करून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे केले होते. या नुकसानीच्या भरपाईसाठी सरकारकडे प्रस्ताव दाखल करुन सातत्याने याचा पाठपुरावा केला होता. यामुळे औसा मतदारसंघातील सात मंडळांमधील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी ५३ कोटीं रुपयांची नुकसान भरपाई मंजूर झाली आहे.



यावर्षी लातूर जिल्ह्यासह औसा मतदारसंघातील काही भागात अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाले होते. यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळून मदत व्हावी. यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी अतिवृष्टीने बाधीत भागाचा दौरा केला. व पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी म्हणून शासनाकडे पाठपुरावा केला होता. यानंतर शासनाकडून औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील ३९ हजार हेक्टर कृषिक्षेत्राच्या नुकसानपोटी ५३ कोटीं रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या औसा मतदारसंघातील मातोळा, बेलकुंड व उजनी महसूल मंडळांमधील शेतकऱ्यांना ४० कोटींची नुकसान भरपाई यापूर्वीच वितरित करण्यात आली आहे.

यामुळे खरीप २०२४ हंगामातील नुकसानीपोटी औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांना एकूण ९३ कोटीं रुपयांची नुकसानभरपाई मिळवून देण्यात यश आले आहे.



### शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे...

महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करीत असून नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केली आहे. यावेळीही अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना सरकारने आर्थिक दिलासा दिला आहे. औसा मतदारसंघातील किल्लारी, लामजना, भूतमुगळी, कासार बालकुंदा, मदनसुरी व कासार सिरसी या मंडळांमधील सुमारे ३९ हजार हेक्टर कृषिक्षेत्राचे नुकसान पोटी ५३ कोटीं रुपये व यापुर्वी याच हंगामात ४० कोटी असा एकुण ९३ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर केली आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आ. पवार यांनी आभार मानले आहेत.

# पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांना जाहीर

### हिरकणी पुरस्कार संयोजक समिति तुळजापूर यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

महाराष्ट्राची जेष्ठ समाजसेविका पद्मश्री अनाथांची माई सिधुताई सपकाळ यांच्या कन्या प्रसिद्ध गजलकार ममता सपकाळ यांना पहिला राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढील महिन्यात, जानेवारी २०२५ मध्ये मान्यवरांच्या हस्ते व उपस्थितीत हा पुरस्कार सपकाळ यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथे धाराशिव जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील प्रति वर्षी नऊ कर्तृत्ववान महिलांना गौरव करण्यासाठी मागील पाच वर्षापासून जिल्हास्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जात होते. यंदा प्रथमच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा शक्तीपीठ तुळजाई नगरीत आयोजित करून या पुरस्काराची सामाजिक व वैचारिक उंची वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे अशी माहिती मुख्य संयोजक अनिल आगलावे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

पुजारी नगर फाऊंडेशनच्या माध्यमातून हा पहिलाच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देण्याची घोषणा फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांनी केली. या पुरस्कार सोहळ्यासाठी संयोजक समितीची स्थापना करण्यात आली. यामध्ये संस्कार भारती, आरळी बुद्रुक महोत्सव समिती, तुळजापूर तालुका पत्रकार संघ, मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूर यांचा सहभाग आहे. ममता सपकाळ यांना हा पुरस्कार पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थानचे सहअध्यक्ष गुरुवर्य गहिनीनाथ महाराज औसेकर आणि श्री तुळजाभवानी मंदीराचे महंत तुकोजी बाबा यांच्या हस्ते जिजाऊ जयंतीनिमित्त १२ जानेवारीला श्रीनाथ लॉन्स येथे प्रदान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार भारतीच्या प्रदेशाध्यक्ष स्नेहलताई पाठक असणार आहेत.



जेष्ठ समाजसेविका पद्मश्री अनाथांची माई सिधुताई सपकाळ यांच्या कार्याचा वारसा समर्थपणे पुढे चालवण्याचे शिवधनुष्य कन्या ममता सपकाळ यशस्वीतेनी पेलत आहेत. शेकडो अनाथांची ताई म्हणून हिमतीने सांभाळ करत आहेत. त्या कार्याला बळ मिळावे यासाठी पहिलाच राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देण्यात येतो आहे.

# कृषी महाविद्यालय डोंगरशेळकी तांडा येथे रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी संलग्नित डोंगरशेळकी तांडा येथील कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम, एचडीएफसी बँक. लि. शाखा उदगीर व नागप्पा अंबरखाने रक्तपेढी, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेच्छा रक्तदान शिबिराचे, यशस्वी आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संग्राम पटवारी यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उद्घाटन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.पी. सूर्यवंशी, उपप्राचार्य डॉ.ए.एम. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ.ए.जी. दापकेकर, रासेयोचे कार्यक्रमाचे अधिकारी डॉ.एस.बी. पवार, उदगीर येथील नागप्पा अंबरखाने रक्तपेढीचे डॉ. शेटकार बी.एम, व्यवस्थापन प्रमुख एचडीएफसी बँक.लि.

शाखा उदगीरचे प्रमोद पवार, महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि रासयो स्वयंसेवक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि उपस्थितांचे ऋणनिर्देश, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.एस.बी. पवार यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधिका नाकील व अनुजा कचवे या विद्यार्थिनी केले.

# गिरकचाळ येथे दत्त जयंतीनिमित्त किर्तन व प्रवचन कार्यक्रम संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१५ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील गिरकचाळ येथे नदीच्या काठावर वसलेले एका छोट्याश्या गावात सूमारे ५०० वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेची जोपासना आज तगायत गावकऱ्यांनी चालू ठेवली आहे. येथील प्राचीन दत्त मंदीर खूप प्रसिद्ध आहे. त्यामूळे दत्त जयंतीचे औचित्य साधून रविवारी दि.१५ डिसेंबर रोजी प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही प्रवचन व कीर्तनाचे आयोजन रघुनाथ महाराज व त्यांची ज्येष्ठ चिरंजीव नवनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते.

या प्रवचंकार शंकर महाराज गौरकर यांनी सदभक्तासमोर समोर दत्तात्रे हे त्रिमूर्तीचे (ब्रम्हा, विष्णू, महेश) अवतार आहेत. दत्तात्रे हे संन्यास व अद्वैत वेदान्ताचे प्रतिक आहेत. दत्तात्रे ऋषी अत्री आणि त्यांच्या पत्नी अणूसया यांचे पूत्र आहेत. पुराणानूसार अनुसया यांच्या पतिव्रतेच्या गुणांमूळे त्रिमूर्ती स्वतःहा मनुष्य रुपात त्यांच्या शरण आले. अनूसयाने त्यांना बालक रूप दिले आणि त्यातूनच भगवान दत्तात्रेय यांचा जन्म झाला असे म्हणाले. प्रवचन व किर्तनांतर महीलांनी दत्तात्रेयेचा पाळना घालण्यात आला.

गावातील व बाहेर गावाहून आलेल्या भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन राहूल कांबळे यांच्या वतीने करण्यात आले होते. दत्त जयंतीनिमित्त भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी भाविक भक्त व महीला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाऊसाहेब दूरदृष्टीचे समाजसेवक होते : डॉ. हेमंत देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

विद्येसाठी जगण्याचा मोह तयार करण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले. विद्ये शिवाय जीवनामध्ये काहीच नाही हे भाऊसाहेबांनी जाणले होते. भाऊसाहेब हे दूरदृष्टीचे समाजसेवक होते असे उद्गार प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी काढले. ते येथील शिवाजी महाविद्यालयामध्ये डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्य या विषयावर १२५ व्या जयंतीनिमित्त या.द.व. देशमुख कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, तिवसा जिल्हा अमरावती व शिवाजी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील एकंबेकर हे होते. तर प्रमुख उपस्थिती डॉ.प्रशांत हारमकर अर्थशास्त्र विभाग प्रमुख यादव महाविद्यालय तिवसा, प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे, समन्वयक डॉ. विष्णू पवार यांची होती. पुढे बोलताना प्राचार्य देशमुख म्हणाले, त्या काळामध्ये शिक्षणाची सोय नव्हती, स्पृश्य अस्पृश्य वाद होता ते मिटवण्याचे कार्य भाऊसाहेबांनी केले.



त्यांनी स्वतः अतिशय परिश्रमातून पीएचडी पदवी प्राप्त केली आणि समाज उद्धारासाठी, लोकोद्धारासाठी आपले जीवन कार्य अर्पण केले. त्यांनी केलेले कार्य नवीन पिढीपर्यंत तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे काम व्याख्यान मालातून केले जात आहे असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, भाऊसाहेब थोर समाज सुधारक होते. शिक्षणाची क्रांती त्यांनी केली. ग्रामीण भागातील जनतेचा विकास केला. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना मार्ग मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विष्णू पवार, प्रास्ताविक डॉ. प्रशांत हरमकर तर आभार प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीदत्त जयंती विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**औसा दि.१५ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील किल्लारी व सिरसल येथील दत्त मंदीरात सकाळी श्री सद्गुरु दत्त यांचा महाभिषेक करण्यात आला. यानंतर किर्त, दत्त जन्माचा पाळणा महिलांनी गाऊन गुलाल उधळण्यात आला. रांगा लावून भाविकांनी दर्शन घेतले. वृक्षारोपण, किर्तन व महाप्रसादाने उत्सवाची शनिवार दि.१४ रोजी सांगता करण्यात आली. किल्लारी येथील दत्त मंदिरात दत्त जन्मोत्सव आनंदात साजरा करण्यात आला.

शुक्रवारी सकाळी महीला भजनाचा कार्यक्रम झाला. तर शनिवारी सकाळी श्रीदत्त यांना महाभिषेक करण्यात आला. हभप. प्रशांत घोडके महाराज बलसुरकर यांचे कीर्तन झाले. त्यानंतर दुपारी दत्त जन्माचा गुलाल फुलांसह उधळण्यात आला. काल्याचे कीर्तन, पाळणे गीत, नवसाचा पाळणा, वृक्षारोपण व महाप्रसाद वाटप करण्यात आला. हभप. प्रशांत घोडके महाराज बलसुरकर, ईश्वर गुरुजी, विलासदेव कुलकर्णी, सरपंच सुलक्षणा बाबळसुरे, ग्रा.प. सदस्य वैशाली गुंजोटे, सुमनबाई भोसले, शुभांगी स्वामी, पूजा स्वामी, बंकट पाटील, बाळू बिराजदार, केशव बिराजदार, जोतिराम भोसले, ज्ञानेश्वर भोसले, तुकाराम मोहिते, राजेंद्र पोतदार, सूर्यकांत बाळापुरे, प्रभाकर बाबळसुरे, शिवदर्शन गुंजोटे, डॉ. निर्मला गुंजोटे, निर्मला टाचले, जनाबाई मोहिते, उज्वला बाबळसुरे, सुवर्णा टाचले, सोमनाथ बाळापुरे, युवराज टाचले, गोपाळ बाबळसुरे, डॉ. ऋषिकेश गुंजोटे, महेश गुंजोटे, विजय टाचले, कार्तिक टाचले, नितीन टाचले, आकाश टाचले, सुमित भोसले आदी नागरिक उपस्थित होते. महोत्सव यशास्वीपणे पार पाडण्यासाठी श्री दत्त मंदीर समितीचे अध्यक्ष अंकुश टाचले, गुलाब शिंदे, राजेन्द्र पोतदार, सूर्यकांत बाळापुरे, विश्वनाथ गुंजोटे यांनी पुढाकार घेतला होता. सिरसल येथे याही वर्षी दत्त जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. शनिवारी जन्मोत्सवानिमित्त सिरसल, येळवट, किल्लारी, पारधेवाडी, कारला, कुमठा, मोगरगा, तळणी व परिसरातील दत्तभक्तांनी दर्शन घेऊन उत्सव साजरा केला.

समितीचे अधक्ष हिरालाल आळंगे, चंद्रशेखर हांडे, दिनेश सूर्यवंशी, बालाजी हांडे, प्रकाश पाटील, बाळू सूर्यवंशी, अभिषेक रणदिवे यांनी महोत्सव साजरा करण्यासाठी परिश्रम घेतले होते.

# श्यामार्य कन्या विद्यालयात विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी प्रस्तुत श्यामलाल कला पंधरवाडा अंतर्गत विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम म्हणजेच सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य होते.

संस्थेच्या सहसचिव अंजुमनी आर्य, रमाकांत चटनाळे, श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमीचे संयोजक सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी चव्हाण, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक प्रवीण भोळे, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे, श्यामलाल प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक राहुल लिमये, श्यामार्य कन्या विद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक विजय बैले, पारिजात शिशुविहारच्या संयोजिका अवंतिका मोरतळे आदी मान्यवर उपस्थित होते.

श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी अंतर्गत कला पंधरावाडा, क्रीडा पंधरवडा व प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रत्येक उपक्रमासाठी मंच देण्याचे कार्य श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य व सर्व संस्था पदाधिकारी यांनी कार्य केले आहे. कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विकासाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. फक्त त्याकडे आपण सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. अध्ययन, संस्कार व कलाविष्कार त्रिवेणीचा संगमातून शालेय जीवन फुलते.

त्याबरोबरच व्यक्तिमत्व विकासासाठी हे क्षेत्र अतिशय उपयुक्त आहे.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वाखाणण्याजोगा असून आपण स्नेहसंमेलन निमित्ताने प्राप्त झालेल्या व्यासपीठाचा विधायक उपयोग विद्यार्थ्यांनी घ्यावा असे उद्घाटन प्रसंगी रवी हासरगुंडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी निडवंचे यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वरी बिरादार सृष्टी गुळंगे वैष्णवी सूर्यवंशी त्यांना सहाय्य संगीता खादीवाले यांनी केले. आभार पर्यवेक्षक विजयकुमार बैले यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख वैशाली अनकल्ले, सहाय्यक आम्रपाली गायकवाड, संगीता सुतार, राहुल गुरमे, महेश हुलसुरे, सचिन तिवारी, सतनप्पा हुरदळे, संभाजी कोयले, माणिक कांबळे, विक्रम मलकापूरे, सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी, गोपाळ पुल्लागोर, समाधान कांबळे, दिलीप वाघमारे यांनी काम पाहिले.

# मुथुट फायनान्स शाखेची नळदुर्गमध्ये स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ डिसेंबर -**

नळदुर्ग येथे दि.१३ डिसेंबर रोजी मुथुट फायनान्स लिमिटेड कंपनीच्या शाखेची सुरुवात करण्यात आली असुन या कंपनीमुळे नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीकांना सोने तारण कर्ज मिळणे आता सोईचे होणार आहे.

मुथुट फायनान्स लिमिटेड कंपनीची शाखा सुरु करण्यात आली आहे. यावेळी शाखा शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विलास येडगे हे होते तर शाखेचा शुभारंभ तुकाराम घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन मुथुट फायनान्स कंपनीचे आरएम राकेश कुमार व झोनल मॅनेजर श्रीधर रेड्डी हे उपस्थित होते.

## ▶▶क्राईम वृत्त...



### आ. रमेश कराड यांचा सत्कार

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले. भारतीय जनता पार्टीचे नेते माजी जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांचे लातूर येथील संवादया त्यांच्या संपर्क कार्यालय येथे माजी नगराध्यक्ष बसवराज अण्णा बागबंदे, नगरसेवक दत्ता पाटील यांच्या समवेत आ. रमेश कराड यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.



### बाळासाहेब किसवे यांचा सत्कार

**अहमदपूर, दि.१५ डिसेंबर -**

महाराष्ट्र राज्य शेळी मेंढी पालन महामंडळाचे उपाध्यक्ष, राज्यमंत्री दर्जा प्राप्त असलेले बाळासाहेब किसवे यांचा अहमदपूर मध्ये नुकताच सत्कार करण्यात आला. महायुती मधील शिवसेना नेते तथा राज्यमंत्री दर्जा प्राप्त असलेले बाळासाहेब किसवे हे प्रथमच अहमदपूर दौऱ्यावर आले होते. अहमदपूरहून नागपूरकडे जात असताना बाळासाहेब किसवे व शिवसेनेचे प्रदेश प्रवक्ते योगेश केदार यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. सदरील सत्कार सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी पंचायत समितीचे सदस्य रामभाऊ नरवटे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, राजकुमार मुकनर, आनंत होळकर, सुदर्शन हामने, अनंत देवकते, मंगेश पोले, दिनकर बडूरे, गणेश कासनाळे, रवी देवकते, गणेश नरवटे, ओम नरवटे, राजू चिगळे यांच्या सह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रदेश प्रवक्तेपदी राजकुमार सस्तापुरे

**वलांडी, दि.१५ डिसेंबर -**

तालुक्यातील ईस्मालवाडी येथील भुमिपूत्र राजकुमार सस्तापुरे गेल्या तीस वर्षांपासून शरद जोर्शीच्या नेतृत्वात शेतकरी संघटनेत अत्यन्त प्रतिकुल परस्थिती असतानाही संघटनेत टिकून काम करून शेतकरी चळवळच्या पडझडीच्या काळात लातूर जिल्हाप्रमुखाची जबाबदारी घेऊन शेतकऱ्यांसाठी अनेक आंदोलन करून शेतकरी चळवळ जिवंत ठेवण्याच काम केले. याच कामाची दखल घेऊन भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय प्रवक्ते राकेश टिकेत यांच्या आदेशावरून भारतीय किसान युनियनचे राष्ट्रीय महासचिव राजवीर सिहं जादौन यांनी १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय कार्यालयातून निवडीचे पत्र देऊन निवड जाहीर केली आहे. राजकुमार सस्तापुरे सारखा एका सामान्य कुटूंबातील सामान्य कार्यकर्त्यांला भारतीय किसान युनियनने महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता ही जबाबदारी दिल्यामुळे शेतकरी चळवळीत व सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या त्याच्या मित्र परिवारात आनंदाच वातावरण आहे. व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.





### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन संपन्न

**उदगीर, दि.१५ डिसेंबर -**

केंद्रीय प्राथमिक शाळा, कोदळी (ता. उदगीर) येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी केंद्रातून अनेक शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्यात शांतिनिकेतन विद्यालयातील प्रयोगाचे नाव होते दोन आरशामध्ये विशिष्ट कोण केला असता मिळणाऱ्या प्रतिमांची संख्या पाहणे. हा प्रयोग यशस्वीरित्या करून दाखवला. माध्यमिक गटातून शांतिनिकेतन विदयालयाने पहिला क्रमांक पटकावला. प्रयोग करणाऱ्या विद्यार्थीनी संध्या दत्ता जाधव व अंकिता तानाजी गादगे यांनी उत्कृष्ट पद्धतीने प्रयोगांचे सादरीकरण केले. विज्ञान विषयांचे शिक्षक भूरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जयंतीनिमित्त दत्त मंदिरात पालखी उत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** शहरातील औसा रोडवरील श्री सदानंद दत्त मठ येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दत्त जयंती महोत्सवानिमित्त गेल्या चार दिवसांपासून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली.

शुक्रवारी दत्त मंदिरात दत्त जयंती उत्सव पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

श्री दत्त मंदिर परिसरात यात्रा सुरू सुरू असते. जयंतीनिमित्त परिसरात पाळणे, मिठाईची दुकाने सजली होती. दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होती. मंदिर प्रशासनातर्फे भाविकांना दररोज महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. शनिवारी सायंकाळी मोठ्या भक्तिभावात दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात पार पडला.





## संक्षिप्त वृत्त...

### लातुर शहरातील शाहु महाविद्यालयात सिपीआर कार्यशाळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** शाहू महाविद्यालयातील एनसीसी (मुली व मुले) विभागाच्या वतीने सीपीआर कार्यशाळा घेण्यात आली. एमआयटी कॉलेजमधील सीपीआर प्रशिक्षक प्रा. डॉ. हमीद चौधरी यांनी एनसीसी छात्रांना सीपाआरचे प्रशिक्षण दिले. हे प्रशिक्षण कोणत्याही क्षेत्रातील व्यक्ती घेऊ शकते. सीपीआर म्हणजे काय ? सीपीआर कोणाला द्यायचा ? सीपीआर केव्हा द्यायचा ? एखाद्याला सीपीआरची आवश्यकता आहे, हे कसे ओळखाचे? हे प्रशिक्षण डॉ. चौधरी यांनी प्रात्यक्षिकासह दिले. भारतात दरवर्षी पन्नास टक्के लोकांचे मृत्यू हृदयविकाराने होतात. आपल्या देशात दर मिनिटाला चार व्यक्तींचा मृत्यू हृदयविकाराने होतो. त्यामुळे हे रोखण्यासाठी सर्व सामान्य नागरिकांनी देखील अशा प्रकारचे प्रशिक्षण घेतले पाहिजे, असे डॉ. चौधरी म्हणाले. सीपीआर ही एक अत्यंत तातडीचे जीव सुरक्षा प्रक्रिया असून आपल्याजवळ कोणतेही साहित्य नसताना फक्त हातांनी सीपीआर देऊन आपण रुग्णाचे प्राण वाचवू शकतो. एनसीसी छात्रांनी याचे प्रशिक्षण घेऊन यासंदर्भात जनजागृती करावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले.

### क्रीडा स्पर्धेत ८० खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, महानगरपालिका, शहर व जिल्हा ट्रॅडिशनल रेसलिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय ग्रामीण व शहरी ट्रॅडिशनल (बेल्ट व मास) रेसलिंग क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलात पार पडल्या. यात ८० खेळाडू सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्घाटन पीएटीएम फाउंडेशनचे अध्यक्ष सरफराज मणियार यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेतून जिल्ह्याचा संघ निवडण्यात आला. तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड व रेसलिंग कोच चेतन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा झाल्या. पंच के. वाय. पटवेकर, ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक खय्युम तांबोळी यांनी सामनाधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली.

### 'त्या' संशयास्पद मृत्यु प्रकरणी योग्य ती कायदेशीर कारवाई : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** लातूर शहरातील एक रुग्णालयातील कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले बाळू डोंगरे यांचा संशयास्पद मृत्यु झाला. त्यांच्या नातेवाईकांनी बाळू डोंगरे यांचा मृतदेह पाहिला आणि त्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. कारण बाळू डोंगरे यांच्या शरीरावर अनेक ठिकाणी मारहाणीचे वळ दिसून येत होते. यामुळे नातेवाईकांनी गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका घेतली. सदरील प्रकरणात पोलीस तातडीने कारवाई करीत नसल्याने आ.अमित देशमुख यांनी तातडीने तपास करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या आणि डोंगरे कुटुंबीयाचे सांत्वन केले.

### शहरातील बाजार पेठेत विविध प्रकारच्या बोरांची आवक वाढली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** नारंगी, पिवळसर, लालसर रंगाची आणि विविध आकारांची चवीला आंबट-गोड बोरांचा हंगाम मागील काहीं दिवसांपासून सुरु झाला आहे. यंदा पाऊस जास्त प्रमाणात झाल्याने गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदाचा हंगाम चांगल्या प्रतिचा राहील, असा अंदाज व्यापा-यांनी व्यक्त्त केला आहे. तर यंदा बोरांच्या उत्पादनात वाढ झाल्याचे व्यापा-यांचे म्हणणे आहे. दिवाळीनंतर बाजारात बोरांची आवक सुरु होते. ती हळूहळू वाढत जाते, डिसेंबर, जानेवारी महिन्यात बोरांचा हंगाम बहरात असतो. फेब्रुवारी महिन्यात हा हंगाम संपत असतो. सध्या लातूर बाजारात सरासरी प्रति दिवस १०० ते १५० गोण्या इतकी आवक होत आहे. सध्या घाऊक बाजारात बोरांना मागणी वाढली असून, येणा-या काही दिवसात आणखी मागणी वाढेल. सध्या लातूर बाजारपेठेत सोलापूर जिल्ह्यातील आष्टी, मोहोळ, खंडाळी आदी गावांतून बोरांची आवक होत आहे. यामध्ये चमेली, कडाका, उमराण या बोरांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ॲपल बोरांची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. आकाराने मोठे, रंगाने हिरवे आणि गर जास्त असलेले ही बोरे आता लोकप्रिय होऊ लागले आहे.गेल्यावर्षीच्या तुलनेत उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

# २६ ते २९ डिसेंबर रोजी प्रॉपर्टी एक्स्पोचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** लातूर शहरातील सर्व बांधकाम व्यावसायिकांनी २०२२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या मैदानावर लातूर प्रॉपर्टी एक्स्पोचा प्रयोग केला. या उपक्रमाला लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. या एक्स्पोच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उलाढाल झाली. तर दहा हजार नागरिकांना या एक्स्पोला भेट देऊन एक्स्पोच्या माध्यमातून बांधकाम व्यावसायिकांनी एक चळवळ उभी केली. या वर्षी दि. २६ ते २९ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या मैदानावर एकाच छताखाली जवळपास १०० स्टॉल्स उपलब्ध करण्यात येणार असून, बांधकामासाठी लागणारे साहित्याचे स्टॉल्सही उपलब्ध राहणार आहेत. सध्या लोक चळवळ म्हणून उभे राहत असलेले सौरऊर्जाच्या स्टॉल्सचीही माहिती या एक्स्पोच्या माध्यमातून लातूरकरांना उपलब्ध होईल, अशी माहिती लातूर क्रेडाईचे अध्यक्ष जगदीश कुलकर्णी व सचिव संतोष हत्ते यांनी दिली.

लातूर शहरातील सर्व बांधकाम व्यावसायिकांनी लातूरकरांना परवडतील अशा दरात घरे उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला आहे. यापूर्वीच्या एक्स्पोला लातूरकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता होणाऱ्या या एक्स्पोमधूनही लातूरकरांना व्यावसायिक व ग्राहकांशी थेट संपर्क होणार आहे. मुंबई, पुण्याच्या धर्तीवर लातुरातही चांगल्या दर्जाचे फ्लॅट, रो-हाऊस, बंगलो मिळत असून, शहरात वेगवेगळ्या ठिकाणी सुरू असलेल्या साईट्सच्या कामांची माहिती एक्स्पोच्या माध्यमातून एकाच ठिकाणी पहायला मिळणार आहे. ग्राहकांना बांधकाम व्यावसायिकांनी केलेल्या कामांची मूल्यमापन, सोयी, मिनिटीजची माहिती उपलब्ध होणार असून, काही बांधकाम व्यावसायिक आकर्षक अशा स्कीमही एक्स्पोच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करणार आहेत. प्रत्येक सर्वसामान्य माणसाचे आपले लातूर शहरात एखादे घर असावे, अशी इच्छा असते. परंतु ते आपल्या बजेटमध्ये अथवा परवडतील अशा दरात उपलब्ध होतील ? अथवा त्या साईट्सची माहिती सर्वसामान्यांना नसते. शहरात बांधकाम व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या ठिकाणी बांधकामे चालू आहेत. अनेक बांधकाम व्यावसायिकांनी आपल्या उपक्रमासाठी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अनेक वेगवेगळ्या स्कीम जाहीर केल्या आहेत. आपल्या आवडीनुसार आपल्या घराची बुकींग व त्याची माहिती याबाबतची सविस्तर माहिती या एक्स्पोच्या माध्यमातून मिळणार आहे. जवळपास मागील दोन महिन्यांपासून एमसीएम मेंबर, ओबी कमिटी व क्रेडाईचे पदाधिकारी हा एक्स्पो यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# सौरकृषीपंप अर्जदारांनी आपला लाभार्थी हिस्सा त्वरीत भरावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** शेतकऱ्यांचे दिवसा विजेचे स्वप्न पुर्णत्वास नेण्यासाठी महावितरण कंपनी 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीसाठी जलदगतीने कामाला लागली आहे. मात्र अद्यापही गेल्या अनेक महिन्यांपासून कोटेशन देवूनही कुसूम-ब योजनेतील अर्जदार शेतकरी आपला लाभर्थी हिस्सा भरत नसल्याचे आढळून आले आहे.

लातूर परिमंडळातील ३९ हजार ६३४ शेतकऱ्यांना महावितरणने कोटेशन पाठवले आहेत. दोन महिन्याच्यावर कालावधी ओलांडला तरीही लाभार्थी रक्कम भरली नसल्याचे दिसून येत आहे. अर्जदारांची वाढती संख्या पाहता अर्जदारांनी आपल्या वाट्याची रक्कम त्वरीत नभरल्यास अर्ज रद्द होवू शकतो. त्यामुळे कोटेशन मिळालेल्या शेतकऱ्यांनी त्वरीत रक्कम भरावी असे आवाहन महावितरणच्या लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांनी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शेतकऱ्यांची पेड पेंडिंगची समस्या सोडविण्यासाठी ही योजना राबविण्यासाठी आग्रह आहे. शेतकऱ्यांना सिंचनाच्या बाबतीत स्वतंत्र करणारी आणि त्यांना दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध करणारी ही योजना प्राधान्याने राबविण्यासाठी महावितरणने कंबर कसली आहे. लातूर, बीड व धाराशिव जिल्हयांचा समावेश असलेल्या लातूर परिमंडळात कुसूम-ब योजनेमधील ६८ हजार ३०९ प्राप्त अर्जदारांपैकी ३९ हजार ६३४ अर्जदार शेतकऱ्यांना कोटेशन पाठवण्यात आले आहेत.

# केशवराज विद्यालयात गीताजयंती निमित्त सामुहिक गीता पठण उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** येथील श्री केशवराज विद्यालयात गीता जयंतीच्या निमित्ताने पाचवी ते सातवी विभागातील दोन हजार विद्यार्थी व शिक्षकांनी भगवतगीतेच्या बारा व पंधराव्या अध्यायाचे सामूहिक पठण केले.

यावेळी व्यासपीठावर सामाजिक न्याय मंत्रालय , भारत सरकारचे केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य सुरेश दादा पाटील , महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूरचे सचिव माधव पाटील टाकळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती .

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, विष्णू सोनवणे ,संजय गुरव, केशवराज शैक्षणिक संकुलाचे स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शैलेश कुलकर्णी, देशिकेंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सगरे केशवराज माध्यमिक चे मुख्याध्यापक संजय कुलकर्णी उपमुख्याध्यापक व विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे यांचीही व्यासपीठावर उपस्थिती होती. गेल्या तीन वर्षापासून गीता जयंतीच्या निमित्ताने गीतेतील १२ व १५ व्या अध्यायाचे सामुहिक पठण विद्यार्थी करतात.

# ग्रीस्टॅक योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळणार फार्मर आयडी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या २४ ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णय निर्णयानुसार लातूर जिल्ह्यात सोमवार, १६ डिसेंबर २०२४ पासून ग्रीस्टॅक योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) देण्यात येणार आहेत. यासाठी प्रत्येक गावात कॅम्प आयोजित केले जाणार असून या कॅम्पमध्ये गावातील शेतकऱ्यांनी उपस्थित राहून आपला शेतकरी ओळख क्रमांक्र तयार करुन घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

ग्रीस्टॅक मध्ये शेतकऱ्यांसाठी तीन पायाभूत माहिती संच तयार करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतीचा आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भू संदर्भिकृत भूभाग असणारे गाव नकाशे यांचा माहिती संच असा माहिती संचांचा यामध्ये समावेश आहे.

**असे आहेत ग्रीस्टॅक योजनेचे अपेक्षित फायदे**

१. पीएम किसान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यक अटी पूर्ण करण्यामध्ये सुलभता येईल.

२. पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ट करुन घेण्यास सहाय्य मिळेल.

३. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि कृषि इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करुन घेण्यात सुलभता येईल.

४. पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतकऱ्यांचे देय नुकसान भरपाईसाठी शेतकऱ्यांच्या पिकांचे सर्वेक्षण करण्यात सुलभता येईल.

# करियर कनेक्टमधून उच्च शिक्षणाच्या संधी

## एमआयटी व दयानंद महाविद्यालयाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** एमआयटी विश्वशांती विद्यापीठ पुणे व दयानंद कॉलेज लातूर यांच्यात झालेल्या शैक्षणिक सामंजस्य करारानुसार करिअर कनेक्ट व बारावीनंतर उच्च शिक्षणाच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करण्यात आले. लातूर येथील दयानंद सभागृहात आयोजित या कार्यक्रमास दयानंद कॉलेज सह लातूर शहरातील आणि परिसरातील असंख्य विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

करियर कनेक्ट या कार्यक्रमासाठी दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्हाळे, उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे, एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे प्रा. डॉ. सुनील कराड, डॉ. दिनेश भुतडा आणि डॉ. नाथराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. दरवर्षी होणाऱ्या सदरील कार्यक्रमातून बहुसंख्य विद्यार्थ्यांना मोठ्या



प्रमाणात लाभ होत असल्याने आज झालेल्या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी मोठी गर्दी केली होती.

करियर कनेक्ट कार्यक्रमात बोलताना एमआयटीचे डॉ. सुनील कराड म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची जोड आवश्यक आहे, महाराष्ट्रामध्ये इंजीनियरिंग आणि मेडिकल कॉलेज यामध्ये जी स्पर्धा आहे त्या स्पर्धेत लातूरचे विद्यार्थी उत्कृष्टपणे सहभागी होऊन संपूर्ण देशात लातूरचे नाव केले आहे आणि करत आहेत, सध्या आजचा नवयुवक म्हणजेच उद्याचा भारत देश आणि या देशासाठी जी तांत्रिक क्रांती आहे ते म्हणजेच नवयुवक असे सांगून अभियांत्रिकी व वैद्यकीय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. दिनेश भुतडा यांनी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया व राज्यातील व देशातील म्हणजेच आयआयटी, सीईटी, एमआयटी-डब्ल्यूपीयु प्रवेश प्रक्रिया व त्यासाठी तयारी कशी करावी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अभियांत्रिकी मधील नवीन करिअरच्या संधी तसेच शाखा निवड याविषयी त्यांनी माहिती दिली. तर डॉ. नाथराव जाधव यांनी एमआयटी डब्ल्यूपीयु मधील विविध स्कॉलरशिपची माहिती सांगितली. दयानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्हाळ यांनी उपस्थितांचे स्वागत करून मौलिक मार्गदर्शन केले, कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. संध्या वाडेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

# १६ लाखांचा गुटखा पकडला

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २० कि. मी. पाठलाग करून एका कारमधून बीडकडे नेण्यात येणारा १६ लाख ३३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त केला. या प्रकरणी एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेची पथके तयार करून जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची मोहीम राबण्यात येत आहे. दरम्यान, एका कारमधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची अवैध विक्री करण्यासाठी कर्नाटक ते अंबाजोगाई व्हाया उदगीर मार्गे वाहतूक होत आहे, अशी माहिती पथकाला मिळाली. पथकाने शुक्रवारी दुपारी उदगीर तालुक्यात सापळा लावून, सदर कारचा जवळपास २० किलोमीटर पाठलाग करून उदगीर ते घरणी मोड परिसरात हुंडाई कंपनीची क्रेटा कार (एम.एच. २४ ए.डब्ल्यू. ९८९९) पकडली.

कारची झडती घेतली असता, महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला वेगवेगळ्या कंपनीचा १६ लाख ३३ हजार ७०० रुपयाचा गुटखा व सुगंधित तंबाखू आणि कार जप्त करण्यात आली. यावेळी गुटख्याची वाहतूक करणाऱ्या सूरज दत्तात्रय खंडापुरे (वय ३२, रा. साळुंकेवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड) याला अटक करून त्याच्याविरुध्द चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चाकूर पोलीस करीत आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार सूर्यकांत कलमे, तुळशीराम बरूरे, पोलीस चालक अंमलदार प्रदीप चोपणे यांनी ही सेवा बजावली.

# माऊलीत प्रकल्प व विज्ञान प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** अंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल येथे दोन दिवशीय प्रकल्प व विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या प्रकल्प प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ कवी व साहित्यिक मा. श्री रमेश जी चिल्ले यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. मान्यवरांनी विद्यालयातील चिमुकल्यांसाठी अनेक बालकविता सादर केल्या, व सर्व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन दिले.., व उत्कृष्ट प्रकल्प बनवल्याबद्दल सर्व माऊली टीमचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दिगंबर डि. गवारे यांनी विद्यार्थ्यांना शिवछत्रपती महाराजांचे पेंटिंग प्रात्यक्षिक स्वरूपात करून दाखवले व संस्था सचिव श्री आरडले सर यांना त्यांचे व्यक्तिचित्र आठवण भेट म्हणून दिली.

या प्रकल्प प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण साडेतीन शक्तीपीठ देखावा हे असून प्रकल्प प्रदर्शनात विविध उत्कृष्ट प्रकल्प ,विज्ञान प्रयोग व समाज प्रबोधनात्मक रांगोळीचाही समावेश आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पालक बंधू, भगिनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे प्रकल्प प्रदर्शन १५ डिसेंबर २०२४ सकाळी १० ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सर्वांना पाहण्यासाठी खुले असणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी मानले. या कार्यक्रमात संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. तानाजी बेवनाळे पाटील, विद्यालयाच्या प्राचार्या सौ .कविता आरडले मॅडम, उपप्राचार्या काळे मॅडम, जीवनदीप प्रकाशनचे अनिल सूर्यवंशी, व सुनील सूर्यवंशी सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण माऊली शिक्षक वृंद ,कर्मचारी कॅप्टन नी पथक परिश्रम घेतले.

# डॉ. पंजाबराव हे आधुनिक विचारसरणीचे पहिले प्रयोगशील कृषिमंत्री : डॉ. हरमकर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ डिसेंबर-** देशाचा अर्थव्यवस्थेचा कणा असणांऱ्या शेतकऱ्यांना मान सन्मान, प्रतिष्ठा, हक्क मिळालेच पाहिजेत यासाठी राजकारणाचा उपयोग समाजकार्यासाठी करणारे दृष्टे समाजसुधारक, देशाचे पहिले आधुनिक विचारसरणीचे प्रयोगशील कृषिमंत्री डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे होते असे प्रतिपादन अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेतील प्राध्यापक डॉ. प्रशांत हरमकर म्हणाले.

ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर जयंती रौप्य वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व या.द.व देशमुख कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, निवसा, जिल्हा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानाचे आयोजन केले होते, या व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी भूषविले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख या.द.व देशमुख कला, विज्ञान,व वाणिज्य महाविद्यालय निवसा तसेच उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, मुख्य समन्वयक



तथा मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. संभाजी पाटील यांची प्रमुख उपस्थित होती. डॉ.हरमरकर पुढे म्हणाले की, भाऊसाहेबांचा शेती हा हृदयाचा ध्यास होता. त्यासाठी त्यांनी सहकाराला चालना दिली. शेतकऱ्यांच्या विविध अडचणी दूर व्हाव्यात यासाठी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली पाहिजे असे त्यांना वाटत होते. तसेच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळावी यासाठी त्यांनी साखर उद्योग, गूळ उद्योग, सूत उद्योग झाले पाहिजे, यासाठी ते प्रयत्नशील होते. शेतकऱ्यांसाठी शिक्षणाचे जाळे निर्माण करणारे, शेतकरी महिलांना मान सन्मान मिळावा म्हणून प्रयत्न करणारे दृष्टे विचारवंत म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव घ्यावे लागेल. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, यांनी केले. याप्रसंगी ते म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मराठा -कुणबी संदर्भातील जे विचार मांडले होते, ते मराठवाड्याने स्वीकारले असते तर, आजचे जे मोर्चे निघत आहेत ते निघालेच नसते. शेतकरी, कष्टकरी, वंचीत समाजातील दारिद्र्य, गरिबी, निरक्षरता वाढण्याचे कारण अज्ञान हेच आहे असे डॉ. पंजाबराव देशमुख यांना वाटत असतं. या कारणासाठी त्यांनी शैक्षणिक गोष्टीकडे अधिक लक्ष दिले आणि ते कृतीत आणले असे कृतिशील नेतृत्व देशाला लाभले आहे.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेतकऱ्यांच्या संदर्भातील विचार जर सर्वांनी आत्मसात केले असते तर महाराष्ट्रात ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत त्या झाल्या नसत्या. तसेच कृषीविषयक दिलेला सल्ला सद्य:स्थितीमध्ये अत्यंत महत्त्वाचा वाटतो आहे असे यावेळी ते म्हणाले . यावेळी अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.